# माणूस

१ ऑगस्ट १९६५

तीस पैसे



## विशेषांक नाही पण,
## ‘ माणूस ’ १५ ऑगस्टच्या अंकात
## एक ‘ विशेष ’ आहे.

एक प्रवासवर्णनच. पण वेगळे, साहसपूर्ण.
प्रसंग : प्रत्यक्ष पावनखिंडीतच जाऊन
नरवीर बाजी प्रभूंची पुण्यतिथी साजरी करण्याचा
एक नवाच उपक्रम.

ज्या दिवशी
शिवाजी महाराज सिद्दी जोहारच्या
वेढ्यातून निसटले
त्या दिवशी व त्याच ठिकाणाहून
मुंबईच्या शिवराय मंडळाचे सभासद व
श्री. ब. मो. पुरंदरे पन्हाळगडाहून निघाले
आणि ज्या मार्गाने
महाराज विशाळगडास गेले
त्या मार्गानेच ते गेले.

मुसळधार पाऊस, वादळी वारे,
जंगलातील काटेरी चिखलवाट
आणि डोंगराच्या चढणी
१०–११ जुलैला सुरू झालेला ६५ मैलांचा
दोन दिवसांचा हा शिवभक्ताचा प्रवास......

**पण प्रत्यक्ष ब. मो. पुरंदरेच या प्रवासाची कथा**
**‘ माणूस ’च्या १५ ऑगस्ट अंकात वाचकांना सादर करीत आहेत.**

आपला अंक राखून ठेवा. विक्रेत्याला अधिक प्रतींची मागणी
नोंदविण्याचा आग्रह करा. कागदटंचाईमुळे प्रती मर्यादित.

माणूस, ४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक पाचवा : १ ऑगस्ट १९६५

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

गेल्याच अंकात 'लेखनवाचन' या सदराला काट द्यावा लागला होता. या अंकात या सदराला नेहमीपेक्षा दुप्पट जागा देऊन मागची उणीव भरून काढली आहे. एक ऑगस्ट हा लोकमान्यांच्या पुण्यतिथीचा दिवस. त्याच दिवशी टिळक-केळकर-बापट आठवणींचे श्री. बापटकृत पुस्तकही प्रकाशित होत आहे. वेळ साधून या पुस्तकाचा सविस्तर परामर्श या अंकात दिला आहे, तो वाचकांना उचितच वाटेल. मुखपृष्ठावरील वाक्याचा संदर्भही या परामर्शात दिलेल्या एका टिळक–आठवणीत आहे. प्रसिद्धीपूर्वी छापलेले फॉर्म्स आणि मुद्रिते वाचायला दिल्याबद्दल या पुस्तकाचे लेखक व संपादक, तसेच अ. वि. गृह प्रकाशन संस्थेचे चालक या सर्वांचे आभार. —सं.

या अंकातील ललित साहित्य

कथा : ● वादशा
□ दि. त्र्यं. कुलकर्णी
● लग्न
□ सौ. शकुंतला पारपिल्लेवार


विशेष राजकीय लेख : ● व्हिएटनामच्या युद्धाची पार्श्वकथा
□ अरुण साधू

याशिवाय नेहमीची सर्व सदरे व नाझी भस्मासुराचा उदयास्त...

★ ★ ★

किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



दिल्ली दरबार : : दरबारी

## □ युगोस्लाव्हियात भारतीय वाघिणींचा कारखाना

भारताचे पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री आज सकाळी (दि. २२) बंगलोरकडे काँग्रेस पक्षाच्या महासमितीच्या (ए. आय. सी. सी.) बैठकीसाठी रवाना झालेले असले तरी तेथून परत येताच युगोस्लाव्हियाच्या दौऱ्यावर रवाना होतील. [आपण हे वाचाल त्या सुमारास युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथून पंतप्रधान परतीच्या प्रवासाला प्रारंभ करीत असणार.] सुमारे एक महिन्यापूर्वीच पंतप्रधान कैरो, कॅनडा व लंडन येथील प्रवास करून परतलेले आहेत. त्या प्रवासातच त्यांनी पश्चिम जर्मनीतील फ्रँकफर्ट येथे काही तास मुक्काम करून तेथील सरकारशी संपर्क साधला होता. मॉस्कोची वारी यापूर्वी त्यांनी केलेली आहेच. गेल्या एका वर्षातील या विदेश वाऱ्यांमुळे आता आपले पंतप्रधान सराईत मुत्सद्यांप्रमाणे वावरू लागले आहेत; सावधपणे बोलू लागले आहेत. युगोस्लाव्हियाच्या त्यांच्या या प्रवासामुळे पूर्वेकडील युरोपात त्यांचा प्रथमच प्रवेश होणार आहे. वास्तविक सद्यःस्थितीतील जागतिक राजकारणात पश्चिम युरोप (भांडवलवादी व लोकशाही प्रणालीने चालणारी राष्ट्रे) आणि पूर्व युरोप (कम्युनिझमला प्राधान्य देणारी राष्ट्रे) यांच्यांतील ‘ तटस्थ ’ वृत्तीचा दुवा म्हणजे युगोस्लाव्हियाच आहे. या देशाचे कर्णधार मा. टिटो हे ‘ तटस्थ ’ धोरणाच्या भारताचे चाहते असून माजी पंतप्रधान पं. नेहरू यांना अती मानीत असत. अशा महत्त्वपूर्ण मित्रराष्ट्राला श्री. शास्त्रीजी भेट देणार असल्याने सध्या विदेशमंत्रालयात या यात्रेची विशेष सिद्धता चालू असल्याचे दिसून येत आहे. मा. टिटो नुकतेच रशियाची वारी करून स्वदेशी परत आलेले असल्याने यावेळी बेलग्रेडमध्ये जी ‘ शास्त्री-टिटो ’ बोलणी होतील, त्यात अनेकविध जागतिक महत्त्वाचे विषय चर्चेला निघतीलच. ‘ जागतिक शांतता ’ या विषयाच्या संदर्भात निःशस्त्रीकरण, आक्रमक लाल चीनचे सर्व आघाड्यांवरील अनिष्ट धोरण, व्हिएटनाममध्ये युद्धबंदी कशी घडवून आणता येईल, आदि प्रमुख मुद्द्यांची सर्वंकष चर्चा होईलच. भारताच्या पंतप्रधानांना मॉस्कोचे मनसुबे आणि

मिश्रचे (इजिप्तचे) अध्यक्ष नासेर यांच्या महत्त्वाकांक्षा या दोन अतिशय महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पैलूंचे स्वच्छ दर्शन मा. टिटो यांच्या बोलण्यातून मिळू शकेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. भारत व युगोस्लाव्हिया यांमधील व्यापार व औद्योगिक क्षेत्रातील सहकार्य गेल्या १५ वर्षांत दुपटीने वाढलेले दिसत असले, तरी पंतप्रधान श्री. शास्त्रीजींच्या तेथील प्रवासाने यात काही भरीव भर त्वरित पडणार असल्याचे कळते. भारतीय रेल्वेतर्फे ज्या विशिष्ट प्रकारच्या 'वाघिणी' (बॉक्स वॅगन्स) भारतातच तयार केल्या जात आहेत, त्या वाघिणींना पूर्व-युरोपात व युगोस्लाव्हियामध्ये नव्याने व वाढती मागणी येऊ घातलेली आहे. त्यामुळे अशा 'भारतीय वाघिणी' तयार करण्याचा कारखानाच युगोस्लाव्हियामध्ये चालू करा, असा आग्रह युगोस्लाव्हियातील उद्योगपती व व्यापारी भारताला करीत असून, तेथील सरकारचाही याला पाठिंबा असल्याने सध्या या संकल्पित कारखान्याविषयी प्राथमिक स्वरूपाची बोलणी व माहिती गोळा करणे आदि कामे मोठ्या उत्साहाने चालू असल्याचे कळते. भारतात या वाघिणी तयार करून धाडण्यापेक्षा (निर्यात करण्यापेक्षा) युगोस्लाव्हियातच तयार करून निकटच्या देशांत खपविल्या गेल्या तर उत्पादनाचा खर्च कमी ठेवून भारताला चांगल्या माफक किमतीत व मोठ्या प्रमाणावर त्या भागातील मागणी पुरविता येईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. भारतीय पंतप्रधानांच्या यावेळच्या युगोस्लाव्हियामधील वास्तव्यात जे परस्पर सहकार्याचे वातावरण अधिकाधिक अनुभवास येणार आहे, त्याचे ओझरते दर्शन वाचकांना आगाऊच व्हावे म्हणून ही माहिती व तदनुषंगिक ज्या हालचाली येथे चालू आहेत, त्या सादर केल्या आहेत. 'आयात कमी करा; निर्यात वाढवा आणि भारताची विदेशांतील गंगाजळीची पातळी वाढवा,' असे जे नवीन सूत्र पंतप्रधान श्री. शास्त्रीजी गेल्या सप्ताहापासून वारंवार मांडू लागले आहेत, त्या सूत्रालाही युगोस्लाव्हियामध्ये ते बळकटी देऊन येतील, असाच रागरंग दिसत आहे.

## □ पॅरिसमधील 'रंगेल रात्री' आणि मंत्री

पंतप्रधानांच्या विदेशवारीवरून स्मरण झाले, की सुमारे दोन महिन्यांपूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री विदेशांतच वावरत होते. यामुळे भारताने मंत्र्यांनाच निर्यात करण्याची प्रथा चालू केली आहे की काय, अशी साधार शंका प्रकट करणारी अनेक व्यंग-चित्रे, वार्ता व वाचकांची पत्रे प्रसिद्ध झालेली वाचकांच्या स्मरणात असतीलच. मंत्र्यांच्या या विदेशवाऱ्यांमुळे किती विदेशी मुद्रा (फॉरिन एक्स्चेंज) खर्ची पडली आहे आदि साधकबाधक चर्चा येत्या संसदेच्या (१६ ऑगस्टपासून) बैठकीत होणार असल्याने आतापासूनच काही मंत्री कोणीही विचारणा न करताच 'आपापली जबानी' जनतेसमोर पत्रकारांचेद्वारा सादर करू लागले आहेत. केंद्रीय नभोवाणी व माहितीखात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या



परदेशांतील प्रवासाविषयी (अगदी ताजा प्रवास मंगोलियामध्ये झाला) अनौपचारिकरीत्या माहिती सांगताना त्या सहजपणे सांगून गेल्या, की 'मंत्र्यांच्या परदेशप्रवासावरील टीका माझ्या पाहण्यात आलेली आहे. गेल्या वर्षभरात मी जेथे कोठे जाऊन आले, तेथे निमंत्रणावरूनच गेले होते, तेव्हा मी विदेशी मुद्रा खर्च करण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही.' एवढी 'सफाई' (म्हणजेच खुलासा) देऊन त्या लगेच म्हणाल्या, की 'लंडनचा प्रवास मी व्यक्तिगतरीत्या केला खरा, परंतु तेथील दूरदर्शनावर (टेलिव्हिजनवर) माझा एखादातरी कार्यक्रम होतोच व त्यातून मला आवश्यक ती विदेशी मुद्रा अल्पस्वल्प प्रमाणात प्राप्तही होतेच.' श्रीमती इंदिरा

गांधी यांनी विचारणा न होताच ही जी माहिती दिली आहे, ती पूर्णतया विश्वसनीय अशीच आहे. शिवाय याच संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब ध्यानी घेण्याजोगी आहे व ती म्हणजे आंतरराष्ट्रीयदृष्टया ख्यातनाम झालेल्या प्रसिद्ध लेखकपित्याच्या (पं. नेहरूंच्या) त्या कन्या आहेत. जगाच्या विविध भाषांमधून पं. नेहरूंची पुस्तके अनुवादित होत (झालेली) आहेत. त्यामुळे जी 'रॉयल्टी' विदेशी मुद्रांमध्ये प्राप्त होते ती रक्कम श्रीमती गांधी यांना परदेशांत वापरण्यासाठी केव्हाही सहजपणे मिळू शकतेच. ही वस्तुस्थिती बव्हंशी सर्वांना ज्ञात असल्याने श्रीमती गांधींवर सहसा कोणी या प्रकरणी तरी टीका करीत नाहीत व अशी टीका होत असेल तर ती चुकीची आहे. 'पॅरिस'मधील 'नाईट क्लब्स'मध्ये अन्य कोणी केंद्रीय मंत्री गेल्याने जी टीका सध्या होत आहे, तिचासुद्धा अगदी सहजपणे उल्लेख करून श्रीमती गांधी म्हणाल्या, की 'आजपर्यंत निदान पाच–पन्नासवेळा पॅरिसचा प्रवास मला घडला असेल. अगदी थेट फ्रेंच कुटुंबातही अनेक प्रसंगी माझे वास्तव्य झाले आहे. परंतु या अशा 'क्लब्स'विषयी मला कोणी सांगितले नाही वा नेण्याचा प्रयत्नसुद्धा केला नाही.' फ्रेंच कुटुंबांतील आपला अनुभव अधिक विशद करून सांगताना त्या म्हणाल्या, की 'या कुटुंबांतील तरुण मुलींसाठी जी शिस्त अमलात आणलेली असते ती वाखणण्याजोगी आहे. या फ्रेंच कुटुंबांतून अशी मान्यता आहे असे दिसून आले, की पॅरिसमधील या 'रंगेल रात्री' आदि सर्व प्रकार फक्त प्रवाशांसाठीच आहेत; आपल्या कुटुंबी-जनांसाठी नव्हेत.' श्रीमती गांधी यांनी मनमोकळेपणे ही जी माहिती सांगितली ती विशेष महत्त्वाची वाटल्याने तिचा सविस्तर उल्लेख केला आहे. [अन्य केंद्रीय मंत्री, श्री. सत्यनारायण सिन्हा यांनी आपले परदेशप्रवास–अनुभव प्रकट केल्यानंतर कम्युनिस्ट खासदार श्री. भूपेश गुप्ता यांनी जी टीकेची झोड उठविली आहे, ती दैनिकांच्या रकान्यांतून सविस्तर प्रसिद्ध झालेली असल्याने त्याविषयी लिहून जागा अडवीत नाही.] श्री. संजीव रेड्डी, डॉ. के. एल्. राव, श्री. आर. एम्. हजरनवीस, डॉ. हुमायून कबीर, श्री. छागला, श्री. बळिराम भगत आदि मंत्र्यांचे जे परदेशप्रवास झाले, त्यांविषयीसुद्धा संसदेच्या आगामी बैठकीत प्रश्न उपस्थित होणारच आहेत. त्यामुळे आजच त्याविषयी अधिक लिहिणे न लगे!

## □ गोवा फेरनिवडणूक : कल्पना कोणाची?

मराठी भाषिकांचे लक्ष स्वाभाविकपणेच गोमंतकाच्या भवितव्याकडे गेल्या पंधरा दिवसांपासून लागलेले आहे. कारण दिल्लीच्या दरबारात अचानक पुनर्विचार झाल्यागत वातावरण निर्माण होऊन गोवाप्रदेश मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर येथे येऊन पंतप्रधान श्री. शास्त्रीजींना भेटून गेलेले आहेत. [हे सर्व अचानक कसे घडून आले व बंगलोर येथे कॉंग्रेसच्या महासमितीच्या बैठकीपूर्वी व बैठकीनंतर काय काय

घडले...आदि सर्व आपण सविस्तरपणे दैनिक वृत्तपत्रांतून पाहिलेले असणारच ! ] अशा अवस्थेत दिल्ली दरबारात यापुढे याविषयी काय काय घडेल हे निश्चित सांगणे कठीणच आहे. आजच्या घटकेला एवढेच निश्चितपणे कळवू शकत आहे की दयानंद बांदोडकर व त्यांचे येथील प्रमुख सल्लागार (वाटल्यास मार्गदर्शक म्हणा) संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण याना मात्र शंभर टक्के विश्वास वाटत आहे, की जर गोव्यात फेरनिवडणूक झाली तर महाराष्ट्रवादी गोमंतकीयांचाच विजय होईल ! ही फेर (नवी) निवडणूक स्वीकारणे धोक्याचे नाही का, असा प्रश्न श्री. चव्हाण यांना विचारला गेला असता त्यांनी तात्काळ उत्तर दिले की ' होय, ही तोलूनमापून घेतलेली जोखमच (Calculated risk) आहे. परंतु राजकारणात जोखम वा धोका न पत्करता कधी तरी काही प्राप्त होते का ?' श्री. चव्हाण यांच्या या बोलक्या प्रतिप्रश्नातच गोमंतकाचे भवितव्य साठविलेले आहे, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. येथील मुक्कामात श्री. दयानंद बांदोडकरांशी अनौपचारिकरीत्या गप्पागोष्टी करताना काही मित्रमंडळींनी त्यांना प्रश्न केला, की ' फेरनिवडणुकीचे हे पिल्लू प्रथम कोठून, कोणाच्या मेंदूतून, (ब्रेनवेव्ह) बाहेर पडले ?'

श्री. बांदोडकर हे राजकारणी म्हणून प्रसिद्ध नसले तरी सावध व व्यवहारी उद्योगपती (व्यापारी) म्हणून प्रसिद्धच आहेत. त्यांनी हसून या अवघड प्रश्नाचे उत्तर देणे प्रथम टाळले. परंतु लगेच ते म्हणाले, की ' आजच याची वाच्यता कशाला ? याविषयी योग्यवेळी बोलूच ! ' श्री. बांदोडकर यांनी असे उत्तर देऊन समाधान करण्याचा यत्न केला असला तरी मुत्सद्दी पंतप्रधान श्री. शास्त्रीजी मात्र उघडपणे सांगून मोकळे झाले आहेत, की श्री. बांदोडकरांनी फेरनिवडणूक कल्पना माझ्यासमोर मांडताच कल्पना चांगली आहे असे म्हणून मी तिचे समर्थन केले ! दिल्ली दरबारातील माहीतगार मंडळींचे म्हणणे असे आहे, की हा एकच व्यवहार्य पर्याय असा होता, की ज्यामुळे काँग्रेसश्रेष्ठींना आपली ' शान ' राखून जुन्या ' दहा वर्षे विचार नाही, ' या निर्णयाचा पुनर्विचार करण्यास पळवाट लाभणार होती. त्यामुळे श्री. य. व. चव्हाण यांनी या कामी पुढाकार घेऊन पंतप्रधान व काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री. कामराज यांचा प्रथम या पर्यायाला पाठिंबा प्राप्त करून घेतला व नंतर तो पर्याय श्री. बांदोडकरांच्या मुखावाटे प्रकट करविला ! पुण्या-मुंबईकडील काही वृत्तपत्रे लिहीत आहेत, की महाराष्ट्र मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनीच प्रथम फेरनिवडणूक हा पर्याय शोधून काढून त्यासाठी श्री. बांदोडकर व श्री. चव्हाण यांची मने वळविली ! या पर्यायी कल्पनेचा ' जन्मदाता ' कोणी का असेना, आजच्या (दि. २२ जुलै) घटकेला तरी पंतप्रधान श्री. शास्त्रीजी या कल्पनेचा भरभक्कम आधार घेऊन जुन्या दि. ७ एप्रिल १९६४ च्या जणू ' वज्रलेप ' होऊ पाहणाऱ्या निर्णयाविषयी काँग्रेसश्रेष्ठींना पुनर्विचार करण्यास भाग पाडून कोंडी फोडण्याचा यत्न करीत आहेत, हा काही कमी लाभ आहे का ?

## □ रसिक मंत्री.......गुजरातकडे

गुजरातचे नवे राज्यपाल म्हणून श्री. नित्यानंद कानूनगो यांची वर्णी लागल्याची घोषणा दिल्ली दरबारातून काल रात्रीच झालेली आहे. [ पंतप्रधान श्री. शास्त्रीजी व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन या दोघांच्याही निकटवर्ती गोटातून ही वार्ता आधी बाहेर फुटली नव्हती, ही विशेष नमूद करण्याजोगी व चांगली घटना आहे. मागे विदेशमंत्री म्हणून सरदार स्वर्णसिंग यांची नियुक्ती झाली, त्यावेळीही सर्वांना असाच सुखद धक्का लाभला होता ]. श्री. कानुनगो हे सध्या नागरी हवाई वाहतूक (Civil Ariation) विभागाचे मंत्री आहेत. लवकरच हे अहमदाबादला जातील. आज त्यांच्या नियुक्तीची वार्ता वाचून अनेकांनी विचारणा केली, की कोण हे गृहस्थ? श्री. कानूनगो हे ओरिसाच्या राजकारणातील एका वेळचे बडे प्रस्थ आहे. ओरिसातील राजकारणातून हकालपट्टी म्हणजे केंद्रात मंत्रिपद वा राज्यपालपद भूषविणे असे समीकरण होऊ पाहात आहे. डॉ. हरेकृष्ण महताब महाराष्ट्राचे माजी राज्यपाल, तर सध्याचे उत्तर प्रदेशचे राज्यपाल श्री. विश्वनाथदास हे दोघेही ओरिसातलेच. आज असा अंदाज व्यक्त केला जात आहे, की पंतप्रधान लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळात ओरिसातून एखाद्याची वर्णी लावण्याचा संभव आहे. श्री. कानूनगो गुजरातेत जात असले तरी दिल्लीतील रसिक (नाट्य-संगीत प्रेमीजन) मंडळींना मात्र त्यांची येथील अनुपस्थिती जाणविल्याविना राहणार नाही. ●

---

### ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून

## गोव्याचे भवितव्य

**श्री. के. केळकर**

महाराष्ट्राची रास काही सायनवाद्यांच्या मते सिंह आहे आणि सिंह रास धरून संयुक्त महाराष्ट्र होणार नाही हे केलेले भाकीत कसे चुकले हे सर्वांना विदित आहेच. फार पूर्वीपासून निरयनवादी ज्योतिषी महाराष्ट्राची रास धनु मानत आहेत. या अंदाजास धनु राशीत गुरू १० ते ११ अंशात असताना संयुक्त महाराष्ट्र झाला या विधानास भरपूर पुरावा निर्माण झाला आहे.

ता. ६ ऑगस्टला गुरू मिथुन राशीत म्हणजे महाराष्ट्राच्या सप्तमास येत असून, तेथे जानेवारी १९६६ अखेर राहात आहे. सप्तमस्थानावरून सरहद्दीचे प्रश्न पाहतात. तेव्हा ऑगस्ट ते जानेवारीअखेर गोवा अगर बेळगावबावत ज्या घटना घडतील त्या महाराष्ट्राला फायद्याच्या होतील, असे ज्योतिषशास्त्रदृष्टया दिसते. असे घडले तर महाराष्ट्राची रास धनु समजण्यास काहीच शंका नाही.

मुंबईचा लग्नबिंदू माझे मते वृश्चिक २० आहे. मंगळ सप्टेंबरचे दुसरे आठवड्यात लग्नबिंदूत येईल. त्यावेळी मुंबईत काय घडते ते पाहा! ●



भातखाचरे हीच येथील युद्धभूमी

**सात फेब्रुवारी १९६५** च्या त्या रात्री वॉशिंगटनच्या व्हाईट हाउसमध्ये अमेरिकेच्या सुरक्षा मंडळाच्या बैठकीत अध्यक्ष जॉन्सन यांचा चेहरा अतिशयच गंभीर आणि रागीट दिसत होता. रागाच्या भरात क्षणभर त्यांना काहीच बोलता आले नांही. मग ते उद्गारले, "बस्! फार झाले आता. आता प्रहारच केला पाहिजे."

झाले! क्षणार्धात विजेच्या वेगाने बिनतारी संदेश पॅसिफिकच्या दुसऱ्या टोकाला पोचले आणि महासागराच्या टोकाला टोंकिनच्या आखातालगत तळ देऊन राहिलेल्या हॅनॉक् रेंजर आणि कोरल सी या विमानवाहू बोटींच्या तळांवरून कर्णकर्कश आवाज करीत ४९ जेट विमानांनी आकाशात झेप घेतली. उत्तर व्हिएटनाममधील दाँघॉई या तळाचा विध्वंस करून त्यांतील ४८ जेट विमाने थोड्याच वेळात परतली.

दक्षिण व्हिएटनामसाठी अमेरिकेने उत्तर व्हिएटनामवर केलेला हा पहिला हवाईहल्ला. साऱ्या व्हिएटनाम संघर्षाला या हवाईहल्ल्याने कलाटणी दिली आणि यानंतर रोज अथवा दिवसाआड सतत असे हवाई–प्रहार उत्तर व्हिएटनामवर चालू ठेवण्यात येत आहेत. उद्दिष्ट, व्हिएटकाँगला आणि उत्तर व्हिएटनामला वठणीवर आणण्याचे.

त्या दिवशी जॉन्सनसाहेब एवढे कोपाविष्ट झाले, त्याला कारणही तसेच गंभीर

अरुण साधू

भारताच्या पूर्वसीमेपासून केवळ
दोन देशांच्या अंतरावर हा
युद्धाचा डोंब उसळतो आहे....

# व्हिएटनामयुद्धाची पार्श्वकथा...

होते. सायगावच्या ईशान्येस २४० मैलांवरील प्लेकू या दक्षिण व्हिएटनाममधील अमेरिकन विमानतळावर व ठाण्यावर व्हिएटकाँग सैनिकांनी हल्ला चढवला आणि हातबाँबच्या सहाय्याने तळावरील विमाने आणि हेलिकॉप्टर्स पार उद्ध्वस्त करून टाकली. प्रत्यक्ष अमेरिकनांवर हा हल्ला होता.

हे आता फार झाले असे जॉन्सनसाहेबांना वाटले. अगोदरच व्हिएटकाँगच्या कारवायांनी ते जेरीस आले होते. सायगावच्या सरकारचे बूड टेकवून ठेवण्याचे निष्फळ प्रयत्न करता करता त्यांना नाकी नऊ आले होते. त्यातच रोज गनिमी व्हिएटकाँग, दक्षिण व्हिएटनामच्या सैनिकांना मोठ्या संख्येने गारद करीत होते. त्यांत अमेरिकन सैनिकही होते. पण आता हा प्रत्यक्ष अमेरिकेच्या तळावर हल्ला होता. खरोखरच हे फार झाले होते. त्या छुप्या व्हिएटकांगना जमिनीवरून तोंड देणे आपल्या सैनिकांना पुरेसे जमणार नाही, हे जॉन्सन यांना माहिती होते. म्हणूनच त्यांनी एक इशारा देऊन उत्तर व्हिएटनामवरील बाँबवर्षावाचे सत्र सुरू केले आणि व्हिएटनामच्या युद्धाला एक वेगळीच कलाटणी दिली.

## चिखलातील जिकिरीचे युद्ध

व्हिएटनामधील त्या हिरव्याशार सहस्रावधी भातशेतांमध्ये रक्त-मासाचे सडे शिंपीत आणि लक्षावधी सुखी जीवने उधळीत हे एक वेगळेच विचित्र युद्ध तांडव करीत आहे. शांततेच्या चिंध्या फाडीत एकदम कोठून तरी पावसाच्या सरीप्रमाणे


मशीनगनच्या गोळ्या येतात आणि कुठल्यातरी रम्य ओढ्याकाठी फुलांच्या नाजूक ताटव्याशेजारी रक्ताने माखलेली दोन प्रेते टेवून जातात. सायगावच्या सुखवस्तू वस्तीतील कुठल्यातरी क्लबमध्ये मंद संगीताच्या तालावर चांदण्या रात्रीच्या गोड नशेत प्रेमी युगुलांचे बेहोष नृत्य रंगात येत असते, तोच अचानक हादरा बसतो... "धडाड धुम्." आणि पाच-पन्नास निरपराध स्त्री-पुरुष-अर्भकांचे तुकडे तुकडे होतात. त्याचा सूड म्हणून की काय, दुसरे दिवशी पहाटे द. व्हिएटनाममधील कुठल्यातरी तळावरून सुसज्ज विमानांचा एक ताफा भुःभुःकार करीत उत्तरेच्या दिशेने झेप घेतो आणि तास दीड तासांत उत्तर व्हिएटनाममधील दोन चार तळ उद्ध्वस्त करून शेपन्नास प्राण घेऊन परत येतो. छपलेल्या गनिमी कम्युनिस्टांना हुडकून काढण्यासाठी गुडघा गुडघा चिखलांतून पावले रोवीत जाणाऱ्या त्रासलेल्या अमेरिकन सैनिकांना नुकतीच कुठे आपल्या मायभूमीची याद येऊ लागलेली असते, तोच चारी बाजूंनी गोळ्यांचा वर्षाव सुरू होतो.

कुठल्या एका खेड्यात बाँबच्या माऱ्याने भाजून निघालेली एक म्हातारी आपल्या खाटेवर पडलेली असते आणि पाठीशी मशीनगन बांधलेला एक राकट सैनिक हातातील चमच्याने तिला अलगद दूध भरवीत असतो, तर दुसरीकडे कोठे जेवणाच्या भातातील बंदुकीच्या दारूच्या वासाने आणि तोफगोळ्यांच्या व बाँबच्या स्फोटाच्या आवाजाने वेडी झालेली वस्त्रहीन तरुणी मोठमोठ्याने किंचाळत पळत असते.

असे आहे व्हिएटनाममधील युद्ध ! चिखलमय, क्रूर आणि सीमाविहीन. कोण कुणाचा शत्रू कळत नाही. शत्रूची सीमा कोणती हे माहीत नाही. युद्ध केव्हा थांबेल याचा अंदाज नाही आणि त्यातून उडणाऱ्या ज्वाळा एकदम भडकून केव्हा साऱ्या जगाला व्यापतील याची शाश्वती नाही. भारताच्या पूर्व सीमेपासून केवळ दोन देशांच्या अंतरावर या युद्धाचा डोंब उसळतो आहे.

या लढ्याला नाव आहे दक्षिण व उत्तर व्हिएटनामचा लढा. पण खरे पाहता या संघर्षात एका बाजूला दक्षिण व्हिएटनामचे कम्युनिस्टांपासून रक्षण करण्याची प्रतिज्ञा घेतलेले अमेरिकेचे बलाढ्य लष्करी सामर्थ्य आहे, तर दुसऱ्या बाजूला सारा व्हिएटनाम लाल अमलाखाली आणण्यासाठी जिवावर उदार झालेल्या गनिमी कम्युनिस्टांची जिद्द आणि त्यांच्या पाठीशी असलेले उत्तर व्हिएटनाम. निर्णयाबद्दल अमेरिका साशंक आहे.

हा निर्णय केव्हा होईल तो होवो, पण त्याचा परिणाम केवळ आशियावरच नव्हे, तर साऱ्या जगाच्या राजकारणावर होणार आहे, हे निश्चित. व्हिएटनामचा लढा हा कम्युनिस्ट जगताचा आणि पाश्चात्त्य राष्ट्रांचा दोघांचाही प्रतिष्ठेचा प्रश्न होऊन बसला आहे.




## आग्नेय आशियात घुसण्याचे महाद्वार

व्हिएटनाममधील सध्याचा संघर्ष व राजकारण, व्हिएटनामचा इतिहास आणि संस्कृती या सर्वांवर या देशाच्या भौगोलिक परिस्थितीचा फार मोठा प्रभाव आहे. पॅसिफिक महासागराच्या किनारी, चीनच्या दक्षिणेला आणि लाओस व कंबोडियाच्या पूर्वेला चिचोळ्या आकाराचा हा देश वसलेला आहे. या चिचोळ्या पट्टीला जवळजवळ मधोमध सतराव्या अक्षांशाची रेखा कापते. त्या रेखेने व्हिएटनामचे सध्या उत्तर व दक्षिण असे दोन कृत्रिम राजकीय तुकडे पाडले आहेत. उत्तर व्हिएटनामचे क्षेत्रफळ ५९,९३८ चौरस मैल आणि लोकसंख्या १ कोटी ८० लाख आहे, तर दक्षिण व्हिएटनामचे क्षेत्रफळ ६५,९५१ चौरस मैलांचे आणि लोकसंख्या एक कोटी ४५ लाखांची.

संपूर्ण व्हिएटनामच्या नकाशाकडे पाहिले, की चटकन तेल ओतण्याच्या नसराळ्यासारखे चित्र नजरेसमोर उभे राहते. या उपमेला ऐतिहासिक महत्त्वही आहे. नसराळ्याच्या तोंडासारख्या दिसणाऱ्या उत्तर व्हिएटनाममध्ये उतरून आशियात घुसण्याचा सतत प्रयत्न चीन आपल्या साऱ्या इतिहासात करीत आला आहे. आग्नेय

आशियात जमिनीवरून जाण्याचा हा एकच मार्ग चीनला उपलब्ध होऊ शकतो. परंतु व्हिएटनामच्या लोकांनी मात्र सबंध इतिहासकालात आपले स्वातंत्र्य अबाधित राखले आहे. हान, मंगोल, मिंग, मांचू आदि अनेक साम्राज्यवादी चिनी राजघराण्यांनी व्हिएटनामच्या उत्तर सीमेवर हल्ले करून आग्नेय आशियात उतरण्याचे प्रयत्न केले, पण व्हिएटनामी लोकांनी ते परतवून लावले. आग्नेय आशियात सिंगापूर, मलाया, इंडोनिशिया आदि ठिकाणी जे मोठ्या संख्येने चिनी लोक आढळतात, ते सर्व समुद्रमार्गाने आले आहेत.

लष्करी हल्ले जरी परतविले गेले तरी चिनी संस्कृतीचा स्रोत मात्र व्हिएटनामच्या उत्तर सीमेतून खाली व्हिएटनाममध्ये आणि तेथून साऱ्या आग्नेय आशियात झिरपावयाचा थांबला नाही. व्हिएटनामी जनतेने चिनी संस्कृती मोठ्या प्रेमाने आत्मसात केली आणि त्या जोरावर दक्षिण व पश्चिमेच्या दिशेने आपले साम्राज्य वाढविण्याचाही प्रयत्न केला.

चीन आणि व्हिएटनामचे संबंधच मोठे विचित्र होते. एकीकडे व्हिएटनामी जनता चिन्यांना आपले कट्टर शत्रू मानीत असे, तर दुसरीकडे चिनी संस्कृतीबद्दल व्हिएटनाम्यांना विलक्षण आदर आणि प्रेम होते. चिनी संस्कृतीचा व्हिएटनामी पंडितांवर एवढा जबरदस्त पगडा बसला, की अगदी अलीकडच्या काळापर्यंत त्यांनी जगातील इतर संस्कृतीकडे आणि भौतिक प्रगतीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. अगदी सुरवातीला व्हिएटनामला हान (चिनी) संस्कृतीचा जरी फायदा झाला, तरी त्यामुळे व्हिएटनाममधील स्वतंत्र प्रतिभाच नाहीशी झाली. जुनाट, जीर्ण चिनी संस्कृतीच्या प्रदीर्घ गुलामगिरीमुळे १९ व्या शतकाच्या शेवटात फ्रेंचांच्या वसाहतवादात व्हिएटनामचा त्यामुळेच चटकन बळी गेला.

## फ्रेंचांचा प्रवेश व कबजा

फ्रेंचांचाही प्रवेश व्हिएटनाममध्ये सोळाव्या शतकाच्या अखेरीस व्यापाराच्या निमित्ताने झाला. हळूहळू तेथेही त्यांनी राजकारणात भाग घेण्यास सुरवात केली. १८८० पर्यंत फ्रेंचांचे व्हिएटनामच्या बाबतीत एक नक्की धोरण नव्हते. त्यानंतर मात्र साम्राज्यवादाच्या ईर्षेने ४ वर्षांत सारा देश जिंकून त्यांनी आपल्या साम्राज्याला जोडला. १९०७ पर्यंत त्यांनी शेजारचे लाओस आणि कंबोडिया हेही देश आपल्या साम्राज्याला जोडले. याच साम्राज्याला फ्रेंच इंडोचायना म्हणत. अंतर्गत बंडाळीला तोंड देत फ्रेंच १९४५ पर्यंत व्हिएटनाममध्ये टिकले. दुसऱ्या महायुद्धात जपानने आक्रमण करताच त्यांनी काढता पाय घेतला.

फ्रेंचांनी व्हिएटनामचे कोचीन-चायना, अन्ताम व टोंकिन असे तीन राजकीय विभाग केले. वास्तविक पाहता सबंध उत्तर व मध्य व्हिएटनामच्या प्रांताला पूर्वी अन्नाम म्हणत. हे अन्नमाईट लोक अतिशय दरिद्री पण शूर आहेत. फ्रेंच संस्कृतीचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला नाही. किंबहुना फ्रेंच संस्कृतीला ते हीन संस्कृतीच मानीत.

फ्रेंचांची व्हिएटनामला सर्वांत मोठी देणगी म्हणजे रोमन कॅथॉलिकाची. विशेषतः उत्तर व्हिएटनामच्या लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या फ्रेंचांच्या काळात रोमन कॅथॉलिक होती. या कॅथॉलिकांचा व्हिएटनामी इतिहासावर फार मोठा परिणाम झाला.

दरम्यानच्या काळात नगुयेन ऐ कॉस (हो चि मिन्ह) नावाच्या एका अतिशय बुद्धिमान अन्नमाईट कम्युनिस्ट कार्यकर्त्याने आपल्याभोवती बरीच मोठी संघटना केली होती. व्हिएटनाम स्वातंत्र्य संघटना (व्हिएतमिन्ह) असे तिचे नाव होते.

जपान्यांनी दुसऱ्या युद्धात शरणागती पत्करली आणि पाश्चात्त्यांच्या हाताखालील चिनी फौजांनी व्हिएटनाम जपान्यांकडून तात्पुरता ताब्यात घेतला आणि त्यांच्या हातून फ्रेंचांनी १९४६ च्या अखेरीपर्यंत परत घेतला.

## हो चि मिन्हचे स्वातंत्र्ययुद्ध

परंतु या युद्धाच्या काळातच हो चि मिन्हने आपल्या व्हिएटमिन्हच्या बळावर उत्तर व्हिएटनामच्या टोंकिन भागात आपले राज्य स्थापल्याचे घोषित केले. ताबड-तोब अन्नामचा राजा बाओ दाई याने हो चि मिन्हला पाठिंबा दिला. त्यामुळे फ्रेंचांनी बऱ्याचशा बंदरांचा ताबा घेतला तरी उत्तर व्हिएटनामचा बराच मोठा ग्रामीण विभाग व्हिएटमिन्हच्याच ताब्यात राहिला.

दक्षिणेत मात्र फ्रेंचांनी हिंदी फौजांच्या सहाय्याने भराभर ताबा मिळवून आपला कारभार पूर्ववत स्थापन केला. परंतु तेथेही बराचसा भाग पूर्णपणे फ्रेंचांच्या ताब्यात नव्हता. व्हिएटमिन्हचे बरेच प्राबल्य होते.

उत्तरेत व्हिएटमिन्हचा पाडाव करता येणे अशक्य आहे, हे बघून फ्रेंचांनी हो चि मिन्हशी करार केला. त्या करारान्वये व्हिएटमिन्हला फ्रेंच-इंडोचायनाच्या संघ-राज्यातील एक स्वतंत्र घटक-राज्य म्हणून मान्यता देण्यात आली. पण व्हिएट-मिन्हचे हे स्वातंत्र्य कितपत असावे याविषयी मतभेद निर्माण झाले आणि १९४६ च्या डिसेंबरमध्ये व्हिएटमिन्ह व फ्रेंच यांच्यात लढाईला सुरवात झाली.

सुरवातीला व्हिएटमिन्हच्या लढ्याला राष्ट्रीय लढ्याचे स्वरूप होते, पण चीन-मध्ये कम्युनिस्टांचे पारडे जड होताच हो चि मिन्हने आपल्या बिगर कम्युनिस्ट दोस्तांशी काडीमोड घेतली आणि हो चि मिन्हचा साम्यवाद विरुद्ध फ्रेंचांचा वसाहत-वाद असे प्रखर स्वरूप या युद्धाला आले.

त्याबरोबर फ्रान्सने अखिल मुक्तजगताचे कम्युनिस्टांपासून रक्षण करण्याची आण घेतलेल्या अमेरिकेला आपल्या मदतीस बोलाविले आणि अशारीतीने अमेरिकेचा व्हिएटनाममध्ये प्रवेश झाला.

लगोलग व्हिएटनामी जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी फ्रेंचांनी टोंकीन, अन्नाम आणि कोचीन–चायना या प्रांतांना इंडोचायनातून (लाओस, कांबोडिया व व्हिएट-नामचे फ्रेंच संघराज्य) बाहेर काढून व्हिएटनामचे नवे राज्यच निर्माण केले आणि

कम्युनिस्टांपासून फुटून निघालेल्या बाओ दाई या पूर्वीच्याच राजाला गादीवर बसविले.

परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाही. रोमन कॅथॉलिकांची जरी बाओ दाईवर निष्ठा होती, तरी दक्षिणेतील नवे पंथ मात्र फ्रेंचांच्या हेतूबद्दल साशंकच राहिले आणि फ्रेंचांना होणारा विरोध वाढतच गेला.

१९५४ च्या मध्याला फ्रेंचांचे व्हिएटनाममधील लष्करी सामर्थ्य एवढे खालावले, की युद्ध पुढे चालवणे त्यांना अशक्य झाले. व्हिएटमिन्हच्या गनिमी फौजांनी उत्तरेकडील जवळजवळ सर्व ग्रामीण भाग व्यापला होता आणि मोठ्या शहरांना वेढे दिले होते. उत्तरेकडील दियेन बियेन फू या शहरात व्हिएटमिन्हच्या फौजांनी फ्रेंचांना असे काही हाणले, की त्यांचे कंबरडेच मोडले. त्यांनी ताबडतोब तहासाठी हात पुढे केला आणि त्यातूनच सुप्रसिद्ध जिनिव्हा कराराचा जन्म झाला.

## जिनिव्हा करार

२१ जुलै १९५४ रोजी जिनिव्हा येथे झालेल्या या करारातच आजच्या व्हिएटनामच्या संघर्षाचे मूळ सापडते. करारान्वये १७ व्या अक्षांशाने व्हिएटनामचे उत्तर व दक्षिण असे ' तात्पुरते ' विभाग पाडण्यात आले. व्हिएटमिन्ह फौजांनी या रेषेच्या उत्तरेस व फ्रेंचांनी दक्षिणेस जमावे, असे ठरले आणि दोघांपैकी कुणीही परकीय मदत घेता कामा नये वा परकीय लष्करी तळही ठेवता कामा नये, असे मान्य करण्यात आले. नागरिकांना दोन्ही प्रदेशांत मुक्त संचार करता यावा आणि एक वर्षाच्या आत आंतरराष्ट्रीय निरीक्षणाखाली संपूर्ण व्हिएटनाममध्ये निवडणुका घेण्याचे निश्चित करण्यात आले.

फ्रेंच हाय कमांड, ब्रिटन, रशिया, चीन, व्हिएटमिन्ह, व्हिएटनाम, कांबोडिया आणि लाओस यांच्या प्रतिनिधींच्या करारावर सह्या होत्या.

करारातील युद्धबंदीविषयक परिच्छेदावर सही करण्याचे मात्र व्हिएटनामने (म्हणजे दक्षिण व्हिएटनामने) नाकारले.

त्यानंतर फ्रेंचांनी १९५६ च्या एप्रिलमध्ये आपल्या इंडोचायनातील सत्तेवर संपूर्ण पाणी सोडून फ्रेन्च हाय कमांड विसर्जित केल्याचे घोषित केले. अवघ्या एका शतकाच्या आत इंडोचीन फ्रेंच साम्राज्य आशियाई राष्ट्रवादाने संपुष्टात आणले.

जिनिव्हा कराराने देशाची फाळणी झाल्याचे मात्र व्हिएटनामी अन्नमाइटांना अतिशय दु:ख झाले. व्हिएटनामी सारे एक ही त्यांची प्रथमपासूनची धारणा. हो चि मिन्ह आणि बाओ दाई यांचे अनेक मतभेद होते. परंतु व्हिएटनामी एकतेच्या प्रश्नावर मात्र ते एक होते.

जिनिव्हा करारानंतरचा व्हिएटनामचा, विशेषत: दक्षिण व्हिएटनामचा इतिहास अतिशय गुंतागुंतीचा होत गेला.

## दियेमने जिनिव्हा करार धुडकावला

करारानंतर ताडतोब उत्तरेतील सुमारे ९ लाख लोकांनी (बहुतेक रोमन कॅथॉलिक) दक्षिणेत स्थलांतर केले, तर दक्षिणेतील सुमारे १ लाख लोकसंख्या उत्तरेत गेली.

दक्षिण व्हिएटनामच्या गादीवर पूर्वीचाच राजा बाओ दाई आला. त्याने नगो दिन्ह दियेम या कॅथॉलिक नेत्याला आपला पंतप्रधान नेमले. दियेमने १९५५ च्या ऑक्टोबरात निवडणुकांचा बनाव घडवून आणून दक्षिण व्हिएटनामचे गणराज्यात रूपांतर केले व स्वतःकडेच अध्यक्षपद घेतले.

राज्यावर येताक्षणीच आपण जिनिव्हा कराराने बांधलो नसल्याचे दियेमने जाहीर केले आणि उत्तर व दक्षिण व्हिएटनामच्या एकत्र निवडणुका घेण्यास साफ नकार दिला. उत्तर व्हिएटनामशी सर्व संबंध त्याने तोडून टाकले.

दियेमची राजवट अतिशय जुलमी होती. तो रोमन कॅथॉलिकांचा मोठा पक्षपाती होता आणि बौद्धांचा द्वेष्टा होता. गरीब शेतकऱ्यांचा त्याच्या राजवटीत फार छळ झाला. आपल्याभोवती नातलग, मित्रमंडळींचे एक मोठे वर्तुळ उभारून त्यांच्या हाती त्याने अनेक महत्त्वाची खाती सोपविली व कारभारात लाचलुपतीचा बुजबुजाट करून टाकला.

अशारीतीने जनतेत दियेमच्या राजवटीविरुद्ध असंतोष भडकत असतानाच व्हिएटकाँग (व्हिएटमिन्हचेच युद्धानंतरचे नाव) गनिमी सैनिकांच्या कारवायाही वाढू लागल्या होत्या. पद्धतशीरपणे एकेक खेडे ताब्यात घेण्याचे काम त्यांनी सुरू केले होते.

दरम्यान बौद्ध जनतेने एक फळी उभारून दियेमच्या जुलमी राजवटीविरुद्ध प्रचंड आंदोलन सुरू केले. विद्यार्थ्यांनी निदर्शनास सुरवात केली आणि दियेमने ही आंदोलने आणि निदर्शने क्रूरपणे दडपण्याचा प्रयत्न केला.

पण जनमत त्याच्याविरुद्ध भलतेच भडकले होते. बौद्धांच्या आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. लष्करातही असंतोष पसरला.

## असंतोषाचा स्फोट : अस्थिर राजवटी

शेवटी नोव्हेंबर १, १९६३ रोजी या असंतोषाचा स्फोट झाला. लष्करातील एक नेता लेफ्टनंट जनरल युआँग व्हान मिन्ह याने लष्करी क्रांती करून सत्ता आपल्या ताब्यात घेतली. दियेम आणि त्याच्या अनेक नातलगांना व सहकाऱ्यांना ठार करण्यात आले.

नोव्हेंबर, ६३ मध्ये दियेम सरकार उलथले आणि तेव्हापासून आजपर्यंत सुमारे अकरा राज्यक्रांत्या दक्षिण व्हिएटनाममध्ये झाल्या. त्यांतील सात लष्करी राज्यक्रांत्या होत्या. एक केवळ आठ तासांची फुसकी लष्करी क्रांती ठरली, तर दुसरी सुमारे दीड दिवस टिकली.

**अमेरिकेचे संरक्षणमंत्री मॅक्नामारा, द. व्हिएटनामचा औटघटकेचा पंतप्रधान कान्ह आणि अमेरिकेचे सायगावमधील माजी वकील जनरल टेलर**



**जनतेच्या हिताची पर्वा नसणारे, प्रतिगामी, सत्तालोलुप राज्यकर्ते हाताशी धरून अमेरिका चीनविरुद्धचे आग्नेय आशियातील युद्ध जिंकू पाहात आहे...कठीण आहे.**

*

या अवधीत एकही सरकार फार काळ स्थिर राहू शकले नाही, याला कारणे मुख्यत: तीन. एका देशातील राजकारणात नागरी गट आणि लष्करी गट असे दोन परस्परांशी स्पर्धा करणारे गट पडले. दोन : लष्करांतही दोन परस्पर भिन्न विचारप्रवाहांचे गट होते आणि त्यांच्यातही सत्तास्पर्धा चुरशीला पोचली होती.

तिसरे आणि सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे पहिले जनरल मिन्हचे सरकार सोडता दुसरे कोणतेही सरकार लोकप्रिय नव्हते. अगोदरच बहुसंख्य जनता व्हिएट-काँगच्या ताब्यात होती. उरलेल्या लोकांच्या पसंतीसही ही सरकारे उतरली नव्हती.

व्हिएटनामला मदत करण्याच्या उद्देशाने आलेले आणि दिवसेदिवस व्हिएटनामी राजकारणातील आपले महत्त्व वाढवीत असलेले अमेरिकन सरकारदेखील यांतील बऱ्याच राज्यक्रांत्या घडवून आणण्यामागे असल्याचे बोलले जाते. सरकार पुरेसे कम्युनिस्टविरोधी असावे, हा अमेरिकेचा हट्ट. या आपल्या हट्टापायी अमेरिकेने आपल्याला हव्या असलेल्या व्हिएटनामी नेत्यांना हवे ते गुण चिकटवून त्यांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला.

दियेमची राजवट प्रचंड लोकप्रिय असल्याचा अमेरिकन सरकारने इतका भरघोस

प्रचार केला, की बौद्धांची त्या राजवटीविरुद्ध प्रचंड आंदोलने आणि आत्माहुतीची सत्रे सुरू झाल्यावर अमेरिकन जनतेला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याबरोबर अमेरिकन सरकारने समर्थन केले, की शहरी भागांत नसली तरी ग्रामीण भागांत दियेमची लोकप्रियता अमाप आहे. पण त्याच कालखंडात ७५ टक्के खेडी व्हिएट-काँगच्या ताब्यात होती !

## व्हिएटकाँगच्या लोकप्रियतेचे रहस्य

जिनिव्हा करारात दक्षिण व उत्तर व्हिएटनाममध्ये सार्वत्रिक निवडणुका घेऊन व्हिएटनामचे एकत्रीकरण करण्याची जी तरतूद होती, त्या योजनेला पाठिंबा देणारी

---

सायगावमधील ११ जून १९६३ ची ती दुपार होती. लख्ख ऊन पडले होते आणि दक्षिण व्हिएटनामच्या त्या राजधानीच्या एका प्रमुख चौकाच्या मध्य-भागी भगवी वस्त्रे धारण केलेला एक ७३ वर्षे वयाचा बौद्ध संन्यासी उभा होता. त्याच्याभोवती सुमारे हजार बौद्ध संन्यासी आणि जोगिणी कडे करून उभे होते आणि कसले तरी धीरगंभीर मंत्र एकसुरात गात होते.

हा काय प्रकार आहे हे बघण्यासाठी भोवताली गर्दी जमू लागली. पोली-सही आले. पुरेशी गर्दी जमताच वर्तुळाकार कड्यातील बौद्ध संन्यासी आणि जोगिणींनी आपल्या हातातील घोषणा–फलक उंच केले. "व्हिएटनामच्या स्वातंत्र्याचा विजय असो," "दियेमच्या जुलमी राजवटीचा धिक्कार असो," अशा घोषणा त्यावर होत्या.

इतके होते न होते तोच मध्यभागी उभ्या असलेल्या त्या वृद्ध संन्याशाने आपल्या अंगावर पेट्रोलचा संपूर्ण डबा रिकामा केला आणि स्वतःच्या हाता-नेच स्वतःला पेटवून घेतले. हा हा म्हणता ज्वाळा भडकल्या. ते बघताच पोलीस कडे तोडून आत जाण्याचा प्रयत्न करू लागले, पण ते आत पोहोचले तेव्हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्माहुती देणाऱ्या त्या वृद्ध बौद्ध संन्याशाच्या देहाची राख होऊन गेली होती.

त्या संन्याशाचे नाव होते थिच काँग डुस. या एका आत्मसमर्पणाने अवघी व्हिएटनामी जनता पेटली आणि त्या देशात दियेमच्या जुलमी राजवटीच्या निषेधार्थ आत्माहुती देण्याचे सत्रच सुरू झाले आणि त्यामुळेच दियेमविरुद्ध त्याच्या देशात केवढा असंतोष पसरला आहे, हे साऱ्या जगाला कळून चुकले.

दियेम रोमन कॅथॉलिकांचा पक्षपाती आणि बौद्धांचा द्वेष्टा म्हणून बौद्धांनी त्याच्याविरुद्ध निदर्शने केलीच, पण त्यानंतरही बौद्धांनी दक्षिण व्हिएट-नामच्या राजकारणावर बराच प्रभाव पाडला. विशेषतः जन. खान पंतप्रधान हुआंग यांच्या विरुद्धचे लोकमत बौद्ध संन्याशांनीच तयार केले. बौद्धांनी अमेरिकन धोरणाविरुद्धही अनेक निदर्शने केली.

---

फार मोठी लोकसंख्या दक्षिण व्हिएटनाममध्ये होती. दियेमने ही तरतूदच धुडकावून लावली. शिवाय दियेमने देशासाठी, सामान्य शेतकऱ्यांच्या विकासासाठी काहीच केले नाही. एवढेच नव्हे तर मोठ्या जमीनदारांच्या फायद्यासाठी छोट्या शेतकऱ्यांवर अत्यंत जाचक निर्बंध लादले. त्यामुळे दक्षिण व्हिएटनामच्या ग्रामीण भागांत फार मोठा असंतोष माजला.

या असंतोषातूनच व्हिएटकाँगचा जन्म झाला असे म्हणावयास हरकत नाही. जिनिव्हा करारानंतरही कम्युनिस्ट व्हिएटमिन्हचे बरेच सैनिक दक्षिणेतच राहिले, तरी १९५७ पर्यंत त्यांच्या काहीच कारवाया नव्हत्या. दियेम राजवटीचा जाच असह्य होत गेला, तेव्हाच व्हिएटकाँगला अधिक वळकटी येऊ लागली. त्यामध्ये असंतुष्ट शेतकरी सामील होऊ लागले. दियेमच्या जुलमी छळांना कंटाळलेल्या ॲनिमिस्ट आणि इतर जातीजमाती व्हिएटकाँगभोवती एकवटू लागल्या.

व्हिएटकाँगचे प्रमुख उद्दिष्ट आहे, सारा दक्षिण व्हिएटनाम ताब्यात घेऊन त्याचे उत्तर व्हिएटनामशी एकीकरण घडवून आणणे आणि त्या दरम्यान ताब्यात घेत-लेल्या खेड्यांतील जमिनीचे फेरवाटप करून छोट्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे.

अमेरिकेच्या मते व्हिएटकाँग ही कम्युनिस्ट उत्तर व्हिएटनामने निर्माण केलेली कम्युनिस्ट संघटना असली, तरी अनेक निःपक्षपाती निरीक्षकांच्या मते ती एक स्वतंत्र संघटना आहे आणि त्यात फक्त ५० टक्के कम्युनिस्ट आहेत.

व्हिएटकाँगच्या मागे आहे नॅशनल लिबरेशन फ्रंट नावाची एक राजकीय आघाडी. नगुयेन हू थो हा सायगावमधील एक माजी वकील त्या आघाडीचा अध्यक्ष आहे.

## व्हिएटकाँगचे युद्धतंत्र

व्हिएटकाँगचे स्वतःचे असे खास युद्धतंत्र आहे. खेडी व्हिएटकाँगचे बालेकिल्ले. खेड्यातील लोकांची मने वळवून त्यांना आपल्यात सामावून घ्यावयाचे. न जमल्यास खेड्यांतील सरकारी अधिकाऱ्याला सरळ ठार करून खेडे ताब्यात घ्यावयाचे.

अशारीतीने दक्षिण व्हिएटनाममधील ऐंशी टक्क्यांच्या वर खेडी व्हिएटकाँगच्या पूर्णपणे ताब्यात आहेत. इतकेच नव्हे तर या ग्रामीण विभागांतून अतिशय कार्यक्षम अशी करवसुलीची योजनाही त्यांनी उभारली आहे. या वसुलीतून ते शाळा आणि वृत्तपत्रे चालवितात.

शहरांच्या भोवतालची सर्व खेडी ताब्यात घेऊन शहरांची नाकेबंदी करणे आणि नंतर शहरे जिंकणे हे व्हिएटकाँगचे उद्दिष्ट, पण व्हिएटनाममधील बहुतेक महत्त्वाची शहरे समुद्रकाठी वा नदीकिनारी वसली असल्याने व्हिएटकाँगला अद्यापि शहरांच्या वाटेला फारसे जाता आले नाही. तरीदेखील मोठमोठ्या विमानतळावर छुपे हल्ले करणे, शहरातल्या हॉटेलांत आणि सार्वजनिक जागी बॉम्ब् पेरणे आदि घातपाती कृत्ये मात्र चालूच आहे.

व्हिएटकाँगने आपल्या कारवायांना १९५७ मध्ये सुरवात केली. ५७ मध्ये



**सायगावच्या कुठल्यातरी आलिशान 'नाईट क्लब'मध्ये मंद संगीताच्या तालावर चांदण्या रात्रीच्या गोड नशेत प्रेमी युगलांचे बेहोष नृत्य रंगात येत असते आणि अचानक धडाड् धुम् होऊन मद्याऐवजी रक्ताचे पाट वाहू लागतात.**

*

त्यांनी ग्रामीण भागांतील ४७२ सरकारी अधिकारी आणि जमीनदारांना ठार केले. ५८–५९ मध्ये हे प्रमाण दुपटीने वाढले. १९६० मध्ये दर आठवड्यास १५ आणि १९६१ मध्ये दिवसाला १० असे हे ठार करण्याचे प्रमाण गेले.

उत्तर व्हिएटनामातील हो चि मिन्ह सरकारचेही दक्षिण व उत्तर व्हिएटनाम एक व्हावे हेच स्वप्न. त्यासाठी १७ वा अक्षांश ओलांडून आपले सैन्य दक्षिणेत घुसविण्याचा प्रयत्न हो चि मिन्हने कधीच केला नाही. प्रत्यक्ष युद्ध करण्यापेक्षा त्याने अधिक सोपा मार्ग स्वीकारला. दक्षिण व्हिएटकाँगच्या कारवायांना अधिक जोर येण्यासाठी त्याने उत्तरेतून त्यांच्या मदतीसाठी माणसे, पैसा आणि शस्त्रात्रे १९६२ नंतर पाठविण्यास सुरवात केली. ही सारी मदत १७ व्या अक्षांशातून न जाता उत्तर व्हिएटनामातून लाओस, कांबोडियाच्या प्रदेशातून दक्षिणेत शिरते, असा अमेरिकनांचा दावा आहे.

व्हिएटकाँगच्या कारवायांबरोबरच त्यांचे सैन्यही वाढत गेले. सैन्याची संख्या १९६० मध्ये १० हजार होती. ६१ मध्ये ती दुप्पट झाली. १९६२ मध्ये ती ३२ हजारांवर गेली आणि आता पाऊण लाखांच्या आसपास ती गेल्याचा अंदाज आहे आणि जवळजवळ तेवढ्याच भूमिगत व्हिएटकाँगची त्यांना मदत आहे.

व्हिएटकाँगच्या या गनिमी सैन्याशी जमिनीवर लढणे अमेरिकन मदतीनिशीसुद्धा दक्षिण व्हिएटनामच्या सैन्यास कठीण आहे. कारण व्हिएटकाँगने स्वतंत्र केलेल्या



अमेरिकेच्या आश्रयाने लढणारे दक्षिण व्हिएटनामी सैनिक...

*

ग्रामीण विभागांचे कप्पे देशात सर्वत्र ठिकठिकाणी विखुरले आहेत. कोणते खेडें सरकारच्या ताब्यात आहे आणि कोणते स्वतंत्र, हे कळत नाही.

## जमिनीवर अमेरिका पराभूत

सुरवातीला अमेरिकन लष्करी अधिकारी केवळ सल्लागार म्हणून येत असत. पुढे जेव्हा व्हिएटकांगच्या कारवाया वाढल्या, तेव्हा हे 'सल्लागार' मोठ्या प्रमाणावर आधुनिक शस्त्रास्त्रे घेऊन येऊ लागले. इतके करूनही व्हिएटकांग आटोक्यात येत नाही, असे बघून मग अमेरिकेने सरळ आपले पायदळच दक्षिण व्हिएटनाममध्ये पाठविण्यास सुरवात केली. आज तेथील अमेरिकन लष्कराची संख्या पंचाहत्तर हजारांच्या वर गेली आहे. व्हिएटनामनेही आपल्या सैन्याची संख्या दीड लाखावर नेली.

संघर्षामध्ये १९६३ साली दक्षिण व्हिएटनाम सरकारचे २१,००० सैनिक व अमेरिकेचे ५०० सैनिक जखमी अथवा मरण पावले. हाच आकडा १९६४ मध्ये



अखंड व्हिएटनामसाठी लढणारे व्हिएटकाँग बंडखोर...

*

२९५०० आणि ११७२ असा गेला; पण व्हिएटकांगच्या जखमी अथवा मृतांचा ६३ सालचा २५००० चा आकडा ६४ साली २१२०० वर उतरला.

तेव्हा जमिनीवर युद्ध जिंकणे कठीण म्हणून आणि उत्तर व्हिएटनामने व्हिएट-काँगची कुमक थांबावावी, व्हिएटकाँगने आपले हल्ले थांबवावेत व उत्तर व्हिएटनामने वाटाघाटीसाठी तयार व्हावे, म्हणून उत्तर व्हिएटनामवर हवाईहल्ले चढविण्याचा मार्ग अमेरिकेने अखेरीस स्वीकारला.

## रशिया–चीनची भूमिका

अमेरिकेच्या हवाईहल्ल्यांनी या युद्धाचे स्वरूप अधिकच चिघळून ठेवले आहे. उत्तर व्हिएटनाममधील निरपराध नागरिकांवर होत असलेले बॉम्बहल्ले पाहून खुद्द अमेरिकेतील जनताच जॉन्सन यांच्यावर चिडली आहे, तर रशिया, चीन या कम्युनिस्ट राष्ट्रांनी उत्तर व्हिएटनामकडे अधिक सहानुभूतीने पाहणे स्वाभाविकच आहे. रशियाने जरी युद्ध न वाढविण्याची हमी अमेरिकेला दिली असली तरी रशियाच्या अग्निबाणांचे तळ उत्तर व्हिएटनामात उभारले जात असल्याच्याही बातम्या येतच आहेत.

चीनची भूमिका मात्र याबाबतीत निश्चित स्पष्ट झाली नाही. उत्तर व्हिएटनाम हे केवळ चीनच्या दयेवर जगणारे उपग्रहासारखे राष्ट्र आहे, हा समज मात्र आता दूर होऊ लागला आहे. हो चि मिन्हने आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने उत्तर व्हिएटनामला एक नवेच रूप दिले आहे. आपल्या देशाला तो चीनपासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे, हे स्पष्ट झाले आहे. चीन मात्र सारख्या डरकाळ्या फोडीत आहे आणि युद्ध वाढल्यास आमचे ' स्वयंसैनिक ' आम्ही युद्धात उतरवू, अशा धमक्या देत आहे.

दक्षिण व्हिएटनाममधील या धुमसत्या कलहाचा जर अचानक भडका उडाला, तर साऱ्या आशियाचेच रणक्षेत्रात रूपांतर झाल्याशिवाय राहणार नाही. भारताला

ते नको आहे. तसेच दक्षिण व्हिएटनाममध्ये तेथील अप्रिय राजवटीच्या रक्षणास आपले सैन्य ठेवून अमेरिकेने उत्तर व्हिएटनामवर हल्ले करावे आणि तेथील निरपराध नागरिकांच्या जीवांचा खेळ करावा हेही भारताला पसंत नाही. अमेरिकेने उत्तर व्हिएटनामवरचे हवाईहल्ले आधी ताबडतोब बंद करावेत, असे पंतप्रधान शास्त्री यांनी स्पष्टपणे सांगून टाकले ते यासाठीच.

दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांची मात्र अतिशय केविलवाणी स्थिती झाली आहे. उशिरा का होईना पण शहाणपणा म्हणून आता तरी दक्षिण व्हिएटनाममधून सपशेल माघार घ्यावी असा उघड सल्ला खुद्द अमेरिकेतीलच बडे बडे मुत्सद्दी आणि पत्रपंडित एकीकडे जॉन्सनसाहेबांना देऊ लागले आहेत, तर दुसरीकडे सरळ उत्तर व्हिएटनामची राजधानी हनोई या शहरावरच हवाईहल्ले करावेत, असे काही सेनाधिकारी सुचवू लागले असल्याच्या वार्ता आहेत. जॉन्सनसाहेबांना झोप येत नाही. पहाटे तीन तीन वाजेपर्यंत युद्धाचे ताजे संदेश ते जातीने ऐकत असतात, संदेश धाडीत असतात आणि आपल्या सहकाऱ्यांशी व्हाईट हाउसमध्ये चर्चा करीत बसतात. रोज किती अमेरिकन विमाने पडली व किती अमेरिकन्स गारद झाले याचा हिशेब करीत असतात.

असे आहे व्हिएटनामचे युद्ध. कुणालाच ते नको आहे, पण दोन्ही पक्ष माघार घ्यायला तयार नाहीत. उलट युद्धाच्या चिखलात ते अधिकाधिक रुतत चालले आहेत.


युद्ध संपेल तेव्हा संपो. परंतु व्हिएटनामच्या त्या भातशेतांत भरून राहिलेली कुजलेल्या प्रेतांची दुर्गंधी आणि बंदुकीच्या दारूचा उग्र दर्प व्हिएटनामी जनतेच्या पिढ्यापिढ्यांना या रक्तमय संघर्षाची सतत याद देत राहतील, हे निश्चित. ●

---

व्हिएटनामी लोक चिन्यांना आपले पारंपारिक शत्रू समजतात. गेल्या दोन हजार वर्षांच्या कालावधीत चिन्यांनी १५ वेळा व्हिएटनाम आक्रमिला आणि सुमारे एक हजार वर्षे व्हिएटनाममध्ये राज्य केले. परंतु दर वेळी व्हिएटनामी राजे, बंडखोर, क्रांतिकारक यांनीच अंतर्गत कटकटींतून सुटकेसाठी चिन्यांना साह्याची आमंत्रणे दिली. अशा दर वेळी व्हिएटनाममध्ये चिनी आले, ते बरोबर प्रचंड सैन्ये घेऊन आणि व्हिएटनाममधील राज्यच बळकाविले आणि दर वेळी व्हिएटनाम्यांनी त्यांना जेव्हा हाकलून लावले, तेव्हाच ते परत गेले.

उत्तर व्हिएटनामचे अध्यक्ष डॉ. हो चि मिन्ह यांनी दोन वर्षांपूर्वी चीनची आर्थिक मदत मागवली. त्याचे समर्थन करताना ते म्हणाले, " व्हिएटनामी जनता आणि चिनी जनता यांमध्ये सतत प्रेमाचे आणि मित्रत्वाचे नाते होते. चिनी साम्राज्यवादी हेच खरे या दोन देशांतील जनतेचे शत्रू होते."

हे जरी खरे असले, तरी उत्तर व्हिएटनाममधील बहुसंख्य जनता चीनची मदत स्वीकारावयास नाखूष होती, हेही खरे आहे.




## यांचा आधार तुम्ही... तुमचा आधार आयुर्विमा...

तुमच्या कुटुंबातल्या बायका मुलांना तुम्ही म्हणजे सर्वस्व असता. कोणताहि प्रश्न निर्माण होवो, कोणतीहि अडचण येवो तुम्ही ती दूर कराल अशी त्यांची खात्री असते. खरोखर, तुम्ही त्यांचे आधार आहांत. पण तुमचा आधार कोण ? तुम्ही असा वा नसा तुमच्या वरच्या संसाराच्या जबाबदाऱ्या निश्चितपणे पार पाडील असा तुमचा आधार कोण ? —आयुर्विमा. एकमेव आधार आयुर्विमा. आजच तुमच्या विमा एजंटाचा सल्ला घ्या...,

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं.

Pratibha/M/65-1 b

आजपर्यंत वाड्यात पठाण आला नव्हता. यावेळी पठाण आला. वाड्याचे मालक गडबडले. पठाण काही चांगल्या कामाकरता येऊ शकतो. हे त्यांच्या अकलेबाहेरचे होते.



# बादशा

दि. त्र्यं. कुलकर्णी

" क्यूं वच्च्चा आया, " बादशाने गजाची दखल घेतली.

" कैसे हो ? अच्छा है ना ? खाना खाया ? " आपला रुंद गोरा पंजा केसांच्या झुलपात खुपसून बादशा म्हणाला. एका अरुंद तरटीवर गजा बसला. बादशाने त्याच्या पुढ्यात जमाखर्चाच्या वह्या टाकल्या. वातीवर जळणाऱ्या चिमणीच्या धुरकट, काजळी प्रकाशात दोघांचे काम सुरू झाले. बादशा वसुलीच्या रकमा सांगे.

" वच्चा लिखो, गंगू पाटीवाली व्याज दो रुपिया. बोवा पेपरवाला, बीस व्याज मुद्दल सभ खतम्. तरकारीवाली व्याज आठ आना. बाबू हजाम खाली दो रुपिया. "

गजा खातेवार रकमा जमा करी. बादशा आठवून आठवून सांगे. सोमवार ते शुक्रवारपर्यंतच्या व्यवहाराचा जमाखर्च गजा दर शनिवार व रविवारी रात्री येऊन करायचा.

हमरस्त्यास लागून एका बोळकंडीतल्या मुसलमान मोहोल्ल्यात बादशा राहायचा. घराच्या तळमजल्यावर एका व्यापाऱ्याचे गुदाम होते. वरची चार खणी माडी दहाबारा पठाणांनी भाड्याने घेतलेली होती. ही मठी दिवसा क्वचितच उघडी असायची. रात्री मात्र येथे गप्पा–गोष्टी, हशा यांचा आवाज घुमे. मोडक्या तोडक्या हिंदी–मराठीचा वापर करून हे सारे पठाण व्याजाचा धंदा करायचे व रात्री मठीत आले, की मायबोलीत आपले मन मोकळे करायचे. भसाड्या आवाजात हेल काढून गायचे, किस्से सांगून एकमेकाला खदखदून हसवायचे व हसायचे. क्षणभर पेशावर-कडील आपल्या गावातल्या घरीच आहोत, असं त्यांना वाटायचं.

घसा खरवडून तोंडाबाहेर पडलेले भसाडे पुश्तू शब्द अक्रोडाप्रमाणे ओबडधोबडच असायचे. पण रात्रीच्या वेळी मठीत या शब्दांची फेकाफेक सुरू झाली, की ऐक-णारास क्षणभर आपण पठाणांच्याच गावी तर नाही ना असं वाटायचं.

बादशा पठाणाचा जमाखर्च गजा गेले आठ–दहा महिने लिहीत होता. बादशाचे सर्व जातभाई या ' वच्च्या 'ला चांगले ओळखायचे.

गजा व बादशा कामात गर्क झाले होते. मध्येच एक पठाण हसत आला. बादशाला काहीतरी नवा किस्सा त्याला सांगायचा होता. जवळजवळ ओढूनच बादशाला त्याने पलीकडे नेले. थोड्याच वेळात आपला अवाढव्य देह हलवीत, कपाळावरील झुलपे सारीत बादशा खूप मोठ्याने -हसू लागला. गजालाही हसू आवरेना.

बादशाच्या सहवासात गजाला त्याच्या स्वभावाची चांगली पहचान झाली होती. त्याच्यासमोर हसणारा बादशा पिळदार होता, तसा दिलदारही होता. पेशावरकडून त्याच्या बिबीने एकदा त्याला काही पदार्थ व सुकामेवा पाठविला होता. रात्री लिहिणे झाल्यावर आठवणीने, "बच्च्या, ये लो," म्हणून बादशाने अक्रोड–बदामाने भरलेली बटव्यासारखी मळकट पिशवी गजा 'नको,' 'नको' म्हणत असताही त्याला दिली होती. त्यावेळी व दुसऱ्या कित्येक प्रसंगात बादशाचे बदामी 'दिल' गजाने पाहिले होते. हा पेशावरी बादशा आपल्यावर एवढा खूष आहे, याचा गजाला पुष्कळदा अभिमान वाटायचा–दारिद्र्यात तो त्याचा आधार होता.

बादशा पुन्हा बोलू लागला,

"बच्च्या, सकीना रंडीका हिसाब बोलो. मामू बुड्ढेका खाता निकालो."

या वाक्यांची वसुली फार दिवस थकली होती.

"बइमान चोर," बादशा गुरगुरला.

गजाने "सकीना साठ, मामू पंचवीस, भेळवाला बारा रुपये," असे सांगून वायद्याच्या तारखा सांगितल्या.

नाठाळ कुळांना बादशा हिंदी–पुश्तुमिश्रित शिव्या हासडायचा. सकीनाकडले पैसे बुडणार या चिंतेने बादशाला घेरलं होते.

"पठाणका रुपिया लेकर भागते है ये बइमान रंडी–डंडा देखा नही." बादशा चिडून बोलत होता.

सकीना दोन महिने तिच्या पत्त्यावर भेटत नव्हती. बादशा भिंतीला टेकून किलकिले डोळे करून काहीतरी निर्णय घेत होता. चिमणी काळसर धूर ओकीत होती. मठीतील इतर पठाण पथाऱ्या टाकून झोपण्याच्या तयारीला लागले. त्यांनी दिवे घालविले. खोलीत अंधार दाटला. बादशासुद्धा पेंगल्यासारखा झाला. काहीही झाले तरी बादशाला आज विचारायचेच, हे गजाने घरून निघतानाच ठरविले होते, पण—

बादशाच्या मुद्रेकडे बघून गजाच्या पोटात कालवाकालव होत होती.

"श्रावणातल्या चौथ्या मंगळवारी तरी मंदाची पहिली मंगळागौर झाली पाहिजे," असे जेवताना आई म्हणाली. "दारिद्र्यातही बायकांना हौस–मौज, सणवार कसे सुचतात!" हे आपले शब्द तिला झोंबले होते; पण नंतर आपण तिला पुढील आठवड्यात नक्की व्यवस्था करतो, असे सांगून दिलासा दिला होता. हा दिलासा

दिलावर बादशाच्या भरोशावर दिला होता, हे गजाला आठवलं. पोटात कालवलं जात होतं. हा भडकलेला बादशा कसलं आपलं काम करणार!–दारिद्र्य, एकुलत्या एका बहिणीची हौस–वृद्ध आईवडलांच्या उतारवयातला मुलाबाळांचा प्रपंच–मॅट्रिक नाही म्हणून अर्धवट शिपायी व अर्धा कारकून अशी नोकरी–बहिणीच्या लग्नासाठी झालेल्या कर्जाची फेड–एकामागून एक कल्पना अंतःकरणाचा ठाव घेत होत्या. रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते.

"बच्च्या, अभी बस्स्. कल आव." बादशाने गजाला भानावर आणले. एका लांबुडक्या डबीतून बादशाने तंबाखूची एक गोळी काढली. खालचा ओठ पुढे ओढून खालचे दात व ओठ यांच्यामध्ये ठेवली. काहीतरी आठवल्यासारखे करून तो पुन्हा म्हणाला,

"बच्च्या, कल मत आओ. अगले शनिवारको आओ."

गजा थिजला. उठायला हवं होतं, पण तसाच घुटमळून बसला. बादशाला कळेना. क्षणभर थांबून त्याने खिशातून एक पावली काढली. "बच्च्या, चाय लो," असे म्हणत ती त्याने गजापुढे टाकली. आपल्या थांबण्याचा अर्थ बादशाने भलताच केल्याबद्दल गजाला वाईट वाटले. पगाराशिवाय अशा पावल्या बादशाने चहापाण्यासाठी कितीतरी वेळा गजाला दिल्या होत्या; पण आजची त्याला घेववेना. सारा धीर एकवटून गजा म्हणाला,

"बादशा, मला साठ रुपये हवेत. मी व्याज देईन. तूर्त पगार देऊ नकोस वाटलं तर. फार नड आहे."

"साठ रुपिया? बच्च्या, कहाँ भाग जानेका है? इतने रुपिये तुझे देकर मेरा धंदा कैसा चलेगा?"

"नको बादशा, नाही म्हणू नकोस. मी बुडवणार नाही. तू सांगशील ते काम करीन." गजा दीनवाणा होऊन एकेक शब्द उच्चारीत होता. त्यातली लाचारी पीळ पाडणारी होती.

"बादशा," कोपऱ्यातल्या एका पठाणाने हाक मारली. बादशा उठला. गजाचा धीर सुटला. बादशा गजाकडे पाहात होता. त्याच्या डोळ्यांत करुणा होती.

"बच्च्या, रात हो गयी. शनिचर आओ, रुपिये देगा." हसून खिडकीबाहेर तंबाखची पिचकारी टाकता टाकता बादशा बोलला. त्याच्या शब्दांत वायदा होता. हसण्यात दिलदारी होती. त्याने गजाच्या पाठीवर थाप मारीत म्हटले,

"जावो, बच्च्या फिकर मत कर."

गजा मोहोरून गेला.

अंधाऱ्या बोळातून झपाझपा पावले टाकीत गजानन मोठ्या रस्त्यावरील दिव्याच्या खांबापाशी येऊन थांबला. बारीक पाऊस येत होता. गजानन प्रसन्न दिसत होता. त्याला प्रसन्न करणारा बादशा त्याच्या डोळ्यांपुढून जाईना. कोण, कुठला

हा ? या कठीण प्रसंगात याची माणुसकी आपल्यासाठी कशी झाली ? गजाला हे काही कळेना.

कठीण प्रसंगात शेजारी-पाजारी, नात्या-गोत्याची माणसं आपली अब्रू मोडीच्या भावात प्रतिष्ठितपणे घेतात. समाज त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो, पण जबर व्याज देऊन पठाणाचे कर्ज काढले, तर लब्धप्रतिष्ठित लोक गरिबाला अपराधी ठरवितात. त्याच्या अब्रूचा लिलाव करतात. पठाणाला बदनाम करतात. समाजात बादशाहून कितीतरी निर्दयी पठाण आहेत! – पण ते प्रतिष्ठित आहेत.

विचार करणारं मन आणि वहाणेचा तुटलेला बंद गजाला वेगाने चालू देत नव्हता. घरी परतताना गजापाशी आज पठाणाचा शब्द होता– कितीतरी दिवसांनी आईचा हसरा चेहरा बघायला मिळणार होता ! घरी आल्यावर तो म्हणणार होता–' करा तयारी मंदाच्या मंगळागौरीची ! ' पुढच्या रविवारी आईजवळ पैसे दिले म्हणजे झालं– नानांना मुंढव्यास पाठवलं म्हणजे मंदाच्या सासरी निमंत्रण देतील– एक ना दोन अनेक विचारांची चाकं गजाच्या मनात फिरत होती.

पाठीमागून ' गजानन ' अशी हाक कानावर येताच गजा थांबला.

" गजाभाऊ, पठाणाच्या घरातून बाहेर पडताना तुला पाहिलं. माझं काम करून तुझा पाठलाग केला. गजाभाऊ, हा रस्ता फार वाईट आहे. नाना-वहिनी अब्रूत गरिबी भोगत आहेत. तुला फार मार होतोय् खरं, पण विचार कर. " मामा तांबट बोलत होते– " तांब्या-पितळेची मोड, " असा केविलवाणा आवाज काढून सकाळपासून संध्याकाळपर्यंत अनवाणी हिंडणारा देवभोळा तांबट नानांचा मित्र होता. उद्याचा बादशाचा वायदा चुकला, तर बादशा घरी येईल, या भीतीने मामा रात्रीच त्याला पुढील वायदा सांगण्यास गेले होते.

" गजानन, हा पैसा फार वाईट आहे. क्षणाची वेळ भागते, पण जन्माची इज्जत जाते. " मामांच्या तोंडावर गजाबद्दलची करुणा ओसंडत होती. नानांची व मामा तांबटाची जुनी दोस्ती. अजून कधी कधी कीर्तनाला दूरदूरच्या देवळात दोघे बरोबर जातात. आळीतल्या देवळात, गुरवारच्या भजनात तर मामांचा एखादा अभंग हमखास रंगायचाच.

" मामा, नानांना सांगू नका. मी बादशाचा जमाखर्च लिहीत असतो, दर शनिवार-रविवार रात्री. मला त्याच्याकडून कर्जाऊ रक्कम आणायची नाही. माझ्या घरी तो कधीच यायचा नाही, पण तुम्ही चुकूनसुद्धा नानांना सांगू नका. "

" गजानन, म्हाताऱ्या आई-नानांसाठी करीत आहेस ते काही वाया जायचं नाही. पांडुरंग तुझं कल्याण करील. सांभाळून राहा म्हणजे झालं. " मामा तांबट अनवाणी तुरुतुरू निघून गेले.

गजा आदम पानपट्टीवाल्याच्या दुकानापाशी येऊन थांबला. आदमचा हा ठेपा म्हणजे गजाच्या रोजच्या जीवनातला विरंगुळा. रोज रात्री दहाच्या सुमारास या

ठेप्यावर अप्पा कंपॉझिटर, बाबूराव मेस्त्री, दत्तोबा फोरमन यांच्या संगतीत तो दारिद्रय व विफलता यांचं दुःख विसरायचा. बरोबरीचे बहुतेक मित्र मॅट्रिक व पदवीधर होऊन नोकरी व संसारात रमत होते. गजाननला विद्या नाही. चांगली नोकरी नाही. वृद्ध आईवडिलांच्या उतारवयातल्या संसाराचा भार मात्र त्याला वाहावा लागत होता. व्यापारात नानांची अंबारी उलटी झाली. ते देशोधडीला लागले. एकुलती एक बहीण आणि दोन भाऊ यांची जबाबदारी गजावर पडली.

नानांच्या फाटलेल्या संसाराला गजा ठिगळं देत होता. तो त्यांचा विघ्नहर्ता होता. संपत्ती होती, तेव्हा गजा लहान होता. त्याचे भोगण्याचे वय आले, तेव्हा संपत्ती गेली. उतारवयात देवाने नानांना संपत्ती दिली. कठोर दैवाने म्हातारपणीसुद्धा संसाराला हातभार लावण्यासाठी मारवाड्याच्या दुकानात जमाखर्च लिहिण्याची वेळ नानांवर आणली. चाकं उलटी फिरत होती सारी. पंचवीस–तीस रुपयांचा किराणा झुंबर मारवाडी द्यायचा. थरथर कापणाऱ्या बोटांनी कीर्द लिहिणारे नाना संसार सावरीत होते.

" आदम, आज जोशीबुवा आले नाहीत वाटतं ? " गजाने पान चघळीत चघळीत विचारले. या ठेप्यावर गजाला प्रतिष्ठित समाजात दुर्मिळ असलेली माणुसकी मिळायची. आदम, अप्पा, जोश्या, दत्तोवा हे धंद्याने कनिष्ठ परंतु माणुसकीने ज्येष्ठ मित्र गजाच्या रूक्ष, भकास जीवनात माणुसकीने ओलावा आणीत होते.

" काय गजाभाऊ ! बादशा काय म्हणतो, " आदमने विचारले.

बादशाचे काम आदममार्फतच गजाला मिळाले होते.

" बादशा म्हणजे खरंच बादशा आहे ! " गजाने पिचकारी मारून जवळच्या बंद झालेल्या दुकानाच्या फळीवर बसकट मारली. मधूनमधून येणाऱ्या गिऱ्हाइकांना आदम पान द्यायचा व गजाशी गप्पा मारायचा.

" बालबच्चेवाला नेक पठाण आहे तो, गजाभाऊ. बिब्बीवर त्याचा फार जीव आहे ! तो काही तुझा हरामखोर घरमालक नाही. " आदम तंबाखू चोळीत म्हणाला.

" आदम, हा बादशा आपल्या गावाकडे कधी जातो की नाही ? "

" अरे, वर्षापूर्वीच तो जाऊन आला, " आदम सांगू लागला. " त्याला नवा बच्चा झालाय. पेशावरजवळच्या एका पहाडी मुलखात त्याचा गाव आहे. थोडी शेती आणि सुकामेव्याचे उत्पन्न आहे. त्याची बिबी अन् मोठा मुलगा बघतो त्याच्याकडे. "

" हे सारं पठाण इथे जेवतात कुठं ? " गजा.

" मोहोल्ल्यातील एका मोमीनाकडं. काय वरणभात जेवायला बोलवायचा विचार आहे काय गजाभाऊ ? " आदम मोठ्याने हसला.

बादशाचा विचार करता करता गजाच्या डोळ्यांपुढे नाना, आई, मामा तांबट,

गौर पुजणारी मंदा आणि विप्पाड बादशा यांच्या मूर्ती एकामागून एक सरकत होत्या. त्यांच्या अंत:करणात विचाराचे अनेक भवरे गरगरत होते. कर्जाचे हप्ते, उचल, देणी, उधारी, रोजखर्च यांच्या आठवणींच्या जळवा मधूनमधून त्याच्या काळजात वळवळत होत्या. ‘ आदम, येतो मी, ’ असे म्हणून गजा सटकला तो घरीच आला.

वाट पाहात जाग्या असलेल्या आईला, “ आई, चौथी मंगळागौर करू या. मुली बोलवा. मंदाकडे जाऊन सर्वांना जेवायला सांगा,” असे जेव्हा रात्री गजाने सांगितले, तेव्हा आईचे डोळे भरून आले. नाना ओशाळले. डोळे मिटून जांभई देत देत ते लवंडले.

“ या गजाननाला किती संकटात घालायचं. हर हर ! गजानना, मी तुला विद्या दिली नाही, संपत्ती ठेवली नाही.” अपराध्यासारखे नाना दु:ख गिळीत होते. ते पचविण्याची त्यांची हिंमत खचली होती.

नाना सकाळीच लेकीकडे गेले. दुपारचे जेवण तिकडेच करून त्यांनी सर्वांना आग्रहाने बोलाविले. येताना झुंबर मारवाड्याला उधार सामान देण्याची गळ घालून ते आले. घरी रात्री विचार सुरू झाले.

“ पन्नास तरी पान होईल,” गजाची आई म्हणाली.

“ झुंबर फक्त पंचवीस रुपयांपर्यंत सामान उधार देणार आहे हं. रोख पैसे पुढील रविवारी तरी हातात पाहिजेत.”

“ पाच मुली मिळाल्या आहेत. पूजेचे सामान, फराळाचं, रात्री जागरण व कॉफी, म्हणजे बरीच तयारी हवी. शिवाय प्रत्येकीला खण द्यायला हवा.” केल्यासवरल्या आईने तपशिलाची भर घातली.

आपलं घर एकुलत्या एक लेकीचं दरिद्री माहेर आहे, हे दु:ख त्या माउलीला डसत होतं, पण गजाननाच्या आठवणीने तिचा ऊर भरून आला.

मंदाच्या मंगळागौरीची बातमी वाड्यात पसरली. घरमालक, मालकीणबाई, शेजारीपाजारी कारण नसताना उत्सुकता दाखवीत होते.

“ गरिबी असली म्हणून काय झालं, जे व्हायचं ते झालंच पाहिजे,” एक पोक्त शेजारीण म्हणाली.

“ बाकी सगळ्यांच्या पैशाची सोय होते. घरमालकाला मात्र भाडं दोन दोन महिने न दिलं तरी चालतं. ” वाड्याची मालकीण नळावर फणफणली. ओढग्रस्त नानांच्या फाटक्या संसाराला लोक आणखी फाडायचे. वाड्यातल्या प्रतिष्ठित बिऱ्हाडांत दाराआड कुजबूज चालू झाली. गजाचे भाऊ खुषीत होते. अक्का येणार होती. गोडधोड खायला मिळणार होते. रात्री जागरण, गम्मतजम्मत–

नानांना हे वातावरण अस्वस्थ करीत होतं. “ एवढ्या रकमेची सोय या गजाननाने कोठून केली ? कर्जापायी पोराची परवड होणार, ” असं मधूनमधून

पुटपुटायचे. पातपत्नी एकटे असले म्हणजे नाना कावायचे–

"कसले आईबाप, सातजन्मींचे दावेदार आपण. काय दिलंय् त्याला आपण? मोरया, सांभाळ या आमच्या विघ्नहर्त्याला!"

गजाची आई यावर डोळे पुशीत म्हणायची, "मी धरू का काही काम. असं किती दिवस चालायचं." असह्य आघात झाल्यासारखे नाना आतल्या आत विवळायचे. आठवडा हा हा म्हणता गेला. रविवार आला.

"गजानन, उद्या पैसे मिळायला हवेत हो. नाहीतर फार घाई होईल. सोमवारी दुकानं बंद असतात." आईचा तगादा खालच्या सुरात आला.

"आई, रात्री होईल व्यवस्था. काही काळजी करू नको," गजाने उत्तर दिलं. त्याला वाटले, आई आपल्या ऐपतीवर गैरविश्वास दाखविते.

गजानन जेवण उरकून घरातून निघाला. नाना खालच्या मानेने शनिमहात्म्य वाचीत होते. मधूनच घाईने जाणाऱ्या गजाच्या मुद्रेकडे ते बघत होते.

गजा आदमच्या दुकानावर थांबला नाही. पान चघळीत बादशाच्या मठीकडे निघाला. खरं म्हणजे इतक्या लवकर जाऊन बादशाची भेट झाली नसती, हे गजाला माहीत होते. त्याच्या तगमगणाऱ्या मनातील अधीरता शिगेला पोचली होती. पैसे हाती पडेपर्यंत त्याची तगमग थांबणार नव्हती. उद्या मंदा येणार आईच्या मदतीसाठी आणि मंगळवार! मंगळवारी सारे यायचे! पैसे मिळाल्याबरोबर फारसं काम न करता परत येऊन आईला पैसे द्यायचे नि आदमच्या दुकानी गप्पा मारीत बसायचे.

बादशाची मठी आली. अंधाऱ्या गल्लीतून मठीच्या खिडकीत उजेड दिसेना. गजा जिना चढून वर गेला. दाराला कुलूप होतं. एकही पठाण अद्याप तेथे आला नव्हता. गजा गल्लीतून परत मोठ्या रस्त्यावर येऊन थांबला. कोणीतरी पठाण तेथे भेटेल, या आशेवर गजा बराच वेळ उभा राहिला. कंटाळून कोपऱ्यावरील हॉटेलात चहा पीत त्याने अर्धा तास घालविला. पुन्हा गल्लीच्या तोंडाशी येऊन पहारा करू लागला. साडेदहा होऊन गेले. 'कुठे गेला हा बादशा आणि त्याचे भाईबंद?'–गजा पुटपुटला. त्याला कळेना–कुणाचं काही बरं–वाईट, अपघात–मारामारी...गजा तर्क करीत होता. अकरा वाजता गजा जड पावलाने आदमच्या दुकानापाशी आला. सिनेमा सुटायला अजून अवकाश होता.

आदम दुकानात एकटाच होता. दोघांच्या गप्पा आणि पानं रंगवणारी निवांत वेळ होती, पण गजाचं मन बादशाच्या अंधाऱ्या मठीत घुटमळत होतं. रस्त्यावर जाणाऱ्या-येणाऱ्यांत गजा उगाच बादशाला शोधीत होता. "आदम, हे सर्व पठाण आज गेलेत तरी कुठं!" मानावर येऊन गजा म्हणाला. त्याचा खिन्न चेहरा आदम न्याहळीत होता. "आदम, माझी अब्रू आज बादशाच्या खिशात आहे. तो भेटला तर ठीक, नाहीतर..." गजा जड मनाने बोलला. आदमला काय बोलावे हे कळेना.

काही क्षण असेच गेले. बादशाकडील व्यवहार त्याने समजून घेतला. गजाच्या दुःखाची तीव्रता ओलसर डोळ्याने त्याने जाणली.

दोघेही गप्प होते. आदम कसल्यातरी निश्चयाने एकदम म्हणाला, "गजाभाऊ घाबरू नकोस. बादशाचं इमान धोका द्यायचं नाही."

"आदम, बादशा इमान राखील, पण माझे सर्व सगेसोयरे, शेजारीपाजारी मला बेइमान, बेशरम ठरवतील," गजाचं दुःख व संताप बोलत होते.

बेचैन गजाला तेथे बसवत नव्हते. तुटक्या वहाणेशी थोडासा चाळा करून जरा वेळाने तो घरी आला. "गजानन." दार उघणाऱ्या आईच्या स्वरातील आशा, अभिमान, कृतज्ञता गजाने जाणली. अंधारातच उभ्या उभ्याने, "आई, पैशाचं काम झालं नाही. कठीण आहे वेळ. मला काही करता येत नाही," असं बोलताना त्याने हुंदका दाबला होता. थोडा वेळ गेला. आवंढा गिळून, एक कठोर व्यवहार त्यानं आईला सांगितला—"उद्या मंदाकडं जाऊन निरोप द्या—नाही तर फजिती होईल"—गजा एखाद्या अपराध्यासारखा बोलत होता.

आई अश्रू पुशीत गजाकडे आश्चर्याने पाहात होती. नाना कीर्तनास गेले होते. अजगराच्या विळख्यात सापडल्यासारखे वाटत होते गजाला. गजा व आई रात्री भुतासारखी दिसत होती. कोणी बोलत नव्हतं. "पांडुरंग हरी" करीत कीर्तनाहून नाना आले.

"अजून तुम्ही जागे?" असे म्हणत त्यांनी गजाकडे पाहिले व काय ते उमजले.

"गजानन, कष्टी होऊ नकोस. पठाणाचे पैसे मिळाले नसले, तर फार चांगलंच झालं. वेड्या, पठाणी व्याज व इज्जत देण्याची आपली ऐपत आहे का? उद्याच मी मंदाकडं जाऊन काय ती व्यवस्था करतो."

नानांनी पठाणाचं नाव काढताच गजाच्या डोळ्यांपुढं मामा तांबट आले. इतके बजावूनसुद्धा मामांनी अखेरीस करायचे ते केलेच; ह्याचे गजाला वाईट वाटले. रात्री कीर्तनास बहुधा मामा तांबट नानाशेजारीच बसले असले पाहिजेत. बादशा-बद्दलचे कसलेही स्पष्टीकरण नानांजवळ करणे आज तरी गजाला अशक्य होते.

आई तर विचारी कपाळाला हात लावून स्वस्थ बसली. मुक्या मनात ती अस्वस्थ होती. मंगळागौरीसाठी बोलावलेल्या मुलींना नकार द्यायचं अवघड काम कसं करा-यचं, हे तिला सुचेना. पाणावलेले डोळे पुशीत तिनंही अंग टाकलं.

गजा, नाना आणि आई पांघरुणाच्या आत जागे होते. दुःखाचे कढ त्यांच्या अंतःकरणात खदखदत होते. मंगळागौर त्यांना जागवीत होती.

उजाडलेला दिवस नसता उगवला तर बरं झालं असतं, असं क्षणभर गजाला वाटलं. बादशाने कसला हा दिवस दाखवला आपल्याला! मंदाकडं जाण्याची तयारी करीत असलेल्या नानांचा लाचार चेहरा गजाने एकदा पाहिला. तो

खोलीच्या बाहेर पडला. रात्रभर दु:खाने भारावलेले मन आदमजवळ हलकं करावं म्हणून तो त्याच्याकडं निघाला.

त्याला सारं काही विसरायचं होतं. बादशा, आई, नाना, मंदा साऱ्यांना क्षणभर विसरलं, तर बरं वाटेल, असा विचार जोर करीत होता. त्याची पावले झप्झप् पडू लागली. भोवतालच्या जगाची यत्किंचितही जाणीव त्याला नव्हती व नको होती.

' दादा, सकाळीच कुठं निघालास ? ' ह्या मंदाच्या शब्दाने तो एकदम भानावर आला. हसतमुखाने माहेरी निघालेली मंदा त्याच्यासमोर उभी होती. गजाला काय बोलावं हे कळेना.

" चल घरी; नाना तुझ्याकडेच निघालेत. लवकरच आपण त्यांना घरी गाठू, " खालच्या मानेने गजा बोलला. दोघेही वाड्यापर्यंत न बोलता आले. ' अक्का ' म्हणत भावंडं नाचू लागली. शेजाऱ्यांनी आपल्या नजरा मंदावर रोखल्या. मंदा सरळ घरात गेली. आई व नाना लेकीकडे नुसते निर्विकारपणे बघू लागले. मंदाला काहीच कळेना. पाण्यात बुडणाराची अगदी अखेरची विफलता गजा अनुभवीत होता. त्याला तेथे उगे राहवेना.

आदमच्या दुकानाची वाट तो जड पावलाने चालू लागला.

नानांच्या जाण्याचं कारण कळताच मंदा गहिवरली.

" नाना, आजच कशाला जाता आमच्या घरी ? जरा थांबलात तर नाही का चालणार ? " असं म्हणून मंदा आईला बिलगली. मायलेकी स्फुंदू लागल्या. नाना


## वाटाघाटी की युद्ध !

### युवकसमाजातर्फे सर्वांसाठी निबंधस्पर्धा

**विलेपारले येथील युवकसमाज या संस्थेतर्फे मराठी, गुजराती, हिंदी आणि इंग्रजी भाषांत " भारताच्या अंतिम विजयासाठी वाटाघाटी की युद्ध " या विषयावर निबंध-स्पर्धा आयोजित केली आहे· त्यासाठी वय वा शिक्षण यांची अट नाही. चारोही भाषांत सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या एका निबंधास रु. १०१ चे पारितोषिक दिले जाईल. शिवाय प्रत्येक भाषेतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकांच्या निबंधांना अनुक्रमे रु. २५, रु. १५ व रु. १० अशी पारितोषिके दिली जातील. निबंध दि. २५ ऑगस्ट ६५ पर्यंत ' युवकसमाज द्वारा :– श्री. विजयभाई श्रॉफ, लक्ष्मीकुंज, दीक्षित रस्ता, विलेपारले (पूर्व), मुंबई ५७ या पत्त्यावर पाठवावेत.**

स्तंभाप्रमाणे गप्प होते. दाराची कडी वाजली. सगळ्यांच्या नजरा दाराकडे वळल्या. दार उघडण्यासाठी कोणीच पुढे येईना. दाराची कडी पुन्हा मोठ्यांदा वाजली.

पदराला डोळे पुशीत दार उघडण्यासाठी आई पुढे आली. दार उघडताच काळा डगला, जरीचे भरतकाम केलेले जाकीट, पठाणी जरीची पगडी घातलेला धिप्पाड बादशा दारात उभा होता. वाड्यातले सारे स्त्री-पुरुष बादशहाच्या भोवती अंतराअंतरावर उभे होते. हे दृश्य पाहताच गजाची आई दारातच कोसळली. नाना आणि मंदा पुढे सरसावून तिला सावरू लागले. मंदाने आईचे डोके मांडीवर घेतले. नाना नाकाला कांदा लावू लागले. बादशाकडे त्यांचे लक्ष नव्हते.

" बच्च्या कहाँ है ? " बादशा म्हणाला. घरमालक पुढे येऊन बादशाला विचारू लागले,

" कौन मंगता है ! "

बादशाला नाव आठवेना.

मालक म्हणाले, " गज्जा ? "

बादशाने आठवल्यासारखे करून मानेनेच होकार दिला.

" नाना, गजाकडे आलाय हा पठाण, " मालक खोलीत येऊन नानांना म्हणाले. ओशाळलेले नाना पुढे आले.

" हा उसका बाप आहे, " मालकांनी मोडक्या हिंदीत बादशाला सांगितले. बादशाने क्षणभर दोघांकडे पाहिले आणि खालच्या आवाजात म्हणाला,

" बुढ्ढा, डरो मत । घज्या आच्छा बच्च्या है । ये रुपिये लो । वायदा कलका था । " जाकिटाच्या खिशातून काढलेले साठ रुपये बादशाने नानांच्या थरथरत्या हातावर ठेवले. नानांच्या डोळ्यातून भीती, लाचारी, असहायता ठिबकत होती. पैसे बादशाला परत करण्यासाठी नाना पुढे झाले, पण बादशानेच त्यांना थांबविले. " बुढ्ढा, रुपिये रख, ये कर्जा नही । डरो मत । बच्च्याको हमारे मकानपर भेजो । " बादशहाने खुलासा केला. जाकिटाच्या दोन्ही खिशांत हात घालून जमलेल्या लोकांकडे बघत तो उभा होता.

मंदाच्या मांडीवर आई सावध झाली. तिचे डोळे बादशाकडे वळले. बादशा ओशाळला. एखाद्या अपराध्यासारखा चेहरा करून ' आच्छा बुढ्ढा, ' असे म्हणत खाड्खाड् बूट वाजवीत वाड्याबाहेर पडला. वाड्यातली पोरं त्याच्यामागे कुतूहलाने पळत होती. प्रतिष्ठित बिऱ्हाडांतील स्त्री-पुरुष भुवया उंचावून गटागटाने आपसात बोलत होते.

आदमच्या दुकानात गजाला कळले की बादशा घरी गेला आहे. तो वायदा पुरा करण्यासाठी सकाळी मुद्दाम आला. शनिवारी रात्री त्याला येता आले नाही. सकीनाच्या तपासास परगावी गेल्यामुळे गजाची व त्याची भेट झाली नाही. सकीनाकडले पैसे बादशाने वसूल केले होते. त्याला तेथे थोडी दांडगाई करावी लागली होती.

जाताना त्याने आपले दोस्तही बरोबर नेले होते. रात्री खूप उशिरा ते सर्वजण परत आले होते. वसुली झाल्यामुळे बादशा खूष होता. रात्री त्याला गजाची आठवण झाली होती. वायदा आठवला होता; पण त्याचा इलाज नव्हता. सकाळीच त्याने आदमला गाठले. गजाचा पत्ता घेतला अन् वायदा पूर्ण केला.

तुटकी वहाण सावरीत गजानन वाड्यात आला. बादशा त्याच्या आधीच निघून गेला होता. वाड्यातले सारे गजाकडे नव्या उत्सुकतेने पाहात होते.

घरात सावध झालेली आई मंदाच्या मांडीवर डोके ठेवून पहुडलेलीच होती. भावंडं कावरीबावरी झालेली होती. बाबा आणि मंदा यांचे डोळे बोलत होते.

" गजा, झेंडा लावलास बाबा ! आजपर्यंत वाड्यात पठाण आला नव्हता. तुझ्यामुळे त्याचे पाय या वाड्याला लागले. " घरमालक ओटयावर उभे राहून गजाला उद्देशून उपहासाने बोलत होते. गजाचे त्यांच्याकडे लक्षच नव्हते.

दीनवाणे नाना फाटक्या उपरण्याला अश्रू पुशीत होते. भिंतीपाशी गौर पुजण्यासाठी आणलेल्या चौरंगावर साठ रुपयांच्या नोटा होत्या.

आवंढा गिळून गजाने नवा उत्साह आणला.

" आई, मंदा, उठा तुम्ही. मंगळागौरीच्या तयारीला लागा. फराळाचं करा. वेडी आहेस मंदा. डोळे पूस. दोन दिवस मजेत काढ. मी बादशाकडे जाऊन येतो, " असे म्हणत गजा घराबाहेर पडला.

आज बादशा दिवसा मठीत होता. गजाला पाहताच, " बच्च्या, कैसे हुँ ? " असे म्हणत त्याने गजाचा हात आपल्या केसाळ गोऱ्या पंजात पकडला. " माँ अच्छी हैं ? " गजाने भरलेल्या डोळ्याने बादशाकडे पाहिले. " बादशहा, तू खरंच बादशा आहेस. " गजाला यापेक्षा अधिक बोलवेना.


बादशा म्हणाला, " बच्चा, रो मत ! "

● ● ●

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.




"हें सारं आम्हाला कळतं,
पण उपाय काय ?"

# उपाय आहे !

घरांत मोठा पोरवडा असेल तर तें घर खऱ्या कौटुंबिक सुखाला व आनंदाला पारखे होते—

मुलांना धड खायला-प्यायला मिळत नाहीं कीं त्यांचे व्यवस्थित शिक्षण होत नाहीं —

आणि घरांतील स्त्री ? सारखी बाळंतपणं होत गेल्यानं आणि जन्मभर मुलांच्या खस्ता काढाव्या लागल्यानं तिच्या शरीराची तर नुसती चाळणी होते.



हे सर्वांना कळतं पण खात्रीचा उपाय नाही म्हणूनच केवळ माणूस स्वस्थ बसतो—

**उपाय नाहीं असें आता म्हणूं नका, उपाय आहे आणि तो म्हणजे लूप !**



लूप हे कुटुंबनियोजनाचे एक नवे अतिशय श्रेयस्कर, सुलभ व सुरक्षित साधन आहे. प्लॅस्टिकचे बनविलेले हे कडे स्त्रिच्या गर्भाशयांत बसवितात आणि तेथें ते अनेक वर्षे राहू शकते. लक्षांत ठेवा, त्याची परिणामकारकता ९९ टक्क्यांहून अधिक आहे



स्त्री-डॉक्टर हे लूप कांहीं थोड्या मिनिटांच्या आंत बसवितात. यांत कांही सुद्धां त्रास किंवा वेदना होत नाहींत. शस्त्रक्रियेची गरज नसते



मूल हवे अशी नंतर इच्छा झाल्यास बसविलेले लूप स्त्री-डॉक्टरकडून अगदी सहज काढून घेतां येते.

## सरकारी कुटुंब नियोजन केंद्रांत लूप मोफत बसवून देतात

# कुटुंब छोटे सुख मोठे

**सविस्तर माहितीसाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रास भेट द्या**

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई



# लग्न

सौ. शकुंतला पारपिल्लेवार

अक्षता पडल्या की लग्न होते. रत्नाचे असे
लग्न झाले. काव्य सुटले– शास्त्र उलगडले.
तिच्या लक्षात आले, हे लग्न नाही–

* * *

रत्नाच्या लग्नाच्या गोष्टी चालल्या होत्या. तिला मात्र असल्या काही गोष्टींची चाहूल लागली नाही आणि ते शक्यही नव्हतं. एकदा कॉलेजातून घरी आली, की ती एका वेगळ्याच भावविश्वात स्वत:ला गुंतवून घ्यायची. तिची खरी आवड होती कथांची. कधी मी तिला मोपांसाँच्या गोष्टी वाचताना पाहिलं, तर कधी सामरसेट मॉम्च्या-कॉलेजच्या सगळ्या सांस्कृतिक चळवळींशी ती या ना त्या नात्यानं संबंधित असायची अन् तेव्हा तर ती कॉलेजच्या मासिकाचं संपादन करणार होती. कुणाला काहीही वाटो, तिच्याविषयी माझ्या अपेक्षा फार होत्या. एकदोनदा तर तिनं मला अगदीच चकवलं. मला म्हणाली, " वहिनी, आतापर्यंत खूप तोंडभर तारीफ करीत आलीस हं माझी. आता मात्र अगदी खरं खरं सांग. तुला दादांची शपथ. "

" काय ते ? " — मी.

" एक कविता आहे — "

" अग, मला काय समजतं त्यातलं ? मी काय तुझ्याइतकी शिकलेय्. "

" चांगले की वाईट, हे सांगायला शिक्षणाची ती काय ग जरूरी ? अन् तू काही मुळीच अडाणी नाहीस. चांगली मॅट्रिकपर्यंत शिकली आहेस ? "

"हो हो बाई, बरोबर तुझं. तुझ्यापुढे शहाणपण चालायचं नाही काही. काय ते ? वाच तरी ! "

" हसू नकोस हं ! "

" हं लवकर म्हण. कामं पडली आहेत. "

" बरं तर !" एकदा खाकरली अन् पुढे वाचायला सुरवात केली.

> " वाहिली मी पुष्पे रोज ह्या रस्त्यावरी
> तू तया घ्यावेस उचलुन हेतू होता अंतरी
> तू परंतु ती फुले लाथाडली नच पाहता
> आणि गेला करुनि हृदयी घाव रे तू धावता ...... "

" ए रत्ना, एक विचारू ?" --मी तिला थांबवीत म्हटलं.

" कशी वाटली कविता आधी सांग ? "

"अग, तेवढ्याकरिताच तर म्हणतेय्. खरंच कुणी घाव करून गेलाय् का तुझ्यावर ?" हे वय फार तोलूनमापून काढायचं असतं. मला तेव्हा भीती वाटत होती, ती ही की कुठे ही कविमनाची साधी पोरगी, खरंच कुणा भलत्यालाच हृदय तर देऊन बसली नाही ? मी कॉलेजमधे गेले नाही, पण कथा, कादंबऱ्या अन् विशेष म्हणजे सिनेमा इत्यादींतून तसं खूप पाहिलं होतं मी ! माझ्या जीवात जीव आला तेव्हा ती म्हणाली, " वहिनी, तुला वाटतं असं काही माझ्या हातून घडेल म्हणन ? तुम्ही वडील माणसं आहात घरातली. तुमचा तेवढा हक्क मी घेणार नाही. "

बोलता बोलता पोरीनं मलाच शालजोडीतले मारले होते.

अशा या साहित्यात रस घेणाऱ्या आमच्या रत्नाच्या लग्नाच्या गोष्टी चालल्या होत्या. मी ह्यांना म्हटलंसुद्धा, "अहो, एका शब्दानं तर तिला विचारून बघा– स्थळ पसंत आहे की नाही ?"

" काय विचारायचं यात ? अग, असा मुलगा शोधून सापडणार नाही. चांगला एम्. एस्सी. झाला आहे. रिसर्च करतोय्. उद्या पीएच्.डी. पण होईल. "

" अहो, ते सगळं खरं. तिच्याही काही आवडीनिवडी आहेत की नाही ?"

" मला खात्री आहे तिला नक्कीच आवडेल हे स्थळ. "

" तसं आपल्याला वाटतं. "

" वाटतं म्हणजे काय ? तुझं म्हणणं काय तर ? काय कारकुनाशी लग्न लावायचं तिचं ? बघतेस ना आपल्या संसाराकडे ?"

" बरं बरं. आपल्या संसाराला काय झालंय् ? " मी चिडून म्हणाले.

" अग तसं नाही ! पैशामुळं जीवनाला स्थैर्य येतं. काही स्टॅन्डर्ड मेन्टेन् करता येतं. चांगला लेक्चरर् आहे तो. घरी चालून स्थळ आलंय्. संधी दवडता कामा नये. अशी संधी पुनः येईलच असे नाही.... !"

" ठीक आहे तर. तुम्हाला जे बरं वाटतं तेच करा." मी अगदी निराश स्वरात म्हणाले होते. मला वाटायचं, तिनं मुलाला पाहावं. तिच्याही काही अपेक्षा असतील. अन् दुसरं असं. ही पडली अशी. वाङ्मयांची हिला भारी आवड. कविता, कथा, कादबरी ह्याच्यावर हिचा भारी जीव. कधीकधी जेवणखाणं विसरून मी हिला वाचनात गर्क पाहिलं होतं. हिचं त्या केमिस्ट्रीच्या लेक्चरर्शी जमणार कसं ? इतक्यात यांना काय वाटले कुणास ठाऊक.... माझ्या सुरातली कळकळ पाहून ह्यांनी पण पवित्रा बदलला. आवाज कमी करून म्हणाले, "बरं तर, आज रत्ना कॉलेजमधून आल्यावर तिला कळव तसं. बघ काय म्हणते ती ?"

ती फक्त माझ्याशीच लधळपधळ बोलायची. तिच्या दादापुढे अगदी मूग गिळून राहायची. तिच्या आवडीनिवडी ह्यांना विचारात घेऊन तिच्या बऱ्या–वाइटाला मीच जबाबदार होते. अन् का तर मला वाटायचं, न जाणो हिला वाटू नये कुणी

फसवलंय म्हणून. आजच्या पिढीच्या अपेक्षा जरा वेगळ्या आहेत अन् तेवढ्या-करताच कर्त्या घरातल्या माणसांनी थोडं त्यांच्याही कलानं घेणं हेच योग्य.

रत्नाला जेव्हा पसंतीविषयी मी विचारलं तेव्हा ती एवढंच म्हणाली होती, "वहिनी, तुम्ही काही माझे वैरी नाही. माझं हित-अहित तुम्हाला चांगलं समजतं. तुम्ही जे कराल, त्याला माझी ना नाही."

ही पोरगी किती खुळी ! मला वाटायचं, हिनं थोडं जबाबदार व्हावं. स्वतःच्या बऱ्या-वाइटाचा विचार करावा. आम्हाला स्पष्ट तसं कळवावं, पण सगळी जबाबदारी तिनं माझ्यावरच लोटली.

माझ्या दृष्टीनेही रत्नाचं आणि रत्नाकराचं जोडपं अगदी शोभून दिसण्यासारखं होतं. दोघंही एकदुसऱ्याला अनुरूप अशीच होती. ही काहीशी ठेंगणी. तो मध्यम उंचीचा. वर्णही दोघांचा थोडाफार सारखा. रत्नाकर मला बराच बोलका वाटला. मला तरी त्याच्यात कोणतीच उणीव जाणवली नाही. उलट तो नव्या विचार-सरणीचा आहे. जुन्या प्रथा, रूढी आदींचा उगाच पाठपुरावा करीत नाही, हे कळल्यानंतर तर विशेषच आनंद झाला होता. देवघेवीच्या अपेक्षाही मुळीच नव्हत्या अन् विशेष म्हणजे पोरगी भाग्याचीच म्हणावी. सासू-सासरे वगैरे केव्हाच जगाचा निरोप घेऊन गेले होते ! एकापरीनं हे राजाराणीचं जोडपं सुखी व्हायला कोणतीच अडचण नव्हती. मला तर सारखं वाटायला लागलं होतं. म्हणतात ना, जोडी ही देवच बांधून देतो, आपण फक्त कारणमात्र होतो. जणू रत्नाकरिता रत्नाकर अन् त्याच्याकरिता ती देवानंच निर्माण केली होती.

एकदाचं रत्नाचं लग्न आटोपलं. लग्नानंतर ती नवऱ्याबरोबर गेली. रत्नाकर दिल्लीला राहायचा. रत्नाला दिल्ली बरीच आवडलेली दिसली. तिच्या पत्रांतनं ती किती सुखात आहे, ह्याची कल्पना यायची. जाताना पोरीनं आपली जमवलेली पुस्तकं सगळी सांवडून नेली होती. नवरा बराच हौशी निघाला होता. बायकोसाठी दरमहिन्याला तिच्या आवडीची पुस्तकं आणायचा. आदर्श संसाराचं रत्ना अन् रत्नाकर माझ्याकरिता प्रतीक होतं. दिवस लोटलेत. मी हळूहळू रत्नाला विसरत गेले. आधी थोडं वाटायचं, घरात फुलपाखरासारखी बागडणारी, चिमणीसारखी चिवचिव करणारी रत्ना घरात नाही; पण पुढं मला सरावानं ते विसरता आलं. कधी आठवण यायची. वाटायचं, पोरीनं मिळतं घेतलं असेल रसायनशास्त्र शिकवणाऱ्या प्राध्यापकाशी. म्हणता म्हणता एक वर्ष निघून गेलं अन् एक दिवस दोघंही अगदी अनपेक्षित दारात दत्त म्हणून उभी राहिली. आधी माझा माझ्याच डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता अन् मी पाहात तरी काय होते ? रत्ना, किती बदलली होती ? कुठे गली हिची वेणी – हिचा अंबाडा ? हे काय ? केस पण कापलेत पोरीनं ? अगदी आधुनिका? पण शोभत होती ! संस्कार अजून विसरली नव्हती. येता येऊन पाया पडली. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू दाटून आले होते.

दोघांनी एक दुसऱ्याला एक दुसऱ्याकरिता किती बदललं होतं. तिचा नवरा मुंबईत कुठल्या तरी सायन्स कॉन्फरन्सकरिता आला होता. ती पण सोबत आली. मला खूप आनंद झाला. ती तोंडभर नवऱ्याबद्दल बोलायची. अजून संसारातली नव्हाळी संपली नव्हती. मी तिला विचारलंच, " काय ग, काही कविता वगैरे लिहिल्यास की नाहीस लग्नानंतर ? "

" कविता ? अग कुठल्या ? आता सवडच कुठे मिळतेय् ? "

" म्हणजे काय, एवढं काम असतं का तुला ? दोघंच ना ग तुम्ही ? "

" हो दोघंच. आता मला त्या कथा, त्या कविता ह्यांत रसच वाटत नाही मुळी. ह्यांची एक घरातच प्रयोगशाळा आहे. मला पण थोडं-फार ज्ञान झालंय आता. इंद्रधनुष्याचे सगळे रंग, बघता बघता काचेच्या नळीत जमलेले पाहायला आवडतं. निळा लिट्मस् क्षणातच लाल होतो. असं वाटायला लागतं, मी आतापर्यंत ह्या अनुभूतीला मुकले होते. "

" म्हणजे तुला रत्नाकरानं दीक्षा दिलेली दिसतेय् रसायनशास्त्राची. अन् ती नेलेली पेटीभर पुस्तकं काय केलीस ग ? अन् लिहायचीस मग दरमहिन्याला, तुझ्यासाठी रत्नाकर वाचायला पुस्तकं आणायचा म्हणून ? "

" आता ते पुस्तक वाचतात न् मी प्रयोगशाळेत वेळ काढते. "

" वा: म्हणजे नवऱ्याचं भूत बायकोत उतरलं न् बायकोचं नवऱ्यात. "

सायंकाळी रत्नाकर परतला. जेवताना गोष्टींना रंग भरला. मी म्हणायचं म्हणून म्हटलं– " आमच्या रत्नाचं वेड तुम्हाला लागलंय् म्हणे ? खरं कां ! "

" हो ना ! वेड आहे ते ! तिची ती पुस्तकं चाळली म्हणजे वाटतं थोडी सुटका झाल्यासारखं. नाहीतर कसं रूक्ष होतं. तेच चेहरे. तीच ती बडबड. तेच ते प्रयोग. कंटाळा येतो. "

" पण आमच्या रत्नाचं काय ? ती तर कामातूनच गेली ? "

" ती तर उलटं म्हणतेय्. तिला हा रंगाचा अन् कागदांचा बदल एक साक्षात्कार वाटतोय्. काहीतरी नवीन वाटतं तिला त्यात. दोन वस्तू मिळून एक तिसरीच वस्तू तयार होते अन् त्याचंच तिला आश्चर्य वाटतं. "

रत्नाकर अन् रत्ना चार दिवस राहून परत गेली. ते चार दिवस मला बरंच काही सांगून गेले असं आता वाटलं. जाताना मी त्यांना म्हणाले होते, " पुढचे वेळेस असे येऊ नका हं ! "

" म्हणजे ? " रत्ना म्हणाली.

" किती ग खुळी तू ? बाळाला घेऊन ये. "

" अग वहिनी, अजून आम्हीच तर पोरं आहोत. हे काय वय आहे आमचं पोरं सांभाळायचं. ? "

" तुझ्याएवढी मी होते तेव्हा दोन मुलं होती मला ! "

" काळ पालटला ना ? प्रत्येकानं जबाबदार व्हायची वेळ आली आहे. मुलं वागवणं समजत नाही, तेव्हा तरी मुलं होऊ नयेत. "

" आम्हाला कुठे कळत होतं बाई एवढं ? " माझ्या ह्या म्हणण्यावर तिनं फक्त स्मित केलं होतं. ती गेली. अजून तिचं ते स्मित आठवतं. जाताना खूप आग्रह केला होता तिनं. " वहिनी, एकदा ये ग, दादांना न् मुलांना घेऊन. "

मला राहून राहून आठवत होते तिचे ते शब्द. प्रत्येकानं जबाबदार व्हायची वेळ आली आहे. बोलता बोलता किती 'मोठ्ठं' सांगून गेली ती ? खरंच रत्ना समजदार होती. तिच्या वयात मला एवढं समजलं असतं, तर कशाला वाढला असता एवढा व्याप. सात वर्षांच्या संसारात मी म्हातारी झालेय्. रत्नासारखी बाई कदाचित सत्तर वर्षं संसार करूनही चिरयौवना राहील. देवाजवळ माझं एकच मागणं होतं, देवा, पुरे झालीत मुलं आता. मी पाच मुलांची आई आहे अन् त्यांच्याकरिता काय भविष्य आहे ? भविष्याची कोणती तरतूद आहे. हा विचारच आला आणि माझी मलाच लाज वाटली. रत्नाचं लग्न झाल्यानंतर तरी मला मुलं नको होती. 'देवा, आता रत्नाकडे बघ,' एवढंच माझं मागणं होतं. त्यानंतर मात्र मी चूप बसले नाही. ह्यांच्यामागे लागून लागून, तगादा लावून लावून एकदाचे हे तयार झाले. मी म्हणायची 'शस्त्रक्रिया मी करणार' अन् हे म्हणायचे, 'नाही, मी करणार.' ह्या वादातच एक आणखी भर पडली ! मला मेल्यागत वाटलं. उशीर झाला होता. डॉक्टरांनी पण मदत करायचं नाकारलं. बाळंतपणानंतर मात्र 'ऑपरेशन करावं,' असा सल्ला दिला. शेवटी आमचं दोघांचं एकमत झालं. ह्यांनी शस्त्रक्रिया करवून घेतली.

आता त्याही गोष्टीला वर्षं लोटलीत. रत्नाची आठवण आली म्हणजे ऊर भरून येतो. मला सहाव्या खेपेस मुलगी झाली. ह्यानंतर ४–८ दिवसांतच अघटित झाले. रत्ना ह्या जगातूनही गेली, आत्महत्या केली होती ! प्रयोगशाळेतल्या पोटॅशियम सायनाईडनं तिने मृत्यूला कवटाळे ! पण का ? का ? काय कमी होतं तिला ? मुलं काय लग्नानंतर दहादहा वर्षांनीदेखील होतात ! मला याची उत्तरे सापडली नाहीत. माझ्या सहाव्या मुलीचे नाव मात्र मी रत्ना ठेवले. ही रत्ना मोठी होते आहे आणि मी अजून विचारच करते आहे– ती रत्ना अशी का निघून गेली ?

• • •





# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

# उत्तरार्ध

## लेखांक : ९ वा

२२ जून १९४१ ही रशियावरील स्वारीची तारीख हिटलरने निश्चित केली व ४ मे, १९४१ ला राईशस्टॅगपुढील भाषण आटोपताच तो विश्रांतीसाठी अल्पाइन पर्वतातील बर्चेस-गार्डन येथील आपल्या आवडत्या निवासात दाखल झाला. आपल्या-पुढील सर्वांत मोठ्या युद्धसाहसाचा विचार करताना अल्पाइनच्या बर्फाच्छादित शिखरांशी तो काय हितगुज करीत असेल ? कर्तृत्वाच्या अत्युच्च शिखरावर असूनही त्या पर्वतांच्या शिखरांपुढे तो नतमस्तक होत होता काय ? ' जगाचा श्वास रोधून' ठेवणाऱ्या त्याच्या युद्धसाहसाला जगाच्या इतिहासात खरोखरच तोड राहणार नाही, याविषयी त्याला वाटणारा अभिमान रास्तच होता.

फ्यूररची ही सुखसमाधी फक्त आठवडाभर टिकली असेल नसेल. १० मे, १९४१ रोजी एका अनपेक्षित धक्क्याने तो हादरूनच गेला. त्याचा अत्यंत विश्वासू सहकारी, नाझी पक्षाचा उपनेता, गोअरिंगनंतर फ्यूररपदावर अधिकार असू शकणारा, त्याचा अत्यंत श्रद्धावान अनुयायी, रोएमच्या मृत्यूपासून म्हणजे १९२१ पासून ज्याच्या मैत्रीची ऊबच फक्त फ्यूररला लाभत असे, असा एकनिष्ठ नाझी—रुडॉल्फ हेस हा पॅराशूटच्या सहाय्याने इंग्लंडमध्ये उतरल्याचे वृत्त १० मे, १९४१ ला सायंकाळी त्याच्या कानी आले.

१० मे, १९४१ ला सायंकाळी ५–४५ ला ऑगसबर्ग येथून एका मेशरमिट् विमानातून रुडॉल्फ हेसने उड्डाण केले. १९३६ ला बर्लिन येथे जे ऑलिंपिक सामने झाले, त्यावेळी हेसची ड्यूक ऑफ हॅमिल्टन यांचेबरोबर ओळख झाली होती. ड्यूक-साहेब स्कॉटलंडमध्ये जेथे राहात होते, त्याचा अचूक अंदाज हेसने आकाशातून कसा काय घेतला, हे खरोखरच आश्चर्य आहे. ड्यूकसाहेबांच्या घरापासून केवळ १२ मैलांच्या परिसरात मेशरमिट् शिरताच हेसने पॅराशूटच्या सहाय्याने विमानाबाहेर उडी घेतली. यावेळी रात्री १० चा सुमार झालेला होता. वैमानिक नसलेले ते जर्मन विमान झोकांड्या खात दूर अंतरावर खाली कोसळले व भस्मसात झाले.

### हेसचे इंग्लंडमधील स्वागत

योगायोगाची गोष्ट पाहा. ड्यूक ऑफ हॅमिल्टन हे स्वतः आर्. ए. एफ्. मध्ये विंग कमांडर होते व यावेळी एका सेक्टर स्टेशनमधून हेसचा विमानाचा प्रवास लक्ष-पूर्वक पाहात होते. अकरा वाजण्याच्या सुमारास ड्यूक यांना संदेश मिळाला, की

त्यांच्या घराजवळ एक विमान कोसळले असून वैमानिक सुखरूप खाली उतरला आहे. वैमानिक आपले नाव आल्फ्रेड हॉर्न (Alpred Horn) असे सांगतो व ड्यूकसाहेबांनाच भेटावयाचे आहे म्हणतो.

ड्यूक यांचे घरीच त्यांनी हेसची भेट घेतली. हेसने खुलासा केला,

" मी मानवतेच्या कार्यासाठी हे साहस पत्करले आहे. चारवेळा इंग्लंडमध्ये उतरण्याचा मी प्रयत्न केला, परंतु वाईट हवेमुळे ते यापूर्वी शक्य झाले नाही. " हेस पुन:पुन्हा ज्या गोष्टी सांगत होता, त्या म्हणजे--

(१) जर्मनीच हे युद्ध जिंकणार आहे व युद्ध असेच चालू राहिले, तर इंग्लंडची ससेहोलपट होणार आहे.

(२) नाझी पक्षाचा उपनेता असून मी हे धाडस एवढ्याचसाठी केले आहे, की प्रतिष्ठेचा प्रश्न या शांतता-विचाराच्या आड येऊ नये.

(३) ब्रिटिश सरकारने आपल्याशी वाटाघाटी सुरू कराव्या व यासाठी इंग्लंडच्या राजांकडून मला प्रथम अभय मिळावे.

ड्यूक यांनी ही बातमी लंडनला कळवताच बर्लिनमधील वकिलातीतील भूतपूर्व अधिकारी कर्क पॅट्रिक यांना हेसच्या भेटीस धाडण्यात आले. त्यातील मुख्य हेतू अर्थात हेस हा हेसच आहे, याची खात्री करून घेण्याचा होता.

चर्चिल यांनी स्वत: हेसला भेटण्याचा विचारही कधी मनात आणला नाही. अपमानास्पद अवस्थेत...रणांगणावर मार खाल्लेला असताना हिटलरच्या सोयीने तह करण्यासाठी हेसची काय जरूर होती ? हेसची गाठ घेऊन, ब्रिटिश मनात आता रुजलेल्या प्रतिकारभावनेचा ऐनवेळी अवसानघात करण्याचा विचारही चर्चिल यांच्या मनात आला नाही.

हेसला अटक करण्यात आली व त्याच्या भेटीला कुणीही जबाबदार ब्रिटिश नेता गेला नाही. याउलट हेसकडून काही जर्मनीतील विद्रोहाची बातमी मिळते की काय, हे पाहण्याकरता १० जूनला चर्चिल यांनी जॉन सायमन यांना डॉ. गुथरी या नावाने त्याच्याशी गप्पा मारण्यास मात्र पाठवले होते.

इंग्लंडमध्ये हेसला काय वागणूक मिळत होती, याची बातमी युद्धकाळात अर्थातच हिटलरला कळणे शक्य नव्हते. ११ मे, १९४१ ला सकाळी हेस इंग्लंडमध्ये उतरल्याचे वृत्त ब्रिटिशांनी जाहीर करताच जर्मन जनतेची काहीतरी समजूत घालणे हिटलरला आवश्यकच होते. गोअरिंग व कायटेल् यांना फोनवरून हिटलरला बर्चेसगार्डनला बोलावून घेतले व हेसच्यामागे कसलाही नाझीविरोधी कट वगैरे नाही, याची खात्री पटताच हिटलरने जाहीर केले--

" रुडॉल्फ हेस यांना पहिल्या महायुद्धात जखमी झाल्यापासून अधूनमधून विचित्र लहरी येण्याची सवय जडली होती. नाझी पक्षाचा एकेकाळचा हा थोर नेता अलीकडे भ्रमिष्टावस्थेस पोचला होता व अशाच वेडाच्या लहरीत त्यांनी इंग्लंडमध्ये

उतरण्याचे ठरवले असावे. अर्थात या गोष्टीचा जर्मनीच्या प्रचलित युद्धावर कसलाही परिणाम होणार नाही."

खासगीरीत्या मात्र त्याने– 'हेस परत आला तर त्याला गोळ्या घालण्यात याव्यात,' अशी सूचना नाझी पक्षाचे नवे उपनेते मार्टीन बोरमन यांना देऊन ठेवली होती.

हेसने जर्मनी सोडण्यापूर्वी फ्यूररला लिहिलेले पत्र हिटलरला लगोलग मिळाले. ते वाचून मात्र त्याने उद्‌गार काढले—

"या पत्रात मला हेसची ओळखच पटत नाही. हे कुणीतरी दुसऱ्यानेच लिहिले असावे. कदाचित त्याच्या मनावर काही आघात झालेलाही असेल."

हेसचे प्रकरण अशारीतीने हिटलरने निकालातही काढले. परंतु हेसच्या या साहसाने सोविएट युनियनमध्ये घबराट पसरली. स्टॅलिनच्या मनात येऊ लागले, हेसच्यामार्फत जर्मनीने इंग्लंडशी तह करून अनाक्रमणाचा करार केला तर? रशियाने जर्मनीशी वर्षापूर्वी असा करार करून जर्मन सैन्याचा लोंढा हॉलंड, बेल्जम, फ्रान्स, इंग्लंडकडे पळवला...आता याचा सूड ब्रिटन घेणार नाही कशावरून?

असे काही करण्याचे चर्चिल यांनी मनातही येऊ दिले नाही आणि स्टॅलिन उलट खजील झाला. गमतीची गोष्ट ही होती, की हिटलरने रशियावर स्वारी करण्याचा विचार निश्चित केला आहे, याचा मागमूसच हेसला नव्हता. निदान त्याच्या बोलण्यावरून असे काहीच ब्रिटिशांना आढळले नाही.

## हिटलरची खुशामत

मात्र रशियन हुकूमशहाच्या मनात ही जी नवी शंका उत्पन्न झाली, त्यामुळे क्रेमलिनचे नेतृत्व हिटलरची अधिकच खुषामत करू लागले. अर्थात हे पूर्वीपासूनच सुरू होते. अशा खुषामतीची सुरस हकीकत शूलेनबर्गच्या बर्लिनला धाडलेल्या अहवालात आढळते.

"१३ एप्रिल, १९४१ : आज जपानी परराष्ट्रमंत्री योशुके मात्सुओका यांना मॉस्कोहून निरोप देण्यासाठी स्टेशनवर जमलो असताना स्टॅलिन महाशयांनी अतिशय लाडात येऊन माझ्या खांद्यावर हात टाकला व म्हटले—'We must remain friends & you must now do everything towards that end...' आपण मित्रच राहिले पाहिजे व या दृष्टीने तुम्ही सर्व काही केले पाहिजे."

१५ मेच्या सुमारास जर्मनीला हवे असलेले ४००० टन रबर वेळेवर पोचावे, यासाठी रशियाने सैबेरियन रेल्वेच्या खास गाड्या सोडण्याची खास गोड बातमीही अशाच अहवालात आढळते.

मेच्या पहिल्या आठवड्यात रशियातील जर्मन वकील शूलेनबर्ग हा बर्लिनला रजेवर आला असता त्याने फ्यूररची गाठ घेऊन त्याला स्पष्ट सांगितले—

"रशियामध्ये जर्मनीच्या संभाव्य हल्ल्याच्या बातम्यांमुळे वातावरण उगाचच

गढूळ होते. रशिया हा जर्मनीवर कधीही हल्ला करणार नाही. १९३९ साली इंग्रज व फ्रान्स दोन्ही जोमात असताना जर स्टॅलिनचे त्यांच्याशी जमू शकले नाही, तर आता फ्रान्सचा नाश झाल्यावर व इंग्लंड बेचिराख होत असताना स्टॅलिनचे त्यांच्याशी सूत जमण्याची सूतराम शक्यता नाही. इतकेच नव्हे तर स्टॅलिन हा आपल्याला आणखी कितीतरी सवलती देऊ करील, अशी माझी खात्री आहे--"

शूलेनबर्ग हा नाझी परराष्ट्रवकील अत्यंत प्रामाणिक होता. रशिया-जर्मन संघर्ष उडू नये, यासाठी त्याने सर्व काही केले. परंतु हिटलरने आपल्या मनाचा थांग त्याला कधीच लागू दिला नाही. यावेळीही त्याने इतकेच सांगितले,

" काही असले तरी आपल्याला जपूनच व्यवहार करावा लागेल. "

## खुशामतीची पुढची पायरी...निषेधखलिते

हिटलरची गैरमर्जी होऊ नये, यासाठी स्टॅलिनने मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बेल्जम, नॉर्वे, ग्रीस व युगोस्लाव्हिया येथील रशियन वकिलाती बंद करण्याचा निर्णय जाहीर केला. इराकमध्ये अधिकारावर आलेल्या हिटलरअनुकूल रशीदअल्ली सरकारला रशियाने मान्यता देऊन टाकली, इतकेच नव्हे तर रशियन वृत्तपत्रांतून जर्मनीवर कडक टीका होणार नाही, याचीही योग्य ती काळजी घेण्यास सुरवात केली.

स्टॅलिनशहाचे हे वागणे खरोखरच अत्यंत बुचकळ्यात टाकणारे होते. स्टॅलिन व मॉस्कोच्या तालावर नाचणारे देशोदेशींचे व भारतीय कम्युनिस्ट यावेळी ब्रिटिश सरकारची अडचण तीच स्वातंत्र्याची सुवर्णसंधी, या भारतातील वेगवेगळ्या क्रांतिकारक पक्षांच्या भूमिकेला पाठिंबा देत होते व क्रांतिकारी देशभक्त म्हणून मिरवत होते.

या सर्वांवर ताण करणारी अशी गोष्ट स्टॅलिनने यावेळी केली असेल, तर ती म्हणजे या खुशामतीच्या धोरणापायी जर्मन विमानांनी सतत रशियन सरहद्दीचा भंग करूनही त्याविरुद्ध यत्किंचितही उपाययोजना त्याने केली नाही ! सौम्य निषेधखलिते, कडक निषेधखलिते, गंभीर परिस्थिती, या आणि असल्या कागदी घोड्यांच्या उपायाखेरीज अन्य उपाय स्टॅलिनला अवगत नव्हते काय ? ही जर्मन विमाने काय सृष्टिसौंदर्य पाहावयास रशियात थोडीच येत होती ? जे एक जर्मन विमान, यंत्रात विघाड झाल्याने १९ एप्रिलला रशियन सरहद्दीत उतरले, त्याची झडती घेता त्यात रशियन भूमीचे नकाशे व त्यासाठी लागणारी रशियेन भूभागांची छायाचित्रेही रशियनांच्या हाती पडली होती. असे सर्व असताना केवळ जर्मनीच्या हल्ल्यापासून स्वतःचा देश बचावण्यासाठी स्टॅलिन या खास भारतीय पद्धतीनेच वागत राहिला...

एप्रिल महिन्यात ऐशीवेळा जर्मन विमानांनी रशियन-सरहद्दीचा भंग केला, परंतु यांतले एकही विमान पाडण्यात आले नाही.

स्टॅलिनला वाटत होते, 'रूसो-जर्मन संघर्ष न उडताच हे युद्ध संपले, तर इंग्लंड-

फ्रान्स–अमेरिका ही घायाळ झालेली असतील. युद्धाच्या आर्थिक झळीमुळे जर्मनीही युद्धोत्तर कालात काहीसे शांततेचे धोरण स्वीकारील व रशिया सुरक्षित राहील.'

मे, १९४१ पर्यंत स्टॅलिन हा कम्युनिस्ट पक्षाचा फक्त प्रमुख चिटणीस होता व राज्याचे सर्व नेतृत्व मोलोटोव्हकडे होते. ६ मे, १९४१ ला स्टॅलिनने फक्त परराष्ट्र-खाते मोलोटोव्हकडे ठेवून कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीसपद व राज्यकारभाराचे नेतृत्व ही दोन्ही स्वतःकडे घेतली. लाल सरकार हे या दिवसापासून सर्वस्वी स्टॅलिन सरकार झाले. कम्युनिस्ट चळवळीच्या म्होरक्यांना याचा काहीसा अचंबा वाटला.

या घटनेचा अर्थ लावताना शूलेनबर्ग याने बर्लिनला कळवले—

"माझ्या मते जर्मनी व रशियन सरकारमध्ये जे काही कलुषित वातावरण निर्माण होऊ पाहात आहे, त्याबद्दल मोलोटोव्हला जबाबदार धरण्यात येऊन, राज्य-कारभाराचे नेतृत्व आता स्टॅलिनने आपल्या हाती घेतले आहे. जर्मनीशी रशियाचा झगडा उडू नये म्हणूनच स्टॅलिनने हे पाऊल उचलले आहे."

जर्मनीची पावले कुठल्या दिशेने पडत आहेत, याचा अंदाज अजून या पाताळ-यंत्री लाल हुकूमशहाला खरोखरच आला नव्हता काय ? हिटलरने युगोस्लाव्हिया–ग्रीस घशात घातला, हंगेरी–रुमानियात हिटलरच्या फौजा जमा होत आहेत, पोलंड-मध्ये सैन्याची जमवाजमव सुरू आहे, फिनलंडमध्ये जर्मन सैन्य वावरत आहे आणि या सर्वांच्या जोडीला रूसो–जर्मन संघर्ष लवकरच उडणार, अशा वावड्या प्रत्यही उडत असताना स्टॅलिन स्वस्थ का बसला ?

उत्तर एकच संभवते की नाझींनी ज्या देशावर प्राणसंकट आणले आहे, ती इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे भांडवलदारी राज्यपद्धतीची असताना या युद्धात आपण कशाला पडा, असाच विचार स्टॅलिनने केला होता.

## क्रिप्स यांचा गौप्यस्फोट

स्वत: चर्चिल यांनी ३ एप्रिलला स्ट्रॅफोर्ड क्रिप्स या रशियातील ब्रिटिश वकिला-मार्फत स्टॅलिनला इशारा पाठवला होता, "जर्मनी रशियावर लवकरच हल्ला करणार आहे, असे विश्वसनीय वृत्त आम्हाला मिळाले आहे–".

आणि ही गोष्ट खरीच होती. रशियावरील हल्ल्याची अचूक तारीखही क्रिप्स यांना माहीत होती. २४ एप्रिल, १९४१ ला मॉस्कोमधील जर्मन वकिलातीचा नेव्हल अॅटॅचीने बर्लिनमध्ये आरमारीखात्याकडे जो संदेश पाठवला तो असा होता –

"The British Ambassador predicts June 22 as the day of outbreak of the war–"

[ येथील ब्रिटिश वकिलाने असा अंदाज व्यक्त केलेला आहे, की जून २२ या दिवशी लढाई सुरू होईल. ]

याचा अर्थ २२ जून, १९४१ ही तारीख ब्रिटिशांना माहीत आहे, हे जर्मनांनाही ठाऊक होते.

क्रिप्स यांच्या या गौप्यस्फोटामुळे जर्मन वकील शूलेनबर्ग याची पंचाईत झाली. त्या बिचाऱ्याला खरोखरच रशियावर हल्ला होणार आहे, हे ठाऊक नव्हते व प्रामाणिकपणे रूसो-जर्मन लढाई होऊ नये म्हणून तो प्रयत्न करीतच राहिला. २२ मे, १९४१ ला शूलेनबर्गने आपल्या अहवालात कळवले –

"स्टॅलिन व मोलोटोव्ह हे दोघे जबाबदार रशियन नेते जर्मनीशी संघर्ष उडू नये, यासाठी सर्व काही करीत आहेत."

मे महिना संपला. जून उजाडला. १४ जून, १९४१ ला म्हणजे फक्त आठवड्यापूर्वी मोलोटोव्हने शूलेनबर्गला कचेरीत बोलावून 'टास' वृत्तसंस्थेमार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या बातमीचा मसुदा त्याचेपाशी दिला. या बातमीत म्हटले होते –

"सोविएट रशिया व जर्मनी यांच्यातील गैरसमजांना क्रिप्स हे जबाबदार आहेत! अशा तऱ्हेचा प्रचार म्हणजे खरोखर हास्यास्पद गोष्ट होय. जर्मनी व सोविएट रशिया यांच्याविरुद्ध असलेल्या शक्तींचा हा केवळ एक मूर्ख प्रचार आहे."

'टास' ही वृत्तसंस्था सोविएट सरकारची अधिकृत वृत्ते देणारी जबाबदार संस्था! अशा या संस्थेमार्फत हा खुलासा १५ जून, १९४१ ला सोविएट वृत्तपत्रांत व जगभर प्रसिद्ध झाला.

## अखेरच्या लढाईचा निर्णय

१४ जून, १९४१ ला ज्यावेळी मोलोटोव्ह 'टास'चे वृत्त-निवेदन शूलेनबर्गला दाखवीत होता, त्याचवेळी बर्लिनमध्ये हिटलर सेनाधिकाऱ्यांसह अखेरची लष्करी खलबते करीत होता. रशियावरील हल्ला ही काही सोपी गोष्ट नव्हती. आर्क्टिक महासागरापासून तो काळ्या समुद्रापर्यंत १५०० मैलांच्या आघाडीवर सुरू होणारा हा संहार इतिहासात अतिप्रचंड म्हणून नोंदवला जाणार होता. आदले दिवशी रात्रीच सर्व सरहद्दीवरील मोर्चांची पाहणी करून जर्मन सैन्याचा सरसेनापती ब्राउश हा बर्लिनमध्ये सेनानी–बैठकीसाठी परतला होता. १४ जूनला सकाळी ११ वाजता सुरू झालेली सेनाधिकाऱ्यांची ही बैठक सायंकाळी ६-३० वाजता संपली. या बैठकीत सैन्याचे आक्रमणाचे पवित्रे फार थोडा काळ चर्चिले गेले. कारण सुमारे ८ ते १० आठवड्यांत आघाडीवरील गुडेरीनची पॅन्झरसेना मॉस्कोपर्यंत धडक देणार, याविषयी सर्वांचा आत्मविश्वास होता. या बैठकीत मुख्यतः हिटलरचे राजकीय स्वरूपाचेच भाषण झाले. हे भाषण नेमके काय झाले, ते उपलब्ध नाही. परंतु या भाषणाचे जे वृत्तान्त हाल्डर, कायटेल यांनी पुढे आपल्या साक्षीत न्यूरेनबर्ग येथे सांगितले, त्यावरून या भाषणाचा गोषवारा तयार करता येतो.

या भाषणात हिटलरने प्रमुख मुद्दा मांडला होता तो भयानक होता. लष्करीपेशाला लाजिरवाणा ठरवणारा होता. हिटलरने सांगितले –

" आता सुरू होणारा लढा हा निर्णायक स्वरूपाचा आहे. दोन तत्त्वप्रणालींतील ही अखेरची झुंज आहे. सैनिक म्हणन आपण काही पथ्ये पाळतो व आंतरराष्ट्रीय 'कायद्यानुसार ती योग्य अशीच आहेत. परंतु रशियातील युद्धात आपल्याला सैनिकांना लागू असणारे नेहमीचे नियम पाळण्यापेक्षा काही वेगळा व्यवहार करावा लागेल."

हा वेगळा व्यवहार कसला ? यानंतर हिटलरने रशियात उपयोगात आणावयाच्या अनन्वित देहदंडाच्या शिक्षांचे निदर्शन केले. एकाचवेळी हजारोंनी माणसे मारण्याच्या या योजना होत्या. कम्युनिस्ट तत्त्वज्ञान कवटळणारी ही जमात शक्य तो शिल्लकच राहू नये, अशा तऱ्हेने हे हत्याकांड करावे, अशी हिटलरने इच्छा प्रदर्शित केली.

वरील निवेदन कायटेल याने स्वत: न्यूरेनबर्ग खटल्यात केले आहे. कायटेलच्याच वकिलाने त्याला तपासणीत प्रश्न केला –

" हिटलरच्या या आज्ञेला तुम्ही किंवा इतर कुणी सेनापतीने विरोध केला काय ? "

कायटेलने परिणामाचा यत्किंचितही मुलाहिजा न ठेवता सत्य सांगितले.

" नाही. मी काहीही विरोधी सूर काढला नाही व इतर कुणी सेनाधिकाऱ्यानेही असे काही केले नाही. "

हिटलरने " माईन काफ " मध्ये रशियन साम्राज्य निकालात काढण्याच्या विचाराचा जो स्पष्ट उच्चार केला होता, त्याच्या सांगतेची वेळ आता येऊन ठेपली होती. फक्त सात दिवस बाकी होते. आश्चर्याची गोष्ट अशी, की संशयी, पाताळयंत्री व चाणाक्ष म्हणून ख्याती पावलेली क्रेमलीनमधील त्यावेळची प्रभावळ २१ जूनपर्यंत गाढ निद्रेत होती. याचे सारे श्रेय हिटलरकडे जाते. पाताळयंत्रीपणात हिटलरने कम्युनिस्टांवर ताण केली. नकाशातून लाल राजवट कायमची उखडण्याची एवढी प्रचंड यंत्रणा उभी करीत असताना, त्याने क्रेमलीनमधील साऱ्या लालभाईंना गुंगीत ठेवले, झुलवले व आपल्या हेतूची गंधवार्ताही त्यांना लागू दिली नाही.

शितावरून भाताची परीक्षा न होणारे राज्यकर्ते देशाचा कसा घात करतात पाहा ! २१ जून, १९४१ ला रात्री ९-३० वाजता म्हणजे जर्मन सैन्याची चढाई सुरू होण्यापूर्वी केवळ नऊच तास, मोलोटोव्हने शूलेनबर्गला बोलावून घेतले होते. या भेटीत मोलोटोव्हने आपल्या 'शेवटच्या नामर्दपणाचे प्रदर्शन केले, असा जमालगोटा चर्चिल यांनीच मोलोटोव्हला दिला आहे.

[ Molotov delivered his final fatuity. ]

या अखेरच्या भेटीत मोलोटोव्हने काय सांगितले तर...... " जर्मन विमानांनी रशियन सरहद्दीचा वारंवार भंग केल्याचे वृत्त मिळाल्याने आम्ही बर्लिनमधील रशियन वकिलाला रिब्रेन्ट्रॉपपाशी याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यास सांगितले आहे. " बस् ! एवढे सांगून मोलोटोव्हने तो विषय सोडला व शूलेनबर्गला म्हटले,

" जर्मन सरकार आमच्यावर रुष्ट आहे, असे बातम्यांवरून दिसते ! अशा वावड्याही उठत आहेत, की जर्मनी व रशिया यांच्यात युद्ध होणार आहे. सोविएट सरकारला जर्मनीने का रुष्ट व्हावे, हेच कळत नाही. जर याची कारणे तुम्ही आम्हाला स्पष्ट केलीत, तर त्याचे निराकरण करता येईल. "

शूलेनबर्गने उत्तर दिले

" मला याचे उत्तर सांगता येणार नाही. कारण यासंबंधीची काहीच माहिती माझ्यापाशी नाही – "

परंतु ही बातमी काही तासांतच शूलेनबर्गला मिळणार होती !

## अखेरचा संदेश

त्याच दिवशी म्हणजे २१ जून, १९४१ ला रात्री बर्लिनहून शलेनबर्गला संदेश मिळाला.

" हा संदेश पोचताच सर्व संदेशयंत्रणा नाश करून टाका. रेडिओसेट मोडून टाका. मोलोटोव्ह यांची ताबडतोब गाठ घेऊन सांगा, की पुढील निवेदन सादर करावयाचे आहे. "

जे निवेदन सादर करावयाचे होते, त्याचा छाप ठरून गेलेला होता. हे अखेरचे निवेदन लिहिणे हे हिटलर–रिबेन्ट्रॉप या दोघांच्या चांगलेच अंगवळणी पडले होते. या निवेदनात रशियाची पापे ओळीने नमूद केली होती.

(१) नाझी–सोविएट अनाक्रमणाचा करार जर्मनीने प्रामाणिकपणे पाळला, परंतु रशियाने मात्र तो पुनःपुन्हा पायदळी तुडवला आहे.

(२) जर्मनीविरुद्ध घातपात, अत्याचार व हेरगिरी करणाऱ्यांना रशियाने उत्तेजन दिले आहे.

(३) ब्रिटनबरोबर संगनमत करून हंगरी व बल्गेरियावर हल्ला करण्याचा तुमचा विचार आहे.

(४) बाल्टिकपासून काळ्या समुद्रापर्यंत रशियन सेनेची जमवाजमव करून तुम्ही राईश धोक्यात आणले आहे

वरील कारणास्तव—The Fuhrer has ordered the German Armed Forces to oppose this threat with all the means at their disposal."

[ म्हणून फ्यूररने या जर्मनीवर येऊ पाहणाऱ्या संकटाचे परिमार्जन करण्याचा आदेश जर्मन लष्कराला दिला आहे. ]

बर्लिनहून आलेल्या या संदेशाच्या अखेरीस शूलेनबर्गला सूचना होती,

" या निवेदनासंबंधी कुठलीही अधिक चर्चा करू नये. "

शूलेनबर्गला हा संदेश मिळताच काय वाटले असेल ? बिचाऱ्याने आपल्या आयुष्यातला बहुमोल काळ रूसो-जर्मन संघर्ष उडू नये, यासाठी राबवला होता. अखेर

आता त्याला विश्वासात न घेता, न विचारता, जर्मन सेना रशियावर तुटून पडणार होत्या आणि ही दु:खद वार्ता मोलोटोव्हच्या कानावर घालण्याची कामगिरी फक्त त्याच्यावर सोपवली गेली होती.

यावेळी पहाटेचे दोन वाजले होते. शूलेनबर्ग उठला व त्याने रशियन परराष्ट्र-कचेरीत फोन करून आपण येत असल्याचे कळवले. शूलेनबर्ग निघाला तेव्हा पहाट फुटायला थोडा अवधि होता. संदेशाप्रमाणे निवेदनाचे वाचन त्याने मोलोटोव्हपुढे केले.

मोलोटोव्हचा आपल्या कानावर विश्वास बसेना. वाचा गेलेल्या माणसासारखा मोलोटोव्ह निवेदन संपेपर्यंत स्तब्ध होता. निवेदन संपले. शूलेनबर्ग खाली पाहू लागला. मोलोटोव्हने हताशपणे म्हटले,

" It is war. Do you believe that we deserved that ? "

[ याचा अर्थ युद्धच. आम्हाला अशातऱ्हेने वागवण्यात यावे, अशा तऱ्हेचे आमच्या-कडून काही घडले आहे, असे तुम्हाला तरी वाटते काय ? ]

शूलेनबर्ग काय सांगणार ? अखेर तो आपल्या देशाचा फक्त वकील होता. युद्ध-घोषणेचे निवेदन करण्यापलीकडे काही बोलू नये, अशीही सूचना त्याला होती.

## मधुचंद्राची समाप्ती

एखाददुसऱ्या माणसाच्या चांगुलपणावर देशाच्या मन:प्रवृत्तीचे अंदाज बांधून चालत नाहीत. अखेर तो ज्या देशाचा वकील असतो, त्या देशाची जातपात आणि 'आई-बाप' यांचाच अचूक अंदाज राष्ट्राच्या म्होरक्यांना असावा लागतो. तसा तो नसला आणि एखाददुसऱ्या माणसाच्या चांगुलपणावर भरवसा ठेवला, की फसगत होणे अपरिहार्यच असते.

मॉस्कोमध्ये हे नाटयमय संभाषण घडत असताना, त्याचवेळी बर्लिनमध्येही मॉस्कोचा वकील डेकॅनोझोव्ह हा असाच सर्द झाला होता. २१ जून, १९४१ च्या दुपारपासून डेकॅनोझोव्ह रिबेन्ट्रॉपची भेट मागत होता. त्याला जर्मनांनी केलेल्या सरहद्द-भंगाबद्दल निषेधखलिता रिबेन्ट्रॉपला सादर करावयाचा होता. परंतु रिबेन्ट्रॉप बर्लिनमध्ये नाही, असे त्याला सांगण्यात आले. अखेरच्या मध्यरात्री रशियन वकिलातीत फोन आला. यावेळी पहाटेचे २ वाजले होते. २२ जूनला रिबेन्ट्रॉपला वेळ आहे व पहाटे ४ वाजता भेट घेता येईल. पहाटे ४ वाजता ही काय भेटीची वेळ आहे ! डेकॅनोझोव्ह हा बर्लिनमध्ये येण्यापूर्वी स्टॅलिनच्या अंतर्वर्तुळातील होता. लिथुयानियात स्टॅलिनने याचीच रवानगी करून तो देश बळकावला होता. अशा या माणसाला आता रिबेन्ट्रॉप चांगली तिरीमिरी आणणार होता.

डॉ. श्मिथ हा दुभाष्या या भेटीच्यावेळी हजर होता. तो आठवणीत लिहितो —

" डेकॅनोझोव्ह पोचण्यापूर्वी पाच मिनिटे मी रिबेन्ट्रॉपला अत्यंत क्रुद्धावस्थेत पाहात होतो. पिंजऱ्यात कोंडलेल्या श्वापदासारखा तो खोलीत फेऱ्या मारीत होता... "

" डेकॅनोझोव्ह आला. त्याला आत सोडण्यात आले. त्याला काय झाले असावे याची कल्पना नव्हती. आल्या आल्या त्याने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. आम्ही खुर्च्यांवर बसलो. डेकॅनोझोव्हने आपल्या सरकारला हवा असलेला खुलासा सांगण्यास सुरवात केली. डेकॅनोझोव्हने तोंड उघडले असेल नसेल, तोच रिबेन्ट्रॉप त्याला अडवीत खेकसला– " That is not the question now– या सगळ्यांची आता जरूरी नाही... "

" आता कसली जरूरी आहे ते रिबेन्ट्रॉपने मग सांगायला सुरवात केली. जे निवेदन मॉस्कोत मोलोटोव्हला शूलेनबर्गने केले, त्याचाच खर्डा रिबेन्ट्रॉपने डेकॅनोझोव्हपुढे टाकला. जर्मन सैन्याने रशियन सरहद्द यावेळी ओलांडलेली असेल, हे रिबेन्ट्रॉपने सांगताच डेकॅनोझोव्ह सर्द झाला. मनाचा गेलेला तोल सावरायला त्याला थोडा वेळ लागला. परंतु तो लगेच उठला. गोष्टी या थराला गेल्याबद्दल त्याने खेद प्रदर्शित केला. याला जर्मनीच जबाबदार आहे, असे सांगून डेकॅनोझोव्ह वाकून अनिच्छापूर्वक अभिवादन करून निघून गेला. जाताना त्याने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला नाही...! "

अशारीतीने २२ जून, १९४१ ला पहाटे नाझी–सोविएट 'मधुचंद्र' संपुष्टात आला. पहाटे ३-३० वाजता हिटलरचे तोफखाने शेकडो मलांच्या सरहद्दीवर आग ओकीत पुढे चालू लागले.

शूलेनबर्गच्या कर्तृत्वाचा अध्याय येथेच संपला. हिटलरने युद्ध पेटवल्यापासून रूसो-जर्मन संबंध प्रथम योग्य त्या पातळीवर ठेवण्यासाठी व नंतर जर्मनीने रशियावर चढाई करू नये, या मतांचा पाठपुरावा करीत राहिलेला हा जर्मन मुत्सद्दी यानंतर जर्मनीत परतला व त्यावर सक्तीची निवृत्ती लादण्यात आली.

जनरल बेक व हासल यांच्या नेतृत्वाखाली नाझीसत्ता झुगारून देण्याचा जो असफल प्रयत्न १९४४ मध्ये झाला, त्यात शूलेनबर्ग सामील होता. यामुळे शूलेनबर्गला नंतर अटक करण्यात आली व गेस्टापोने १० नोव्हेंबर, १९४४ ला त्याला गोळ्या घातल्या !!

[ अपूर्ण ]

# विचार धारा

समीर

● **कायद्याची कक्षा**

नव्या दिल्लीत निरनिराळ्या दूतावासांच्या मोटारगाड्या इतक्या बेदरकारपणे चालविण्यात येतात, की त्यांच्या नंबरप्लेटवरच्या "सी. डी." ('कोर डिप्लोमॅटिक') या अक्षरांचा अर्थ 'केअरलेस ड्रायव्हर' असा करण्यात येतो. परदेशी वकिलातीतल्या काही उच्च अधिकाऱ्यांना 'राजनैतिक सूट' (डिप्लोमॅटिक इम्यूनिटी) असते. अर्थात त्यांच्या मोटारहाक्यांना नाही, पण अधिकाऱ्यांना तरी ही सूट किती असावी? नायजेरियाचे भारतातील हायकमिशनर श्री. अदेदोकुन हासट्रप यांनी गेल्या आठवड्यात या विषयावर 'इंडियन सोसायटी फॉर इंटरनॅशनल लॉ' या संस्थेपुढे भाषण करताना या मुद्यावर जोर दिला, की अशा प्रकारचे राजनैतिक अधिकार व सूट शक्य तेवढी कमी करणे आवश्यक आहे.

देशात बरीचशी माणसे अशारीतीने कायद्याच्या कक्षेपलीकडे असू देणे चांगले नाही. विशेषतः जे देश नुकतेच साम्राज्यवादी देशांच्या बंधनातून मुक्त झाले आहेत, अशा देशांत तर ही सूट खच्ची करणे अधिकच महत्त्वाचे आहे. अशी सूट देण्याची आर्थिक बाजू एकवेळ दृष्टीआड केली तर निवडक व्यक्तींना हे अधिकार दिल्याने सर्वसाधारण जनतेवर अनिष्ट सामाजिक व मानसिक परिणाम होतात. कारण बहुधा असे घडते, की नवस्वतंत्र देशांत पूर्वी त्या देशावर ज्या देशाचे अधिराज्य होते, त्यांचीच राजकारणी माणसे व तंत्रज्ञ फार मोठ्या प्रमाणावर असतात. अर्थात स्वातंत्र्यपूर्वकाळात राज्यकर्ते म्हणून या मंडळींना विशेषाधिकार होतेच, पण स्वातंत्र्यानंतरही त्यांचा खास बडेजाव का चालू राहावा, हे सामान्य माणसाला समजत नाही व त्याचा त्याला रागही येतो.

नव्या दिल्लीची चाणक्यपुरी निरनिराळ्या दूतावासांच्या आलिशान इमारतींनी इतकी गजबजलेली आहे, की ही सूचना अमलात आणायला निश्चित वाव आहे.

● **नोकरशाही कुठे नाही ?**

वीस अमेरिकन पत्रकार, संपादक आणि प्रकाशकांचे एक मंडळ देशाटन करीत करीत नुकतेच दिल्लीला येऊन गेले. पाश्चात्त्य पत्रकार साधारणपणे मुंबई किंवा दिल्लीला एक सबंध दिवस ताज किंवा अशोक हॉटेलात राहून गेला, की हिंदुस्थानवर पुस्तक लिहू शकतो, पण प्रस्तुत मंडळाचे प्रमुख आणि 'अमेरिकन न्यूजपेपर स्टडी मिशन'चे अध्यक्ष श्री. एडगर बयॉल हे तिसऱ्यांदा भारत–भेटीस आले होते, तेव्हा त्यांचे मत त्यातल्या त्यात ग्राह्य.

हिंदुस्थानातल्या शासनयंत्रणेचे वर्णन करताना बयॉल म्हणाले, "हे सरकार म्हणजे लाल फितीत अगदी गुरफटून गेलेले एक भले मोठे नोकरशाहीचे अवडंबर आहे. सुदैवाने अमेरिकन सरकार भारत सरकार-इतके नोकरशाहीला वाहिलेले नाही, पण तेही आता डोईजड व्हायला लागले आहे आणि समाजवादाकडे कलायला लागले आहे." नोकर-शाहीचे अत्यंत पराकोटीचे स्वरूप दिसते रशियात. तेथे अगदी लहानसे काम असले तरी असंख्य फॉर्म भरीत बसावे लागते.

आणखी काही ग्राह्य नसली तरी स्मरणीय मते :

हिंदुस्थानच्या उन्नतीत समाजातल्या वर्णाश्रम व्यवस्थेमुळे अडथळा येत आहे.

भारतीय नेत्यांत झगडण्याची दमदार वृत्ती नाही. "त्यांचा नरमपणा भारतीय धर्मावर आधारलेला दिसतो."

● **नकाशा कसा काढावा ?**

हिंदुस्थानचा नकाशा काढणे शाळेतल्या मुलाला जितके अवघड वाटते, तितकेच भारत सरकारलाही वाटत असल्याचे दिसते. कारण ते शिकविण्यासाठी सध्या लॉरेन्स एमिल लॅंबेले नावाचे अमेरिकन नकाशा-तज्ज्ञ भारतात आले आहेत.

लॅंबेले म्हणतात, "नकाशा काढणे (कार्टोग्राफी) ही एक कला आहे.

तसेच ते एक तंत्रही आहे. ज्या प्रदेशाचा नकाशा काढायचा त्याच्या स्वरूपाची सर्वांगीण कल्पना आली पाहिजे, हे नकाशा काढण्याचे मूलभूत उद्दिष्ट आहे. त्यासाठी विशेषतः 'स्टीरिओ स्कोपिक' मानचित्रासाठी अत्यंत आधुनिक उपकरणांचा नकाशा काढण्यासाठी उपयोग करावा. अशा पद्धतीने हिंदुस्थानचे नकाशे तयार केले, तर या देशातली अमाप खनिज संपत्ती खणून काढण्यासाठी ते फार उपयोगी पडतील. दिल्लीत एकच आठवडा राहून मला खात्री पटली, की येथली नकाशे काढण्याची पद्धती प्राथमिक अवस्थेतून बाहेर पडली आहे." • • •

## "माणूस"चा माणूस अमेरिकेत



"माणूस"चे नवीन लेखक श्री. सुधाकर राजे, एम्. ए. एल्एल्. बी., नवी दिल्ली, हे दिनांक ११ जुलैला विमानाने अमेरिकेस रवाना झाले. 'एक्स्पेरिमेंट इन् इंटरनॅशनल लिव्हिंग' या नावाच्या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे ते सुमारे दोन महिने निरनिराळ्या ठिकाणी राहून अमेरिकन सामाजिक, व्यावसायिक व कौटुंबिक जीवनाचे जवळून निरीक्षण करणार आहेत. अशा पद्धतीच्या निरीक्षणाने व प्रत्यक्ष अनुभवाने खरे आंतरराष्ट्रीय सौहार्द वाढते, या तत्त्वाला अनुरून ही संस्था जगातील निरनिराळ्या ३०–३५ देशांच्या तरुण, सुशिक्षित व संस्कारक्षम नागरिकांचे आदान–प्रदान दरवर्षी करीत असते. यंदा भारतातून अमेरिकेस जाणाऱ्या ८० स्त्री–पुरुषांच्या तुकडीचे प्रमुख म्हणून श्री. राजे यांना आमंत्रण देण्यात आले आहे. श्री. राजे हे पत्रकार असून दिल्लीला भारत सरकारच्या 'पेट्रोलियम इन्फर्मेशन सर्व्हिस'मध्ये प्रसिद्धी अधिकारी म्हणून काम करीत असतात.

'भिंतीच्या तुंबड्या' हे श्री. राजे यांचे सदर दोन–अडीच महिने स्थगित राहील. —संपादक.

# एक गुरु-शिष्य संवाद

गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनी एका समारंभात भाषण करताना नुकताच असा विचार बोलून दाखविला, की 'स्वातंत्र्यापूर्वी एकेका कार्यक्षेत्राला आजन्म वाहून घेणारी अनेक निष्ठावंत माणसे आढळून येत होती. आज ही परंपरा खंडित झाल्यासारखी दिसते.' गृहमंत्र्यांच्या या विधानात खूप तथ्य आहे. हे खरे आहे, की आजही आपल्यात एखादे धनंजय कीर दिसून येतात. पण माहीमच्या आपल्या एका खोलीच्या घरात मुलाबाळांनी गजबजलेल्या गरीब संसारात, कॉर्पोरेशनमधील कारकुनीची नोकरी सांभाळून आपल्या अधू डोळ्यांनी वर्षानुवर्षे कागदपत्रांचे संशोधन करून, अनेक ग्रंथांचे वाचन करून, भारतीय राष्ट्रनिर्मात्यांची चरित्रे इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध करण्याचा प्रचंड उद्योग, अत्यंत निःस्पृहपणे पार पाडीत असलेले कीर हे अपवाद म्हणूनच दाखविता येतील. गृहमंत्री म्हणतात त्याप्रमाणे अशा निरलस, निःस्पृह तपस्व्यांचे प्रमाण समाजात आज कमी होत चालले आहे, हे खरे आहे. याला कारणेही देता येतील. जीवन बहुरंगी झाले. खोलीपेक्षा विस्ताराला महत्त्व आले. लोकप्रियता, लोकानुरंजन, सत्ता, संपत्ती यांचे आदर्श समाजात मानमान्यता पावले वगैरे कारणे या स्थित्यंतरामागे असू शकतील. पण अशा निष्ठालोपाच्या काळात जुन्या पिढीतील एखाद्या कार्यकर्त्याच्या, लेखकाच्या परिश्रमाचे एखादे स्मारक समोर आले तर फार काळानंतर अचानक एखाद्या जुन्या, थोर नातेवाइकाची भेट घडावी तसे होऊन जाते. 'लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका'-कार श्री. स. वि. बापट यांचे येत्या १ ऑगस्टला प्रसिद्ध होत असलेले पुस्तक पाहून कोणालाही असाच सत्संगाचा व भेटीचा आनंद झाल्यावाचून राहणार नाही.

या नवीन ग्रंथाचे नाव आहे–' टिळक, केळकर, बापट–चरित्र व आठवणी ग्रंथ.' श्री. बापट यांचे टिळकांच्या आठवणींचे तीनही ग्रंथ आज अनेक वर्षे दुर्मिळ आहेत. खुद्द लेखकाकडेही या ग्रंथाची एकही प्रत शिल्लक नाही. या तीनही ग्रंथांनी मराठी चरित्रवाङमयात एक मोलाची भर घातली; चरित्रवाङमयात एक नवीनच दालन उघडले हे सर्वमान्य आहे. तात्यासाहेब केळकर यांच्या त्रिखंडात्मक चरित्रग्रंथापेक्षा या आठवणीग्रंथांची मोहिनी सामान्य जनांवर विशेष पडली. कारण निर्गुणापेक्षा सगुण कथा ऐकण्याकडे वाचकांचा केव्हाही ओढा अधिकच. चॅनिंग या आंग्ल लेखकाने म्हटल्याप्रमाणे, "One simple of anecdote of a great man is worth a volumes of biography"—हेही आठवणींचे मोल कोणी नाकारू शकणार नाही.

पण टिळक–आठवणींचे हे अवीट गोडी असणारे श्री. स. वि. बापट यांचे तीनही मूळ खंड आज नव्या पिढीसमोर उपलब्ध नाहीत. याची काहीशी उणीव या नवीन प्रकाशित होणाऱ्या ग्रंथामुळे भरून निघेल असा विश्वास वाटतो.

या ग्रंथात श्री. बापट यांनी स्वत: लिहिलेल्या पूर्वीच्या आठवणीग्रंथातील टिळकांच्या आठवणी एकत्रित करण्यात आलेल्या आहेत. तसेच बापट यांनी लिहिलेल्या 'गुरुवर्य तात्यासाहेब केळकर' यांच्या आठवणी, आठवणी ग्रंथांच्या प्रस्तावना, स्फुट लेखन, पत्रव्यवहार इत्यादी सर्व संग्रह यात आहे. थोडक्यात हा 'बापट लेखन-संग्रह' आहे. सहाशे पृष्ठांच्या या संग्रहग्रंथाची किंमत केवळ सहा रुपये ठेवण्यात आली आहे.

## 'सत्पुरुष' श्री. अण्णासाहेब

हा संग्रह श्री. बापट (ज्यांना त्यांचे सहकारी, 'केसरी'चे माजी संपादक कै. वा. कृ. भावे यांनी 'सत्पुरुष' म्हणून गौरविले आहे) यांचे पुतणे श्री. किशोर शंकर बापट यांनी संपादित केला आहे. संपादकांचे प्रारंभीचे आत्मनिवेदन वाचले, की श्री. बापट यांची निरलस कार्यकर्त्याची, दृढव्रत लेखकाची मूर्ती चटकन् डोळ्यांसमोर उभी राहते. लोकमान्यांच्या आठवणींचा एकेक मोती जमा करताना केवढा खटाटोप, केवढा अट्टहास करावा लागला, किती मानापमानांचे चटके बसले, किती दूरदूरची संधाने बांधावी लागली याची संपादकांनी व श्री. बापट यांनी दिलेली हकीकत मोठी रोचक व उद्बोधकही आहे. टिळकांचे डावेउजवे हात समजले गेलेले खाडिलकर आणि परांजपे यांच्याकडून बापटांना कशी वागणूक मिळाली आणि मंडालेला ज्या खोलीत टिळक राहिले त्या खोलीचा फोटोग्राफ धोका पत्करून सुभाषचंद्र बोस यांनी बापट यांच्या हवाली किती तत्परतेने आणि कर्तव्यभावनेने केला, ही तफावत पाहिली, की मनुष्यस्वभावाच्या आपल्या ज्ञानात खचितच भर पडते. एके ठिकाणी तर या आठवणी गोळा करण्यासाठी लिहिलेल्या पत्रांचे आणि आलेल्या मजकुराचे एक कोष्टकच मांडून दाखविले आहे. कोष्टक असे–

| खंड | ग्रंथाची पृष्ठ-संख्या | किती लोकांस लिहिले | पत्रसंख्या | आठवणी पाठविणारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ५५० | ३०० | ११०० | १६० |
| २ | ७२५ | ६५० | २७७२ | २७० |
| ३ | ६०० | ६१७ | २१२० | २७१ |
| | १८७५ | १५६७ | ५९९२ | ७०१ |

म्हणजे प्रत्येक आठवणीसाठी पाचपाच, सहासहा पत्रे पाठवावी लागली. भेटी निरोप, हेलपाटे याला तर गणतीच नाही.

## ब्रह्मचारी बापट यांचा पुत्रशोक

आणि एवढा सार व्याप करूनही हाती आलेले धन काही कारणास्तव नष्ट व्हावे, चोरीस जावे, आगीच्या भक्ष्यस्थानी पडावे, तेव्हा संग्रहकाला होणाऱ्या दारुण मानसिक वेदनांची कल्पनाच करणे कठीण. खानदेशच्या प्रवासात बापटांचे एक हस्तलिखित बाड चोरीस गेले, तेव्हा तात्यासाहेब केळकर यांनी 'ब्रह्मचारी बापट यांना पुत्रशोक झाला,' असे या दुःखाचे चटका लावणारे वर्णन केले आहे. संपादकांनी आपल्या प्रारंभीच्या आत्मनिवेदनात अण्णांना (श्री. स. वि. बापट यांचे घरगुती नाव) बसलेल्या अशा सहा मानसिक धक्क्यांचे बाळबोध पद्धतीने वर्णन केले आहे, तेही बापटांविषयी वाचकाला अधिकच सहानुभूती वाटायला लावणारे आहे. सहापैकी एक धक्का असा होता–

" लोकमान्यांच्या आठवणींसंबंधीं तिन्ही खंडांकरिता अण्णांनी (स. वि. बापट) मोठ्या प्रयत्नाने मजकूर मिळविला होता. हा सर्व मजकूर जबाबदारीचा असल्यामुळे तो सराईत दृष्टीच्या थोर पुरुषांकडून तपासून, पारखून घेण्याचे भाग्य त्यांस लाभले. यामुळे ते निर्धास्त असत. हा मजकूर त्यांच्या हाती पडताच तो प्रथमतः तात्यासाहेब केळकर यांस ते दाखवीत. तात्यासाहेब निरलसपणे व फार काळजीने हा मजकूर पाहात. त्यांच्या सूक्ष्म नजरेखालून गेली नाही अशी तिन्ही खंडांतील एकही ओळ तुम्हास सापडणार नाही. तो मजकूर तपासत असता, त्यांच्या दृष्टीने आक्षेपार्ह मजकूर ते बाजूला ठेवीत, मग तो कोणाचाही व कितीही महत्त्वाचा असो. लोकमान्यांच्या जीवनावर निराळा नवा प्रकाश पाडणारा असा कितीतरी अज्ञात मजकूर त्यास सापडू लागला. असा मजकूर पाहून तात्यासाहेब चकित होत. ते एकदा अण्णांस म्हणाले, " बापट, माझे सर्व आयुष्य बळवंतरावांच्या सान्निध्यात गेले खरे; पण तुम्ही नाना प्रकारच्या लोकांकडून मिळवीत असलेल्या मजकुरांपैकी काही विलक्षण मजकूर पाहून बळवंतरावांच्या मनाचा थांग लागणे कठीणच जाईल ! मात्र हल्लीच्या काळात अशा प्रकारचा मजकूर पचला जाणे कठीण आहे. म्हणून तो सर्व बाजूला काढून ठेवीत आहे. अनुकूल काल आल्यावर त्याचे एक स्वतंत्रच पुस्तक काढू. मजकूर जपून ठेवा."

"वरील मजकूर फार महत्त्वाचा, भानगडीचा व सरकारसंबंधाचा होता. सुमारे तीन-चारशे पानांचा तो ग्रंथ झाला असता. या मजकुराने टिळकांच्या खऱ्या अंतरंगाचे दर्शन घडले असते. पण योगायोग तसा नव्हता. १९४७ साली देश स्वतंत्र झाल्यावर या ग्रंथाविषयीचे बोलणे अण्णांनी केळकर यांच्याशी सुरू केले. तेव्हा याचा लवकरच विचार करू असे तात्यासाहेब म्हणाले. पण पुढील वर्षी एकाएकी ते दिवंगत झाल्यामुळे हा ग्रंथ मागे पडला व प्रत्यक्ष तात्यासाहेब यांच्या आठवणींचा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध करण्याच्या उद्योगास अण्णा लागले. लोकमान्यांच्या आठवणींचे मुळापासूनचे सर्व काम सार्वजनिक सभेच्या कचेरीत करीत असल्यामुळे व तेथले

सर्व कागदपत्रांचे साहित्य ठेविले असल्यामुळे १९५२ साली त्या संस्थेच्या इमारतीस भयंकर आग लागून त्यात त्या संस्थेच्या सर्व मालाबरोबर अण्णांनी जिवापलीकडे सांभाळून ठेवलेले ते सर्व साहित्य भस्मसात झाले. अर्थात् त्यात हा अमोल, दुर्मिळ ठेवा नष्ट झाला. अण्णांना बसलेला हा तिसरा मानसिक धक्का होय."

असे प्रसंग किंवा अनुभव श्री. बापट यांना अनेकदा भोगावे लागल्यामुळे त्यांना उगाचच एक खंत वाटत राहिलेली होती, की 'आपण अपयशी आहोत, आपल्या हाताला यश नाही.' पण हा ग्रंथ पाहून वाचक तरी असेच म्हणतील, की श्री. बापट यांनी केलेली वाङ्मयसेवा मोलाची आहे, पुढच्या पिढीला मार्गदर्शक आहे. या ग्रंथात आलेल्या, श्री. बापट यांनी लिहिलेल्या केळकर व टिळक यांच्या आठवणींची थोडी वानगी येथे पाहण्यासारखी आहे.

## केळकरांचे सभाचातुर्य आणि विनयशीलता

केळकरांच्या सभाचातुर्याची एक आठवण पृष्ठ ३६७ वर अशी आहे: "१९१९ साली विठ्ठल रामजी शिंदे व केळकर पुणे शहरातर्फे कायदे कौन्सिलच्या निवडणुकीला उभे होते. भवानी पेठेत सभा झाली. खासेराव जाधव अध्यक्ष होते. प्रथम विठ्ठलराव शिंदे बोलायला उभे राहिले व म्हणाले की, "मी जातिवंत मराठा आहे. माझा बाप शेतकरी होता." ती वेळ ब्राह्मणेतर चळवळीची असल्यामुळे जमलेल्या मराठा मंडळीला शिंदे यांचे बोलणे पटून त्यांनी टाळ्या वाजविल्या. पुढे केळकर बोलायला उभे राहिले व प्रथमच म्हणाले की, "शिंदे यांनी सांगितलेल्या दोन्ही मुद्यांवर मीच अधिक सरस ठरतो, तेव्हा मलाच निवडून द्या. कारण शिंदे यांचा बाप शेतकरी होता, पण माझे दोन्ही घरचे आजे शेतकरी होते व मी स्वतः नांगरकुळवांवर बसून चाबूक उडविलेला आहे. तेव्हा शिंदे यांच्यापेक्षा माझ्या घराण्यात शेतकरीपणा अधिक जुना आहे की नाही ? आता शिंदे हे जातिवंत मराठे पुढारी म्हणवितात पण या दिवसात जातीला महत्त्व कोण देतो ? जातीवंत मराठे म्हणविणारापेक्षा स्वतःला मुद्दाम आवडीने 'मराठा' म्हणवून घेणाराचा अभिमान अधिक नाही काय ? तसा मी आहे. म्हणजे ज्या पत्राचा मी संपादक आहे, त्या पत्राचे नावच 'मराठा' आहे. ज्यांनी मूळ 'मराठा' पत्र काढले, त्यांना त्याचे नाव 'ब्राह्मण' असे ठेवता आले नसते काय ? पण तसे न करता त्यांनी 'मराठा' हे नाव मुद्दाम ठेवले. शिंदे हे जन्माने मराठे याचा अर्थ त्यांचा नाइलाज आहे आणि आमच्या 'मराठा' पत्राचे नाव मुद्दाम मराठ्यांच्या अभिमानाने ठेवलेले आहे. तेव्हा दोन मुद्यांवर कोणाला निवडून देणार ते सांगा."

पृष्ठ ४१५ वर तात्यासाहेब केळकर यांच्या जन्मजात विनयशीलतेची एक आठवण श्री. बापट सांगतात: "लो. टिळकांच्या आठवणींच्या पहिल्या खंडास त्यांनी (केळकरांनी) प्रस्तावना लिहिली आहे. त्या ग्रंथाची त्यावेळी जाहिरात मी 'केसरी'त दिली; तीत त्यांच्या नावामागे 'साहित्यसम्राट' असे उपपद मी लिहिले होते.

'केसरी' च्या सदर जाहिरातीचे स्टीरिओ केलेले पान त्यांनी आदल्या रात्री सहज पाहिले. जाहिरातीतील 'साहित्यसम्राट' हा शब्द पाहून त्यांना राग आला व तेवढा तो शब्द त्यांनी छिन्नीने उडवून लावला! दुसऱ्या दिवशी सकाळी मी 'केसरी' पाहतो तो हा प्रकार दिसला. चकित झालो. चौकशी करता तात्यासाहेबांकडे बोट दाखविण्यात आले. त्यांस विचारता ते म्हणाले, "अहो माझा स्वभाव तुम्हास माहीत आहे. माझ्या माणसाने, माझ्या पत्रात, माझी अशी स्तुती करणे बरोबर आहे का? हे मला बिलकुल मंजूर नाही; म्हणून मी तो शब्द काढून टाकला."

लोकमान्यांच्या आठवणी तर अनेक आहेत. काही फार अप्रतिम आहेत. लोकमान्यांचे एक स्नेही मुंबईचे श्री. अण्णासाहेब नेने यांनी निवेदन केलेल्या आठवणींपैकी एक आठवण अशी आहे—

"पुढे एक वर्ष शिक्षा भोगून ते (टिळक) परत आल्यावर एके दिवशी आम्ही गोष्टी बोलत बसलो असता, स्नेहपूर्वक जरा थट्टेने मी त्यास म्हटले, "एक वर्ष जरा कोठे आपण शिक्षा भोगून आलात ते, लोक आपणास हार घालून, पाया पडून देवाप्रमाणे भजू लागले. मग जे देशाकरिता हत्तीच्या पायी मेले गेले, तापलेल्या तव्यावर उभे राहून ज्यांनी देह जाळून घेतले, कडेलोट केल्याने ज्यांनी देशाकरिता प्राण सोडले, तोफेच्या तोंडी दिल्याने ज्यांचे तुकडे उडाले, अंगावर तेल ओतून पेटवून दिल्याने जे पापडाप्रमाणे भाजून मेले, सव्वा मणाच्या बेड्या सोसून ज्यांनी देह झिजविले अशा नरवीर देशभक्तांचे मग किती कौतुक केले पाहिजे?" हे ऐकून अत्यंत गंभीरपणे लोकमान्य म्हणतात, "हो, अगदी खरे. अहो, तुम्ही आता वर्णन केले त्यापुढे आमचे कष्ट म्हणजे कोणत्या झाडाचा पाला? देशसेवेकरिता ती एक चैनच आम्ही करतो असेच उलट मला वाटते. खरोखरच आमच्या या कष्टात विशेष काय आहे? जरा विचार केला आणि आमच्या पूर्वीच्या लोकांनी धर्माकरिता अगर स्वामिकार्याकरिता देहाचे कसे होम केले हे पाहिले, म्हणजे आमच्या पोकळ कष्टाबद्दल गळ्यात पडणाऱ्या हारांच्या फुलांचा हा निव्वळ दुरुपयोग आहे, असे वाटते. इतकेच नव्हे तर एखाद्याने सामान्य कर्तव्य बजावल्याबद्दल, त्यास अनुरूप असे भलतेच पारितोषिक देण्याने, खरोखरच जनतेच्या गुणग्राहकतेची किंमत होऊन तिच्या अल्पसंतुष्टतेबद्दल कीव येते. इतकेच नव्हे तर तिला अगदी भलतेच वळण लागते, याबद्दल मनातून मला बहुत खेदही होतो."

**मुखपृष्ठ कथा**

आणि या अंकाच्या मुखपृष्ठावर ज्याचा उल्लेख आला आहे, ती आठवण तर लोकमान्यांच्या क्रांतिकारक जन्मस्वभावावर चांगलाच प्रकाश टाकणारी आहे.

'—१९०७ सालच्या उन्हाळ्यात लोकमान्य सिंहगडावर असता दे. लाला लजपतराय यांस अकस्मात हद्दपार करण्यात आले, ही बातमी कळताच तात्यासाहेब

केळकर यांनी ताबडतोब खाली येण्याकरिता लोकमान्यांस सिंहगडावर बोलावणे पाठविले. सायंकाळी गाडीतून उतरून लोकमान्य गायकवाडवाड्यात शिरतात तोच तिकडून सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस अप्पासाहेब मांडे येत होते. ते त्यांच्या-बरोबर लोकमान्यांच्या घरात माडीवर गेले. श्री. स. वि. बापट तर लोकमान्यांच्या येण्यावर अगदी डोळा ठेवूनच बसले होते. तेही लोकमान्यांच्या पाठोपाठ माडीवर गेले. अप्पासाहेब मांडे उद्वेगाने लोकमान्यांस म्हणाले, " लजपतराय यांस हद्दपार करण्यात आले. " डोक्यावरची पगडी काढून डाव्या हाताने खुंटाळच्यावर ठेवीत व उजव्या हाताने अंगरख्याचे बंद सहज सुटेनात म्हणून तोडीत खवळलेल्या सिंहा-प्रमाणे लोकमान्य उद्गारले, " लालाजींसारखा देशभक्त हद्दपार होतो आणि लॉर्ड मिंटो (ग. जनरल) अजून कसा जगतो ? " पण जरा थांबून, शांतपणे पण जरा निराशेने हलक्या स्वरात ते म्हणाले, " या दुर्बल राष्ट्राकडून भलतीच अपेक्षा करणे मूर्खपणाचेच आहे. " (पृ. ३१३-३१४)

१०।२० पाने सहज चाळली तरी मधूनच आठवणीचा, नवीन माहितीचा, विचाराचा असा एखादा मोती चटकन् हाताशी लागतो. अशा या ग्रंथाच्या श्रद्धावान् व लोकसेवापरायण ग्रंथकर्त्यावर, स्वातंत्र्यकालात आपले घरदार जातीय विद्वेषाच्या आगीत नष्ट झाल्याचे पाहणे नशिबी यावे, आपली दुर्मिळ हस्तलिखिते आगीपासून वाचविण्यासाठी त्याला पुण्यासारख्या शहरात दारोदार हिंडावे लागावे, हे पाहून कोणाही सुसंस्कृत व्यक्तीला खेद झाल्याशिवाय राहणार नाही. केळकरांच्या आठवणींचे बाड कसे सुरक्षित राहिले हे सांगताना बापट लिहितात—

**टिळक मंदिर ते पाँडेचरी आश्रम . . .**

"३० जानेवारी...म. गांधींचा वध. लोकक्षोभाच्या ज्वालामुखी पर्वताचे रौद्र रूप प्रकट झाले. प्रत्यक्ष पुणे शहरात दंगल झाली व तीत टिळक मंदिरही सापडले ! या मंदिराच्या कचेरीतच आठवणींचे कामकाज मी करीत असे. दंगेखोरांनी टिळक मंदिराच्या आत व बाहेर आग पेटविली. ती पाहून मी बेभान झालो ! तशा स्थितीत मी तेथे गेलो व टिळक मंदिराच्या मौल्यवान कागदपत्रांच्या दफ्तरात आठ-वणींचे सर्व साहित्य बांधून, टांगा अगर मजूर न मिळाल्यामुळे, ते भलेमोठे जड दफ्तर डोक्यावर घेऊन बाहेर पडलो. ते घेऊन घरी येण्याची सोयच नव्हती ! म्हणून टिळक मंदिराजवळील विश्वासाच्या एका मित्राच्या घरी ते ठेवण्यास गेलो. त्यांनी सांगितले, 'तुमचा हा जळका वासा येथे ठेवू नका !' म्हणून दुसऱ्या स्नेह्या-कडे गेलो. ते म्हणाले, 'आताच आमच्या घराची झडती झाली, पुन्हा होण्याचा संभव आहे; तुमचा तुम्ही विचार करा.' म्हणून तिसऱ्या स्नेह्याकडे गेलो. त्यांचे घर आज पेटविले जाण्याचा संभव आहे असे तेथे कानावर आले ! जसे कोणी पाठीशी लागल्यास कावरी-बावरी होऊन मांजरी तोंडात पिल्लू घेऊन त्यास ठेवण्यास निवाऱ्याची जागा शोधते तशी माझी गत झाली ! अखेर एकदाचे

सुरक्षित ठिकाणी ते दफ्तर ठेविले. तेव्हा माझा जीव भांड्यात पडला." (पृ. ४२९)

याच संहारात सातारा जिल्ह्यातील श्री. बापट यांचे श्रीकृष्णेच्या काठचे राहते घरही अग्निस्थानी पडले व अग्निदग्ध झालेल्या इमारतीची जागाही सक्तीने, बळजबरीने, धाकाने अण्णांचेकडून मोफत मिळविण्याचा प्रयत्न विशिष्ट पक्षाने केला, ही संपादकांनी आत्मनिवेदनात दिलेली माहितीही उद्बोधक आहे. विशेष म्हणजे अद्यापही या अन्यायाची दाद लागलेली नाही.

लोकक्षोभ अनावार असतो हे खरे आहे; न्यायासाठी, समतेसाठी चळवळीचे रान उठवावे लागते हेही मान्यच आहे; पण किमान सांस्कृतिक पातळी अशा प्रसंगी राखली जाणे अगत्याचे आहे. सामाजिक आदर्श अशा क्षोभाचे प्रसंगीही टिकवून धरले पाहिजेत, एवढीच सुसंस्कृत व्यक्तीची अपेक्षा असते. ज्ञानाशी, सांस्कृतिक आदर्शांशी शत्रुत्व करणारी बेजबाबदार जमावशाही फोफावू दिली, तर बापटांची हस्तलिखितेच काय, राष्ट्रपतींचे ग्रंथालय आणि पाँडेचरीसारखे आश्रमही सुरक्षित राहणार नाहीत. मग श्री. बाळासाहेब देसाई यांना अभिप्रेत असणारी एकनिष्ठ ज्ञानोपासनेची परंपरा या देशात कशी टिकणार, कशी वाढणार !

**[ टिळक, केळकर, बापट—चरित्र व आठवणी ग्रंथ**
**प्राप्तिस्थान—अ. वि. गृह प्रकाशन, पुणे. किंमत सहा रुपये. ]**

**श्री. ग. मा.**

# विद्यार्थ्यांचा संप

नुकत्याच करण्यात आलेल्या एका पाहणीत १९६४ साली आपल्या देशात विद्यार्थ्यांचे २६१ संप झाल्याचे आढळून आले आहे. या २६१ संपांपैकी २०७ महाविद्यालयांत व ११ विद्यापीठांत झाले. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या माहितीनुसार भारतात ६१ विद्यापीठे व २,१११ महाविद्यालय आहेत (आकडे १९६३-६४ चे आहेत). महाविद्यालयात झालेल्या संपाची संख्या विद्यापीठांत झालेल्या संपापेक्षा जरी जास्त असली तर विद्यापीठात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपाचे प्रमाण अधिक पडते. ६१ विद्यापीठांपैकी ११ विद्यापीठांत संप झाले, म्हणजे शेकडा प्रमाण १८ इतके पडते. परंतु २,१११ महाविद्यालयांपैकी २०७ महाविद्यालयांत संप झाले, हे प्रमाण अवघे शेकडा १० टक्के पडते.



### ट्रुफो यांचा 'सर्कस शो'

# जूल्स आणि जीम

दुसऱ्या महायुद्धानंतर चित्रपटव्यवसायात ज्या काही देशांनी कलादृष्टया क्रांतिकारक प्रगती केली, त्यात इटलीप्रमाणेच फ्रान्सचाही उल्लेख होत असतो. १९५९ साल यादृष्टीने फ्रेंच चित्रपटसृष्टीत महत्त्वाचे ठरले. ज्याला लाट म्हणतात–Nourelle vague–ती निर्माण झाली. फ्रॅन्कवा ट्रुफो, क्लॉडी चाब्रॉल, अलन रेस्ने, क्रिस मार्कर इत्यादी चित्रपटदिग्दर्शकांनी या कालात आपल्या चित्रकृती सादर केल्या. हे सर्व चित्रपटकार एकाच प्रकारचे चित्रपट तयार करू लागले, असा मात्र याचा अर्थ नव्हे. तर या प्रत्येकाने नवी नवी क्षितिजे धुंडाळण्याची धडपड वेगवेगळ्या दिशांनीच केली व त्यातून ही नवी लाट निर्माण झाली.

या नव्या दिग्दर्शकांचे वैशिष्टच हे होते, की कमीतकमी खर्चात ते चित्रपट उभे करीत. ही फार सोपी गोष्ट आहे, अशा कल्पनेने शेकडो नावे या कालात नवे घेऊन उभी राहिली. परंतु अखेर हिशेबाला १०-१२ च उरली. वर उल्लेखलेल्या दिग्दर्शकांत पुन: दोन गट स्पष्ट झाले. एकात ट्रुफो व चाब्रॉल यांचा समावेश करता येईल, तर दुसऱ्या गटात ॲलन रेस्ने, क्रिस मार्कर, जॅकस् डेमी इत्यादी येतात.

ट्रुफोने जुल्स आणि जीम (Jules et Jim) हा चित्रपट काढण्यापूर्वी तीन चित्रपट काढलेले होते. परंतु त्याचा चित्रपट बराच गाजला तो चौथा. या चित्रपटाच्या यशात ट्रुफोइतकाच त्यातील कॅथेराइनचे काम करणारी नटी जीन मोमू (Jeanne-Moseau) हिचा वाटा आहे.

' फोर हन्ड्रेड ब्लोज् ' आणि ' शूट दी पिआनिस्ट ' हे त्याचे पहिले दोन बोलपट. पहिल्या बोलपटात एका अभागी मुलाची दुर्दैवी कहाणी होती. हा बोलपट लोकांना आवडला. दुसरा बोलपट, चित्रपटनिर्मात्याला जरी या बोलपटाने पैसे मिळवून दिले तरी दहांपैकी आठ लोकांच्या तो पसंतीस उतरला नाही. ट्रुफोच्या शब्दांत सांगायचं तर तो चित्रपट अपयशी होता.

### ' जूल्स आणि जीम ' ची कथा

' जूल्स ॲन्ड जीम ' या चित्रपटाची कथा हेन्री पिरे रोच या लेखकाच्या त्याच नावाच्या कादंबरीवर आधारलेली आहे. हा चित्रपट म्हणजे मनुष्यस्वभावाचा उत्कृष्ट अभ्यास आहे.

कथानकाचा काल इ. स. १९१० आणि १९३० च्या दरम्यानचा आहे. जर्मन (जूल्स) आणि फ्रेन्च (जीम) असे दोन तरुण एका हॉटेलात भेटतात. दोघेही कलाकार वृत्तीचे असल्याने एकमेकांचे मित्र बनतात. जीम हा रुबाबदार आणि उंच असतो. तरुणींच्या बाबतीतही तो यशस्वी असतो. जूल्स हा अंगाने सर्वसाधारण असतो. स्त्रियांच्या बाबतीत तो मागासलेला असतो. या दोघांच्या जीवनात कॅथराईन नावाची एक तरुणी येते. दोघांनाही ती आवडते. दोघांचेही तिच्यावर प्रेम असते; पण जूलसशी ती लग्न करते. लग्न झाल्यावर काही दिवसांतच जूल्सच्या घरातील माणसांशी तिचं पटत नाही. जूल्स तिला या भांडणात साथ देत नाही. तेव्हा जूल्स-वरचा राग ती आपल्या जुन्या प्रेमिकाबरोर शय्यासोबत करून घालवते. तिचा स्वभावच विचित्र बनतो. ती जूल्सला सारखे टोचून बोलते. जूल्स शहाण्या माणसा-सारखा ऐकून घेतो. यावेळी युद्धावरून जीम परत येतो. त्याला कॅथेराईन आणि जूल्स आपल्याकडे जर्मनीला बोलावतात. कॅथेराईनच्या चिडक्या स्वभावात फरक पडावा म्हणून जूल्स आपण होऊनच तिला जीमच्या सान्निध्यात जास्तीत जास्त राहावी, असा प्रयत्न करतो. जीम तिच्या प्रेमात गुरफटला जातो, पण कॅथेराईनच्या स्वभावात काही फरक पडत नाही. तो दिवसेदिवस विचित्रच बनतो.

या चित्रपटाची सुरवात खिडकीतून घेतलेल्या एका शॉटने होते. खिडकीतून लक्ष जेव्हा बाहेर जाते, तेव्हा बाहेरील अंगणात एक जर्मन कार गोलाकार चकरा मारत असते. काही केल्या ती थांबतच नाही. जूल्स आणि जीम या चित्रपटातील कथानकही असंच वर्तुळाकार आहे. त्यांतील पात्रांच्या जीवनाची सायकल सारखी चालतच असते. चित्रपटात तीन मुख्य पात्रे आहेत. त्यांचे विचार, त्यांचे प्रेम, त्यांचे संबंध सारे काही चित्रपटात लक्षपूर्वक पाहिल्यास प्रत्येक शॉटमध्ये त्रिकोण आणि वर्तुळाकाररीत्या दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. जणू काही आपण एखाद्या सर्कशीचा खेळ पाहत आहोत, असंच हा चित्रपट पाहात असताना वाटतं आणि ते खरेच आहे. आपले चित्र-पट सर्कससारखे असतात असे त्याने आपल्या एका मुलाखतीत सांगितले आहे. तो म्हणतो: " My films are circus shows and that what I want to be. I

would never show two elephant acts; running after the elephant comes the conjuror, the bear. I even arrange an interval round about sixth reel, because people may be getting a bit tired. At the seventh reel I take them in hand again; and try to end up with the best thing in the show.

"I really do think about the circus while I am working. I would like people to boo the sequences that have gone wrong and clap the ones they enjoy. And since people who come to see my films have to shut themselves up in the dark; I always like at the end to take them out into nature–to the sea, or the show–so that they'll forgive me."

जूल्स आणि जीम हा चित्रपट पाहिल्यावर ट्रुफोंना दोस्तीचे महात्म्य दाखवायचे होते असे वाटते. चित्रपटाचे दिग्दर्शन, पात्राचा स्वभावपरिपोष, कथानकाची घडण या साऱ्या बाबतीत ट्रुफो यशस्वी झाला आहे. ट्रुफोने आपल्या कलाकारांना स्वातंत्र्य दिल्यामुळे त्यांची कामे नैसर्गिक वाटतात. यातील राऊत कोहार्डची फोटोग्राफी उत्तम आहे, पण 'फोर हन्ड्रेड ब्लोज' या चित्रपटात विषयाचा साधेपणा होता. मनाला भिडण्याची त्यात शक्ती होती, ती मात्र या चित्रपटात आढळत नाही.

अन् जाता जाता हा चित्रपट पाहात असताना मला राजकपूरच्या संगमची आठवण झाली. दोन्ही चित्रपटांचे कथानक एकच; पण राजकपूरच्या संगममधला उथळपणा ट्रुफोच्या या चित्रपटात जरा तरी दिसतो का? अर्थात मला इथे ट्रुफोवर अन्याय करून; त्याची राजकपूरशी तुलना करायची इच्छा नाही.

**पुरुषोत्तम बावकर.**


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

राजहंस प्रकाशन, ७१९ नारायण, पुणे २

रशियातील समाजजीवन

## □ राजकीय वाङ्मयाची आवड नाही

पाश्चात्त्य देशांत ज्याप्रमाणे समाजजीवनाची विविध बाजूंनी पाहणी केली जाते, त्याप्रमाणे तसे प्रयत्न आता रशियातही होऊ लागले आहेत आणि या पाहणीतून रशियन समाजजीवनाचे अधिक वस्तुनिष्ठ दर्शन आपणास प्रथमच घडत आहे. रशियन नागरिक आपला वेळ कसा घालवितात याची पाहणी श्री. ए. ए. एमस्टॉव्ह आणि श्री. ए. एस्. ड्चाल या दोन समाजशास्त्रज्ञांनी नुकतीच केली व तिचे निष्कर्ष 'व्होप्रोसी फिलॉसॉफी' या नियतकालिकात प्रसिद्ध केले. 'सोव्हिएट ॲकेडमी ऑफ सायन्सेस' या संस्थेतर्फे हे नियतकालिकात प्रसिद्ध होते. त्यातील निष्कर्ष वाचून रशियन नागरिक इतर देशांतल्या नागरिकांसारखाच आहे. अठ्ठेचाळीस वर्षे सतत कम्युनिझमच्या प्रचाराचा मारा त्याच्यावर होत असताही त्याच्यात काही निराळे विशेष आलेले नाहीत किंवा त्याची घडण निराळ्या प्रकारे झालेली नाही.

सर्वसामान्य माणसाला राजकीय वाङ्मयाची फारशी आवड नसते, तीच गोष्ट रशियन नागरिकांबाबतही खरी आहे. 'तुला' शहरातील १५२ घरांची पाहणी या शास्त्रज्ञांनी केली. १३६ जणांनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांपैकी फक्त २४ जण राजकीय वाङ्मय वाचतात असे आढळून आले. आपण कधीच वृत्तपत्रे वाचीत नाही, असे ३९ म्हणजे तीस टक्के लोकांनी सांगितले. कधीच पुस्तके न वाचणारांची संख्या ५४ होती याचा अर्थ पाच माणसांमागे दोघे कधीही पुस्तके न वाचणारे होते. मासिकेही न वाचणारे ८८ म्हणजे ६४ टक्के होते. चोवीसजणांनी म्हणजे १७ टक्के लोकांनी आपण कधी रेडिओ ऐकत नाही असे सांगितले व निम्म्या लोकांनी आपण कधी टेलिव्हिजन पाहात नाही असे उत्तर दिले. आपण कधी सिनेमास जात नाही, असे वीस टक्के लोकांनी सांगितले. निम्यापेक्षा अधिक लोक आपला फुरसतीचा वेळ पत्ते किंवा तशाच स्वरूपाचे खेळ खेळण्यात घालवितात असे दिसून आले. कारखान्याच्या वर्क्स क्लबमध्ये तुम्ही का जात नाही असे विचारले असता कामगारांनी निरनिराळ्या सबबी सांगितल्या. क्लबकडे जाणाऱ्या रस्त्यावर फार चिखल असतो असे काहींनी सांगितले, तर जाहीर केल्याप्रमाणे चित्रपट तेथे दाखवीत नाहीत अशी काहींची तक्रार होती. क्लबला नेहमी कुलूप असते असे उत्तर काही कामगारांनी दिले.

समाजशास्त्रज्ञ डचाल यांनी सामुदायिक शेतांवरच्या २४७ कुटुंबांची पाहणी केली. शेतकरी आपला निम्म्या फुरसतीचा वेळ मित्रांकडे जाणे, बैठे खेळ खेळणे, मेजवान्यांना जाणे यात घालवीत असल्याचे आढळून आले. सामाजिक कार्य हा शब्द-प्रयोग रशियात कम्युनिस्ट पक्षाचे सभासद करणे वगैरे कार्यासाठी वापरला जातो. अशा 'सामाजिक कार्या'साठी शेतकरी आठवड्यातून एक तासापेक्षाही कमी वेळ देत असल्याचे दिसून आले. १९२२ साली हेच प्रमाण आठवड्याला अडीच तास होते. स्त्रिया अशा कार्यासाठी १९२२ साली आठवड्याला एक तास देत. आज फक्त २५ मिनिटेच देतात. सर्वसामान्य रशियन नागरिकास राजकीय कार्याची आवड नाही, याचेच हे निदर्शक आहे.

## पोटाची विवंचना रशियातही

कारखान्यातील कामगारांचा १०८ मिनिटे म्हणजे पावणेदोन तासापेक्षा अधिक वेळ प्रवासात जातो. आपल्याकडे मुंबईसारख्या मोठ्या शहरातील कामगार किंवा नोकरीवाल्या लोकांना लोकलमधून रोज दोन तास प्रवास करावा लागतो. रशियन कामगारांची स्थिती यापेक्षा निराळी नाही. कारखान्यांत किंवा इतर ठिकाणी



रशियन स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या, पण त्यामुळे त्यांचा घरकामाचा ताण कमी झालेला नाही. बाजार, स्वयंपाक, सफाई, मुलांची देखरेख वगैरे कामांत १९२२ साली तिचे आठवड्याला २३ तास जात. आजही तेवढाच वेळ तिला या कामासाठी द्यावा लागतो. पुरुष आठवड्याला ७-८ तास घरच्या कामात घालवितात.

बेकारी भांडवलशाही राष्ट्रांत असते. समाजवादी रशियात तिचे संपूर्ण उच्चाटन करण्यात आले आहे, असा दावा कम्युनिस्ट नेते नेहमी मांडतात. पण आता रशियातही बेकारी असल्याची अप्रत्यक्ष कबुली तेथील शास्त्रज्ञ देऊ लागले आहेत. ' बेकारी ' हा शब्द अर्थातच त्यांनी वापरलेला नाही. त्याऐवजी ' शिल्लक मनुष्यबळ ' (Surplus of man power)असे सौम्य शब्द ते वापरीत आहेत. पण त्यामुळे सत्य लपले जात नाही. वीस टक्के लोकांना रशियात आज नियमित नोकऱ्या नाहीत. केवळ मॉस्को, लेनिनग्राडसारख्या मोठ्या शहरांतूनच नव्हे, तर ट्रान्सकॉकेशस बायलो–रशिया, मोल्डेव्हिया, लिथुआनिया वगैरे भागातही परिस्थिती कठीण आहे, अशी माहिती ' व्होप्रोस इकॉनॉमिकी '(इकनॉमिक प्रॉब्लेमस्)या नियतकालिकातील लेखात दिली आहे. वर ज्या ' तुला ' शहरातील पाहणीचा उल्लेख केला, तेथेही ५० टक्के लोकांना काम मिळवून देणे कठीण जात आहे.

## ● नियोजनाचे अजीर्ण

' कोमसोमॉलस्क्या प्रावदा ' नावाचे रशियन युवकांचे एक मुखपत्र मॉस्कोतून निघते. या वृत्तपत्रात रशियन सरकारच्या ' लालफिती 'च्या कारभाराचा एक मजेशीर नमुना नुकताच प्रसिद्ध झाला आहे. श्री. इल्वा झुरेव यांनी हा ' किस्सा ' वर्णिला आहे.

श्री. झुरेव यांना आपल्या चष्म्याच्या रिकाम्या फ्रेममध्ये बसविण्यासाठी दोन नव्या काचा हव्या होत्या. मॉस्कोमधील एका औषधी दुकानाच्या चष्म्याच्या विभागाकडे त्यांनी दोन काचांची मागणी केली. परंतु तेथील विक्रेतीने एकच काच देता येईल, असे सांगितले. ती म्हणाली, " दोन काचा एकाच इसमास विकण्यास सरकारने बंदी केली आहे. मॉस्कोमध्ये दोन मोठ्या दुकानांनाच दोन काचा विकण्याचा परवाना आहे. " श्री. झुरेव या दोन दुकानांपैकी एका दुकानात मोठ्या उत्साहाने शिरले व त्यांनी आवश्यक त्या काचांची मागणी केली. परंतु त्या दुकानातील विक्रेत्यानेदेखील दोन काचा देण्यास नकार दिला. तो म्हणाला, " तुम्ही चष्मा ज्या केसमध्ये ठेवता, ती अगदीच नाजूक आहे. नियमानुसार कठीण व कोणत्याही धक्क्यापासून संरक्षित असलेली चष्म्याची केस असली पाहिजे. परंतु तुमची ' केस ' तशी नसल्याने आम्हाला काचा देता येणार नाहीत. "

' असा विचित्र नियम का ? ' अशी पृच्छा श्री. झुरेव यांनी करता तो विक्रेता

म्हणाला, " चष्म्याचे नीट रक्षण व्हावे म्हणून जे ग्राहक कठीण केसमध्ये आपला चष्मा ठेवत असतील, त्यांनाच काचा विकण्याचा नियम सरकारने केला आहे."

या सर्व नियमामुळे त्रासून गेलेल्या श्री. झुरेव यांनी एका कठीण केसची मागणी केली, परंतु ' आमच्याकडे फक्त नाजूक ' केस ' विकत मिळते,' असे त्या विक्रेत्याने सांगितल्यामुळे त्यांना निराश होऊन परतावे लागले. श्री. झुरेव यांनी त्यांना पुढे चष्म्याच्या काचा मिळाल्या की नाही, याबद्दल या लेखात काही सांगितलेले नाही.

## ● अल्जीरियात 'आराम हराम है!'

नव्या अल्जीरियन सरकारने एक वेगळेच ' बंड ' पुकारले आहे. हे बंड बेनबेला-विरुद्ध नसून निरर्थक गप्पा मारून दुसऱ्यांचा वेळ घेणाऱ्या आळशी लोकांविरुद्ध आहे. कर्नल बुमेदियन यांच्या नव्या राजवटीने अशा आळशी लोकांचा आळशीपणा घालविण्याची मोहीमच उघडली आहे. ' अल् मुजहिद ' या अल्जीरियातील सरकारी दैनिकाने या आळशी लोकांना सैन्यात भरती होण्याचा सल्ला दिला आहे.

## ● उष्माघातावर उपाय

नेपलसमध्ये अगदी रखरखीत ऊन पडले होते. अंग भाजून काढणारे. त्यामुळे एक वर्षाचे एक बालक उष्माघाताने आजारी पडले. डॉक्टरांनी प्रयत्नांची अगदी शिकस्त केली, पण ते ' मूल ' जगण्याची चिन्हे दिसेनात. अगदी जवळजवळ मृत्यूच्या उंबरठ्यावरच ते मूल उभे होते. हताश झालेल्या डॉक्टरांना अंतिम उपाय म्हणून एक शक्कल सुचली. उष्माघात झालेल्या या मुलाला त्या डॉक्टरांनी बर्फाच्या लाद्यात अगदी थंडगार वातावरणात नेऊन ठेवले आणि काय आश्चर्य ! त्या मुलाच्या मलूल, निष्प्रभ मुखावर या उपायाचा संजीवनीसारखा परिणाम होऊन चैतन्य फुलले.

## ● विद्यार्थी व गवळी विनातिकीट प्रवासात आघाडीवर

आपल्या देशात विनातिकीट रेल्वेप्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ' नॉर्दर्न रेल्वे ' विभागात दरदिवशी १०,००० प्रवासी विनातिकीट प्रवास करत असल्याचे आढळून आले आहे. सहा वर्षांपूर्वी हाच आकडा ४,००० इतका होता.

विनातिकीट प्रवास करणाऱ्यांत विद्यार्थी व गवळी यांचाच भरणा अधिक दिसतो.

उगाचच साखळी ओढून रेल्वे थांबविण्याचे प्रकार तर सारखे वाढत आहेत. गंमत म्हणजे विनाकारण साखळी ओढणाऱ्यासाठी दंडाची रक्कम वाढवून त्याचा उलट परिणाम झाला आहे. १९६४-६५ साली विनाकारण साखळी ओढण्याच्या प्रकारांनी तर उच्चांकच गाठला आहे.

आपल्या देशात १९५८ साली विनाकारण साखळी ओढण्याचे ८,०७२ प्रकार घडले. १९६३-६४ साली हा आकडा १९,१५२ इतका होता, तर १९६४-६५ साली

तो २५,७७२ वर गेला. अशाप्रकारे साखळी ओढणाऱ्यांत विद्यार्थ्यांची संख्या सर्वात अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे.

### ● दुधापेक्षा पाणी महाग

'दुधाच्या किमती का वाढतात,' असे तुम्हाला विचारले तर तुम्ही प्रश्न विचारणाऱ्याला वेड्यातच काढाल. किती साधा प्रश्न आहे हा! गाईच्या चाऱ्याच्या किमती वाढल्या असतील म्हणून महागले असेल दूध; त्यात काय एवढे? असे म्हणून तुम्ही मोकळे व्हाल! परंतु बच्चंमजी, इतके सोपे नाही ते. तुम्हाला प्रत्यक्ष एक उदाहरणच सांगतो.

दिल्लीपासून आठ मैलांवर असलेल्या लजपत नगरमध्ये राहणाऱ्या एका गृहिणीस गवळ्याने दुधाला एका किलोमागे "८८ पैशांऐवजी १ रुपया पडेल," असे सांगितले. आधीच महागाईने त्रासून गेलेली गृहिणी या भाववाढीने संतापली. ती म्हणाली, "भाव का वाढवलेत? चाऱ्याचे भाव वाढले वाटतं?"

गवळी म्हणाला, "छे हो! पाणी दुर्मिळ झाले आहे म्हणून भाव वाढवले आहेत."

पावसाचा पत्ता नाही आणि पाण्याचे दुर्भिक्ष यामुळे दुधाऐवजी पाण्याचेच भाव वधारले आहेत.

आता बोला! दुधाचे भाव का वाढले, हा प्रश्न योग्य की अयोग्य?

●

## सूचना

- दीपावली व सर्व खास अंकांसह माणूसची वार्षिक वर्गणी आठ रुपये व परदेशी बारा रुपये आहे.
- **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवावयाचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.
- **अंक न पोहचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.

**लेखकांसाठी :** स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

**ब. मो. पुरंदरे**

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**१०० रुपयांची ठेव**
**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशित
पुणे

४१९ नारायण, पुणे

MANOOS (Fortnightly) : 1 Aug. 1965 : 30 Paise: Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkesson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ. पणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर